मॉड्युल-I

१

भाववाढ

घटक रचना

१.० उद्दिष्टये
१.१ प्रस्तावना
१.२ भाववाढ
१.३ भाववाढीचे प्रकार
  १.३.१ वस्तूच्या किंमत वाढीच्या दरानुसार
  १.३.२ शासकीय हस्तक्षेपावरून
  १.३.३ काळानुसार
१.४ भाववाढीची कारणे
१.५ भाववाढीचे परिणाम
१.६ मागणी प्रेरित भाववाढ
१.७ खर्च प्रेरित भाववाढ
१.८ फिलिप वक्र
१.९ सारांश
१.१० प्रश्न

१.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

- भाववाढ ह्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
- भाववाढीच्या विविध प्रकारांची चर्च करणे.
- भाववाढीची कारणे तपासणे.
- भाववाढीचा परिणाम जाणून घेणे.
- भाववाढ रोखण्यासाठी मौद्रीक व राजकोषिय उपायांची अंमलबजावणी करणे.

१.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

पैसा हे सर्वसामान्य असे विनिमयाचे साधन आहे. पैशाच्या अंगी असलेल्या क्रयशक्ती या गुणामुळे अनेक वस्तू व सेवांची खरेदी करता येते. या त्यांच्या गुणावरून त्यांचे मूल्य ठरत असते.

या पैशाचे मूल्य अर्थव्यवस्थेत केव्हाच स्थिर नसते. त्यात वस्तूंच्या व सेवांच्या किंमतीतील वाढ व घटी नुसार सातत्याने बदल होत राहतात. अर्थात या सातत्याने होणाऱ्या बदलांमुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. अशा या अस्थिर परिस्थितीचे भाववाढ (तेजी) आणि भाववाढ (मंदी) असे दोन रूपे आहेत.

१.२ भाववाढ (INFLATION)

अर्थव्यवस्थेत जर विविध वस्तु व सेवांच्या किंमतीत सातत्याने वाढ घडून येण्याची प्रवृत्ती आढळून येत असेल तर त्या स्थितीचे वर्णन अर्थशास्त्रात चलनवाढ, स्फीती, मुद्रास्फीती, भाववाढ, चलनविस्तार, चलनातिरेक, चलनवृद्धी, चलन विस्फोट अशा अनेक सार्थ शब्दांनी केले जाते.

व्याख्या (Definitions):

१) प्रा. क्राउथर यांच्या मते, “ज्या परिस्थितीत पैशाचे मूल्य कमी होत असते म्हणजेच किंमती वाढत असतात अशा परिस्थितीला भाववाढ म्हणतात.”

२) प्रा. कोलबर्न यांच्या मते, “अत्याधिक मुद्रा अत्यंत कमी वस्तूचा पाठलाग करतात.”

३) हॉट्रे यांच्या मते, “चलनाचा अतिरिक्त पुरवठा म्हणजे भाववाढ.”

४) प्रा. पिगू यांच्या मते, “उत्पन्न प्राप्तीच्या क्रियेतील वाढीपेक्षम मौद्रीक उत्पन्नातील वाढ जास्त प्रमाणात होते, त्यावेळी चलनवाढ अस्तित्वात येते.”

५) ग्रेगरी यांच्या मते, “क्रयशक्तीच्या परिणामातील असामान्य वृद्धी म्हणजे स्फीती होय.”

६) प्रा. केमरर, “देशात चालणाऱ्या व्यापाराच्या भौतिक परिणामापेक्षा मुद्रेचे परिणाम जास्त असणे म्हणजे स्फीती होय.”

७) गोल्डन विजर यांच्या मते, “ज्यावेळी मौद्रीक रूपात राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा वेग वस्तुगत राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीच्या मानाने जास्त असतो. तेव्हा स्फीती निर्माण होते.”

८) प्रा. सॅम्युएलसन यांच्या मते, “किंमत आणि उत्पादन खर्च यांची सामान्य पातळी जेव्हा वाढते तेव्हा स्फीती निर्माण होते.”

९) मिल्टन फ्रिडमन यांच्या मते, “देशातील किंमतपातळी मुद्रापुरवठ्यावर अवलंबून असते व मुद्रेचा पुरवठा वाढला की किंमतपातळी हळूहळू वाढू लागते.त्यामुळे स्फीती ही एक मौद्रीक घटना असून ती सर्वत्र आढळून येते.”

१०) प्रा. पॉल इंजिग यांच्या मते, “चलनवाढ ही अशी असंतुलित अव्यस्था होय की ज्या अवस्थेत खरेदी शक्तीचा विस्तार झाल्यामुळे वस्तुच्या किंमती वाढतात किंवा किंमती वाढल्यामुळे खरेदी शक्तीचा विस्तार होतो.”

munotes.in

११) प्रा. केन्स यांच्या मते, “अपूर्ण रोजगाराच्या अवस्थेत होणारी किंमत वाढ म्हणजे वास्तविक स्फीती नव्हे तर केवळ पूर्ण रोजगारीच्या अवस्थेत किंमतीत होणारी वाढ म्हणजे वास्तविक स्फीती होय.”

१२) प्रा. गार्डनर ॲक्ले यांच्या मते, “सामान्य किंमत पातळी किंवा किंमतीच्या सरासरी दीर्घकाळ अखंडपणे लक्षात येण्यासारखी घडून येणारी वाढ म्हणजे स्फीती होय.”

१३) ‘लंडन एकॉनॉमिक्स’ ने दिलेली व्याख्या “वस्तूच्या पुरवठयाची अंतिम मर्यादा गाठल्यानंतर पुरवठयाच्या मानाने मागणीचे जे आधिक्य असते, त्याला स्फीती असे म्हणतात.”

अशा प्रकारे भाववाढीच्या काळात विविध वस्तु आणि सेवांची समाजाकडून असणारी एकूण मागणी पुरवठयापेक्षा जास्त असते. म्हणजेच मागणीचे पुरवठयावर आधिक्य प्रस्थापित होऊन असंतुलनाची अवस्था निर्माण होते.

१.३ भाववाढीचे प्रकार (TYPES OF INFLATION)

भाववाढ कोणत्या कारणाने निर्माण होते त्यावरून भाववाढ किंवा चलनवाढीचे विविध प्रकार पडतात. त्या विविध प्रकारांचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

१.३.१ वस्तूच्या किंमत वाढीच्या दरानुसार:

१) रांगती भाववाढ (Creeping Inflation):

देशात वस्तु व सेवांच्या किंमतीमध्ये हळूहळू परंतु कमी दराने वाढ होत असेल तर अशा प्रकारला रांगती भाववाढ असे म्हणतात. भाववाढीचा हा प्रकार सामान्य असून तो अर्थव्यवस्थेच्या विकासाला पोषक असतो असे काही अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. परंतू हीच स्थिती कायम राहिल्यास कालांतराने देशात विशाल भाववाढीला तोंड द्यावे लागले असेही काही अर्थशसस्त्रज्ञानी सूचविले आहे. अशा भाववाढीचा वेग ५ ते १० टक्के असतो.

२) चालती भाववाढ (Walking Inflation):

अशा प्रकारच्या भाववाढीचे मूळ रांगत्या भाववाढीत असते. रांगत्या भाववाढीमध्ये सातत्याने वस्तुंच्या किंमती वाढू लागल्यास चालती भाववाढ निर्माण होते. अर्थात रांगत्या भाववाढीपेक्षा चालत्या भाववाढीमध्ये वस्तू व सेवांच्या किंमती अधिक वेगाने वाढू लागतात. किंमत वाढीचे हा वेग ३० ते ४० टक्के पर्यंत वाढलेला असतो आणि यातूनच धावत्या भाववाढीला आमंत्रण मिळते.

३) धावती भाववाढ (Running Inflation):

चालती भाववाढ रोखण्यास अपयश आल्यास अशा प्रकारची भाववाढ निर्माण होते. जेव्हा वस्तूच्या किंमती वेगाने वाढत असतात तेव्हा त्याला धावती भाववाढ असे म्हणतात. या भाववाढीच्या काळात कायमउत्पन्न असणाऱ्या वर्गाचे, मजुरांचे व दारिद्र्य रेषेखालील

लोकांचे प्रचंड हाल होतात. धावत्या भाववाढीच्या काळात वस्तुच्या किंमती ५० ते १०० टक्के पर्यंत वाढत असतात.

४) विशाल भाववाढ (Hyper Inflation):

जेव्हा वस्तु व सेवांच्या किंमतीत अत्यंत वेगाने वाढ होत असते तेव्हा त्याला विशाल किंवा शीघ्र भाववाढ (Galloping Inflation) असे म्हणतात. या भाववाढीच्या काळात वस्तूच्या किंमती दररोज किंवा दरतासाला देखील वाढत असतात. असा अनुभव जगात अनेक देशात आलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत वस्तूच्या किंमती १२,०००,०००,०००,००० इतक्या पटीने वाढल्या होत्या. जर्मनीतील लोक पिशवीतून पैसे घेऊन बाजाराला जात असत व येताना वस्तू खिशातून आणत असत. म्हणजे वस्तूपेक्षा पैशाचे ओझे जास्त असे. या भाववाढीच्या काळात वस्तूच्या किंमती कित्येक पटीने वाढतात.



आकृती क्र. १.१: भाववाढीचे प्रकार

भाववाढीच्या वरील चारही प्रकाराला लहान बाळाच्या वाढीची उपमा दिल्यास वावगे ठरणार नाही. बाळ जन्माला आल्यानंतर काही दिवसाने ते रांगते. त्यानंतर चालते, नंतर धावते व मोठे झाल्यावर शिघ्रतेने पळते. तसेच हे भाववाढीचे प्रकार आहेत. हे सर्व प्रकार वरील आकृतीत स्पष्ट करता येतील.

munotes.in

वरील आकृतीमध्ये OX अक्षावर कालावधी दर्शविलेला असून OY अक्षावर किंमत पातळीतील वाढ दर्शविली आहे. तर A, B, C, D हे वक्र अनुक्रमे रांगती, चालती, धावती व विशाल भाववाढ दर्शवितात. या वक्रावरून आपणास भाववाढीची स्थिती चटकन समजते.

१.३.२ शासकीय हस्तक्षेपावरून:

यामध्ये पुढील दोन प्रकार पडतात:

१) खुली भाववाढ:

जेव्हा शासनाचा अर्थव्यवस्थेतील वस्तु व सेवाच्या किंमतीवर कोणताही हस्तक्षेप नसतो तेव्हा जी भाववाढ निर्माण होते तीला खुली भाववाढ किंवा मुक्त भाववाढ असे म्हणतात. या भाववाढीच्या काळात शासन वस्तु व सेवांच्या किंमतीवर कोणतेही नियंत्रण लावले जात नाही. बाजारातील वस्तु व सेवांच्या मागणी पुरवठ्यानुसार वस्तु व सेवाच्या किंमती निश्चित होतात. म्हणून अशा भाववाढीला मुक्त भाववाढ असे म्हणतात.

२) दडलेली भाववाढ:

जेव्हा शासन जीवनावश्यक वस्तु व सेवांच्या किंमतीवर बंधने घालते व अशा वस्तु व सेवाच्या किमती नियंत्रित ठेवते. त्याला दडलेली भाववाढ असे म्हणतात. उदा. स्वस्त धान्य दूकानातून वाटप होणारी साखर, गहू, तांदूळ, डाळ, रॉकेल इ. तसेच पेट्रोल, डिझेल, गॅस इत्यादी वस्तूच्या किंमती शासनाकडून नियंत्रित ठेवल्या जातात. जोपर्यंत शासन असे नियंत्रणे लादते तोपर्यंत या वस्तु व सेवांच्या किंमती मर्यादित राहतात. शासनाने या वस्तूंवरील नियंत्रणे काढून घेतल्यास दडलेल्या भाववाढीचे रूपांतर खुल्या भाववाढीत होते. भारतात पेट्रोल नियंत्रण मुक्त केलेले आहे. त्यामुळे पेट्रोलच्या किंमती सातत्याने वाढत असतात.

१.३.३ काळानुसार:

१) शांतता कालीन भाववाढ:

अर्थव्यवस्थेत शांततेच्या काळात नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकास जलद गतीने करण्यासाठी शासन विविध क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर खर्च करते. शासनाचा खर्च म्हणजे लोकांच्या उत्पन्नात वाढ होय. परिणामी लोकांचे उत्पन्न वाढून मागणी वाढते. मागणीच्या पुरवठ्यात वाढ झालेली नसते. अशावेळी वस्तु व सेवांच्या किंमती वाढतात. याला शांतता कालीन भाववाढ असे म्हणतात.

२) युद्धकालीन भाववाढ:

जेव्हा एखाद्या देशाचे इतर देशांबरोबर युद्ध सुरू असते तेव्हा ते देश आपल्या देशातील उत्पादन घटक व साधनसामग्री युद्ध साहित्य व सामग्री निर्माण करण्यासाठी वापरतात. परिणामी जीवनावश्यक वस्तु व सेवांची टंचाई निर्माण होते. मागणी मात्र कायम असल्यामुळे देशात भाववाढ निर्माण होते. शिवाय युद्धाच्या काळात शासनाचा खर्च मोठ्या प्रमाणावर

munotes.in

वाढलेला असतो. त्यामुळे देखील भाववाढ मोठ्या प्रमाणावर निर्माण होते. त्यालाच युद्धकालीन भाववाढ असे म्हणतात.

३) युद्धोत्तर कालीन भाववाढ:

युद्धोत्तर कालीन भाववाढ म्हणजे युद्धकाळाचा परिणाम होय. युद्ध थांबल्यानंतर अर्थव्यवस्थेवर विकासाला गती देण्यासाठी शासन देशातील विविध क्षेत्रात उदा. शेती उद्याग, व्यापार, वाहतुक, दळणवळण, संशोधन गुंतवणूक वाढविते त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढून मागणी वाढते शिवाय युद्ध काळात अनेक वस्तु व सेवांच्या किंमती बंद केलेले असते. या सर्वांचा परिणाम म्हणून युद्धोत्तर काळात वस्तु व सेवांच्या किंमती वाढून भाववाढ निर्माण होते. तीलाच युद्धोत्तर कालीन भाववाढ असे म्हणतात.

१.४ भाववाढीची कारणे (CAUSES OF INFLATION)

भाववाढ ही प्रामुख्याने वस्तूच्या मागणी व पुरवठ्यात बदल झाल्यामुळे होत असते आणि मागणी पुरवठ्यात पुढील कारणांमुळे बदल होतात.

१) सरकारी धोरण:

पैशाच्या पुरवठ्यावर सरकारचे नियंत्रण असते. समजा शासनाने अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण वाढविले म्हणजे विविध मार्गानी नवीन पैसा अर्थव्यवस्थेत आणला तर मागणीपेक्षा पुरवठा वाढल्याने चलनवाढ होते.

२) कर्जाचे धोरण / कर्जरोख्यांची खरेदी:

शासन समाजाचा वाढता खर्च भागविण्यासाठी विविध मार्गाने भांडवलाची किंवा पैशाची उभारणी करीत असते. त्यातील जनतेकडून घेतले जाणारे कर्ज हा सुद्धा एक मार्ग आहे. समजा शासनाने जनतेकडून केली जाणारी कर्जाची मागणी कमी केली. तसेच मध्यवर्गी बँकेने खुल्या बाजारात कर्ज रोख्यांची खरेदी सुरू केली तर समाजाचे पैशातील उत्पन्न वाढून चलनवाढ होते.

३) करकपात:

शासनाने कर कमी केल्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढून त्याची प्रभावी मागणी वाढते. परंतु उत्पादनातील वाढीच्या अभावामुळे चलनवाढ होते.

४) सार्वजनिक खर्चात वाढ:

समाजिक कल्याणासाठी शासनाला आपल्या खर्चात सातत्याने वाढ करावी लागते. वाढत्या खर्चाबरोबरच लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांची खरेदी शक्ती वाढते. परंतु अर्थव्यवस्थेत उत्पादन तेवढ्या प्रमाणात वाढत नसल्याने चलनवाढ होते.

५) तुटीचा अर्थभरणा:

युद्ध आर्थिक नियोजन तसेच इतर अनेक सामाजिक कल्याणाच्या योजनासाठी शासनाला आपल्या खर्चात वाढ करावी लागते. परंतु हा खर्च पूर्ण करण्यासाठी उत्पन्न मात्र अपुरे पडते. अशा वेळी तुटीच्या अर्थभरणाच्या साहाय्याने नवीन चलन अर्थव्यवस्थेत आणले जाते. परिणामी पैशाचे प्रमाण वाढून मागणी वाढते. परंतु ती उत्पादनापेक्षा जास्त होऊप चलनवाढ होते.

६) पतपुरवठा:

तेजीच्या काळात एकूण वातावरण आशावादी असते. त्यामुळे बँका आणि इतर वित्तीय संस्था मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा करतात. व्यापारी बँकामार्फत होत असलेल्या पतपैशाच्या निर्मितीमुळे चलनवाढ घडून येते.

७) कर वाढीचे धोरण:

सरकारने वस्तुवरील करांच्या प्रमाणात वाढ केल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होतो. कारण त्यामुळे उत्पादनात घट होऊन व वस्तूंची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असते. परिणामी चलनवाढ होते.

८) उत्पादन खर्च:

प्रभावी कामगार संघटना जादा वेतनाची मागणी करतात. वाढत्या वेतन दराबरोबरच उत्पादन खर्चात वाढ होते. तसेच युद्धकाळ, आर्थिक विकासाचे कार्यक्रम इ. मुळे उत्पादन खर्चात वाढ होऊन चलनवाढ होते.

९) वेतनवाढ:

कामगार संघटना प्रभावी असतील तर त्या वाढीव वेतनदाराची मागणी करू शकतात की ज्यामुळे मजूराचे वेतन वाढवून त्याची खरेदी शक्ती वाढवण्यास मदत होते. परंतु उत्पादन त्या प्रमाणात वाढत नसल्याने चलनवाढ होते.

१०) उत्पादनाचे प्रमाण:

देशातील उत्पादनाचे प्रमाण मागणीच्या तुलनेने कमी असल्यास वस्तूंची टंचाई निर्माण होऊन किंमतपातळी वाढून चलनवाढ होते.

११) युद्धस्थिती:

युद्धकाळात देशातील उपभोक्त वस्तूंचे उत्पादन कमी होऊन युद्धसामग्रीचे उत्पादन वाढू लागते. तसेच आयात सुद्धा घटलेली दिसून येते. परिणामी अंतर्गत पुरवठा कमी होतो. परंतु शासनाच्या या काळातील वाढत्या खर्चामुळे लोकांचे उत्पन्न वाढत असल्याने मागणी वाढून चलनवाढ होते.

१२) मक्तेदारी संघटना:

देशातील मक्तेदारी संघटना साठेबाजी करून अनेक वस्तुबाबत कृत्रिम टंचाई निर्माण करतात त्यामुळे चलनवाढ घडून येते.

१३) खाजगी गुंतवणूक खर्चात वाढ:

वाढत्या औद्योगिक प्रगतीमुळे संयोजकाना गुंतवणूकीची प्रेरणा मिळते. परिणामी उत्पादक साधनांची मागणी वाढते. परंतु रोजगारीच्या परिस्थितीमुळे उत्पादकाची साधने उपलब्ध होत नाहीत. परिणामी तयांच्या किंमती वाढून त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. या घटकांकडून केली जाणारी मागणी वाढते. परंतु उत्पादन त्या प्रमाणात वाढ नसल्याने चलनवाढ होते.

१४) उत्पादक साधनांची टंचाई:

भूमी, श्रम, भांडवली साधने व कच्चामाल इ. उत्पादनाचे घटक उपलब्ध नसल्यामुळे वस्तूचे उत्पादन वाढविता येत नाही. अशा वेळी चलनवाढ ही पुरवठा कमी असल्यामुळे होते.

१५) निर्यात वाढ:

परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळविण्यासाठी जर निर्यात वाढत ठेवली तर देशात वस्तुची टंचाई निर्माण होऊन मागणीच्या प्रमाणात पुरवठा न झाल्याने चलनवाढ होते.

१६) बँकांचे धोरण:

अलिकडील काळात बँका उपभोग्य वस्तुच्या खरेदीसाठी हप्तेबंद व सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा करतात. परिणामी लोकांची खरेदी शक्ती वाढून चलनवाढ होते.

१७) देण्याघेण्याचा समतोल:

जर देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या देण्याघेण्यातील समतोल बिघडला तर आयातीच्या वाढत्या प्रमाणामुळे व निर्यातीच्या घटत्या प्रमाणामुळे चलनवाढीस प्रेरणा मिळते.

१८) व्यापारी कारणे:

कच्चामाल, रसायने, इंधन यांचा पुरवठा कमी झाला तर व्यापाराचे प्रमाण कमी होते. परंतु व्यापारी वस्तूंना अधिक मागणी असल्याने चलनवाढ घडून येते.

१९) पैशाचा भ्रमणवेग:

अर्थव्यवस्थेत पैशाचा भ्रमणवेग वाढला म्हणजे लोकांची रोकड प्राधान्य प्रवृत्ती कमी होऊन खर्च वाढतो. परिणामी चलनवाढ होते.

२०) पूर्ण रोजगार:

देशात पूर्णरोजगार प्रस्थापित झाल्यास लोकांचे उत्पन्न वाढेल परंतु ह्या प्रमाणात श्रमिकांची उत्पादन क्षमता वाढत नसल्याने उत्पादन वाढी अभावी चलन वाढ होते.

२१) वाढत्या खर्चाचा सिद्धांत:

पूर्णत: पर्यायी असलेली उत्पादनाचे घटक उपलब्ध होत नसल्यास वाढत्या खर्चाचा नियम कार्यान्वित होऊन वस्तूंच्या उत्पादनात वाए होऊ न शकल्याने चलनवाढ होते.

२२) नैसर्गिक आपत्ती:

विकसनशील देशांमध्ये दुष्काळ, महापूर, भूंकप, रोगराई, वाईट हवामान इ. नैसर्गिक आपत्तीच्या काळात विविध वस्तूंची टंचाई निर्माण होऊन चलनवाढ होते.

२३) आर्थिक विकास:

आर्थिक विकासाच्या प्राथमिक काळात कायमस्वरूपी विकास साधण्यासाठी विविध प्रकारच्या सामाजिक / आर्थिक सुविधा निर्माण कराव्या लागतात. अर्थात या सुविधांचा फलधारणा कालावधी दीर्घ असल्यामुळे मध्यंतरीच्या काळात उपभोक्त वस्तूंची टंचाई निर्माण होते.

२४) इतर घटक:

संप-टाळेबंदी, हरताळ, सरकारचे आयात-निर्यात धोरण इत्यादी. घटकाच्या पुरवठ्यावर प्रभाव पडून चलन वाढ घडून येते.

वरील विविध कारणांमुळे अर्थव्यवस्थेत चलनवाढ घडून येत असते. स्थिर आर्थिक विकासासाठी अर्थात ह्या अतिरेकी चलनवाढीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते.

१.५ भाववाढीचे परिणाम (EFFECTS OF INFLATION)

भाववाढीचे पैशाचे मूल्य कमी होऊन त्यांचे अर्थव्यवस्थेतील विविध घटकांवर विविध प्रकारचे परिणाम होतात. त्यानुसार ठळक असे परिणाम पुढील प्रमाणे.

अ) आर्थिक परिणाम

ब) सामाजिक परिणाम

क) राजकीय परिणाम

ड) नैतिक परिणाम

अ) आर्थिक परिणाम (Economic Effects):

भाववाढीचे उत्पादन रोजगार वितरण आणि आर्थिक विकासावर पुढीलप्रमाणे परिणाम होतात:

I) उत्पादनावरील परिणाम:

आर्थिक परिणामात उत्पादनावरील परिणाम महत्वपूर्ण ठरतात. अवास्तव चलन . वाढीमुळे उत्पादनावर अनिष्ठ परिणाम देतात. ते पुढीलप्रमाणे:

१. उत्पादन घट:

संथ चलनवाढ उत्पादनवाढीला पोषक असली तरी जेव्हा वेगवान होते तेव्हा उत्पादनावर तिचा प्रतिकुल प्रतिमान होऊन उत्पादनात घट होते.

२. बचत गुंतवणूक:

चलनवाढीमुळे पैशाचे मूल्य कमी होऊन पैशाची खरेदी शक्ती कमी होते. त्यामुळे बचतीचे प्रमाण कमी होऊप भांडवल संचायाचा वेग कमी होण्यास सुरूवात होते. परिणामी भविष्य काळात भांडवल पुरवठा कमी होण्याचा धोका संभवतो तसेच गुंतवणूकही फायद्याची ठरत नाही.

३. अनावश्यक उत्पादन:

चलनवाढीमुळे उत्पादनाची अयोग्य वाटणी होऊन श्रीमंत तर गरीब अधिक होऊन श्रीमंताकडून मागणी असलेल्या अनावश्यक अशा चैनीच्या वस्तूंचे उत्पादन वाढून उत्पादन पद्धतीवर अनिष्ठ परिणाम होतो.

४. किंमत अस्थैर्य:

अर्थव्यवस्थेतील चलन वाढीच्या प्रक्रियेमुळे किंमत ठरविण्याची क्रिया बिघडते. परिणामी किंमत अस्थैर्य प्रस्थापित होऊन आर्थिक विकासावर अनिष्ट परिणाम होतो.

५. काळा बाजार साठेबाजी:

अतिरेकी चलनवाढीमुळे काळाबाज व साठेबाजी चालना मिळते. साठेबाजीतून वस्तूची कृत्रिम टचाई निर्माण होते व प्रत्यक्ष उत्पादन कार्याकडे दूर्लक्ष केले जाते.

६. अर्थव्यवस्थेत अस्थैर्य:

श्रीमंत व्यक्तीचे उत्पन्न चलनवाढीच्या काळात वाढत असल्याने व त्यांची चैनिच्या वस्तुसाठी मागणी वाढत असल्याने सर्वसामान्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन घेण्यासाठी लागणारी साधनसामग्री कमी पडते. किंमत यंत्रणेतील बिघाड, काळाबाजार साठेबाजी, व इतर विविध कारणामुळे अर्थव्यवस्थेत अस्थैर्य निर्माण होते.

७. विक्रेत्यांचे वर्चस्व:

श्रीमंताच्या उत्पादनात होणाऱ्या वाढीमुळे उत्पादनाची मागणी वाढत जाऊन उत्पादन व्यवस्थेत विक्रेत्यांचा प्रभाव वाढू लागतो. परिणामी बाजारात कोणत्याही प्राकराची वस्तु विकली जाण्याची शक्यता निर्माण होते.

८. वस्तूचा दर्जा:

चलनवाढीच्या काळात वस्तूची मागणी वाढत असल्याने कोणत्याही वस्तूला बाजारपेठ उपलब्ध होत असल्याने वस्तूच्या दर्जाकडे दुर्लक्ष होऊन वस्तूंचा दर्जा खालावतो.

९. पैशाचा भ्रमणवेग:

चलनवाढीला काळात पैशाची खरेदीशक्ती वेगाने कमी होत असल्याने साहजिकच लोक आपली रोख शिल्लक बाहेर काढतात. या काळात पैशाचा भ्रमणवेग अपेक्षेपेक्षा अधिक प्रमाणात वाढल्याने आढळते.

१०. दीर्घकालीन परिणाम:

लोकांची प्रवृत्ती अत्याधिक श्रीमंत होण्याची असते व नफा मिळविण्याची असते. परिणामी दीर्घकाळात फलदायी ठरणारी गुंतवणूक कमी होऊन अल्पकाळातील गुंतवणूक वाढते. परंतु त्यामुळे दीर्घकाळात उत्पादन कमी होण्याची शक्यता असते.

११. उत्पादन तंत्र:

उत्पादन तंत्रात सतत बदल करून जास्तीत जास्त फायदा मिळविण्याचा प्रयत्न या काळात केला जातो. परिणामी या स्पर्धेत टिकाव धरू न शकणारे उद्योग बंद पडतात

II) रोजगारावरील परिणाम:

चलनवाढीचा रोजगारीवर अनुकूल परिणाम होतो. वस्तूच्या किंमती सतत वाढत असल्याने संयोजक नफ्याच्या अपेक्षेने गुंतवणूक वाढवितात. अर्थव्यवस्थेत जून्या उद्योगांचा विकास व नवीन उद्योजकांना उद्योग स्थापनेची प्रेरणा मिळत असल्याने उत्पादकाच्या साधनाची मागणी वाढते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत बेकार असलेल्या साधनांना काम मिळते व अर्थव्यवस्थेत पूर्णरोजगाराची परिस्थिती निर्माण होते.

III) वितरणावरील परिणाम:

उत्पन्नाचे वितरण समाजातील निरनिराळ्या लोकांमध्ये होत असते. चलनवाढीमुळे काही वर्गाला अनपेक्षितपणे फायदा होतो तर काहींना नुकसान सहन करावे लागते.

१) स्थिर उत्पन्न वर्ग:

समाजातील काही लोकांचे उत्पन्न स्थिर असते. उदा. ठराविक वेतनावर काम करणारे शिक्षक, पेन्शपर, सरकारी कर्मधारी, ठराविक व्याज मिळविणारे इ. चलनवाढीच्या काळात वस्तूंच्या किमती वाढल्या की ह्या लोकांचे वास्तविक उत्पन्न कमी होते व राहणीमान खालावते.

२) अस्थिर उत्पन्न वर्ग:

समाजातील काही लोकांचे उत्पन्न अस्थिर असते. उदा. व्यापारी, उत्पादक, श्रमिक, दलाल, सट्टेबाज इ. चा चलनवाढीच्या काळात फायदा होतो. कारण या काळात त्यांचे उत्पन्न वाढते तसेच अनपेक्षितपणे नफा सुद्धा मिळतो.

munotes.in

३) धनको:

धनकोला किंवा रक्कम कर्जाऊ देणाऱ्या वर्गाला चलनवाढीच्या काळात तोटा होतो. कारण त्यांना पूर्वी इतकीच रक्कम व्याजासहीत परत मिळते व त्या रक्कमेची क्रयशक्ती फार कमी असते. परिणामी वास्तव उत्पन्न कमी राहते.

४) ऋणको:

ऋणकोला चलनवाढीच्या काळात फायदा होतो कारण त्याने जेव्हा कर्ज घेतलेले असते तेव्हा पैशाची खरेदी शक्ती जास्त असते. जेव्हा तो पैसे परत करतो तेव्हा पैशाचे मुल्य कमी झालेले असल्याने खरेदीशक्ती कमी झालेली असते परिणामी कमी वस्तूंची विक्री करूनही कर्ज फेड होऊ शकते.

५) उत्पादक:

उत्पादक वर्गाला चलनवाढीच्या काळात फायदा होतो. तो आपले पुर्वीचे उत्पादनही समाजात जास्त किंमतीला विकु शकतो. वस्तूच्या उत्पादनासाठी येणारा खर्च आणि विक्री करूनही मिळणारी किंमत यात मोठी तफावत असल्यामुळे अतिरिक्त नफा मिळतो.

६) विक्रेते:

चलनवाढीच्या काळात विक्रेत्यांना खूप फायदा होतो. कारण कोणत्याही प्रकारच्या उत्पादनाला मोठी किंमत मिळत असते.

७) उपभोक्ते:

उपभोक्त्यांचे चलनवाढीच्या काळात नुकसान होते कारण त्या पूर्वी इतक्याच वस्तु त्याच्या स्थिर उत्पन्न काळात मिळत नाहीत परिणामी त्याला आपल्या उपभोगात घट करावी लागते.

८) कामगार:

कामगार वर्गाला चलनवाढीचा फायदा होत नाही. कारण त्यांना मिळणारे वेतन पूर्वीच्या कराराप्रमाणे असते. परंतु बाजारात वस्तूच्या किंमती वाढलेल्या असल्याने त्याला अधीक किंमत द्यावी लागते. अर्थात एक फायदा कामगारांना होतो तो म्हणजे वाढत्या रोजगाराच्या संधीमुळे बेकारी कमी होण्यास मदत होते.

९) शेतकरी:

चलनवाढीच्या काळातील वाढत्या किंमतीचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होतो. त्यामुळे आपल्या पूर्वीच्या कर्जाची परतफेड सुद्धा करता येणे शक्य होते.

१०) गुंतवणूक करणारा वर्ग:

कर्जरोखे, डिबेंचर्स मध्ये गुंतवणूक करणाऱ्या लोकांना तोटा होतो. कारण त्यांच्या गुंतवणूकीचे मूल्य कमी होऊन मध्यवर्गीयांची बचतप्रवृत्ती कमी होते. मात्र शेअर्स मधील गुंतवणूक फायदेशीर ठरते.

११) सरकार:

सरकारच्या उत्पन्नातील कर हे एक महत्वाचे साधन आहे. चलनवाढीच्या काळात पूर्वी निश्चित केलेली कराची रक्कत वाढत नसल्याने या स्थिर कररकमेचा शासनाला फायदा होत नाही.

१२) आयातदार:

चलनवाढीमुळे देशातील वस्तु परदेशी वस्तूच्या तुलनेने महाग ठरत असतील तर आयात दरांना आयात वाढवून आपला व्यवहार वाढविणे व फायदा मिळविणे सहज शक्य होते.

IV) आर्थिक विकास:

अनेक अर्थशास्त्रज्ञाच्या मते अल्पप्रमाणात व सावकाश होणारी किंमतवाढ ही आर्थिक विकासाला अनुकूल ठरणारी असते. काही प्रसंगी तीचे वाईट परिणामही पुढीलप्रमाणे होतात.

१) असमान वितरण:

चलनवाढीच्या काळात उत्पन्नाचे विविध घटकांमध्ये समान वितरण होते. उत्पन्नाचा मोठा हिस्सा नफा मिळविण्याच्या वर्गाकडे जाऊन त्यांची सीमांत बचत वाढते. ज्या वर्गाला तोठा सहन करावा लागतो त्यांची बचत प्रवृत्ती कमी होते.

२) भरभराट:

चलनवाढीच्या काळात ज्या वर्गाला फायदा होऊन बचत प्रवृत्ती वाढते, या वाढत्या बचतीचा संयोजक वर्ग गुंतवणूकीसाठी उपयोग करून घेतात. त्यामुळे उत्पादन, उत्पन्न रोजगार यात वाढ होऊन अर्थव्यवस्थेत भरभराट होते.

३) उत्पादन वाढ:

या काळात नफ्याचे प्रमाण वाढत असल्यामुळे उत्पादनात वेगाने वाढ होऊन आर्थिक विकासाला वेग वाढतो.

४) अनपेक्षित परिणाम:

चलनवाढ अनपेक्षित असेल तर बचत, गुंतवणूक, रोजगार, उत्पन्न यावर तिथे अनुकूल परिणाम होऊन आर्थिक विकासास मदत होते असे अनेक अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे.

५) अपेक्षित परिणाम:

जर चलनवाढ अपेक्षित असेल तर लोकांची बचत प्रवृत्ती दुर्बल होते. पैशाची खरेदी शक्ती कमी होत असल्याने लोक बचत करण्यापेक्षा खर्च करण्यास प्रवृत्त होतात. परिणामी भांडवल निर्मिती कमी होत जाऊन आर्थिक विकासावर अनिष्ट परिणाम होतो.

munotes.in

ब) सामाजिक परिणाम (Social Effects):

चलन वाढीच्या परिस्थितीमुळे अनेक सामाजिक परिणाम सुद्धा घडून येतात. वाढत्या किंमती बरोबर उत्पादन, रोजगार, उत्पन्न यात वाढ होऊन सर्वत्र उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण होते व विविध प्रकारच्य सामाजिक संस्था उदा. शाळा, विविध प्रकारचे मंडळे, क्लब इ. संस्था उदयाला येऊन त्यांचा विकास होतो. त्यातूनच लोकांची विधायक कार्याची प्रवृत्ती वाढत जाते.

अर्थात समाजातील काही वर्गावर चलनवाढीचे अनिष्ट परिणाम सुद्धा होत असतात:

क) राजकीय परिणाम (Political Effects):

चलनवाढीच्या काळात वाढत्या किंमतीमुळे लोक शासनावर टिका करू लागतात. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक होऊन आर्थिक विषमता निर्माण होते. भ्रष्टाचार, काळाबाजार वाढतो. उत्पादनांचा दर्जा खालावतो, लोकांची नितीमता खालावते, वाढत्या भेदभावांमुळे अराजकता माजून राजकीय वातावरण दुषित होते.

ड) नैतिक परिणाम (Moral Effects):

चलनवाढीच्या काळात व्यापारी वर्ग जास्तीत जास्त फायदा मिळविण्यासाठी काळाबाजार करतात. भेसळ, सट्ट्रबाजी अशा अनैतिक प्रवृत्तींचा जोर वाढतो. लोकांच्या हातातील पैसा वाढून त्यांना अनेक प्रकारची व्यसने लागतात की ज्यातून मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊ लागतो. सरकारी अधिकाऱ्यांची नैतिक पातळी घसरू लागते. अशा अनेक प्रकारचे अनिष्ट परिणाम चलनवाढीच्या काळात दिसून येतात.

अशा प्रकारे वरील आर्थिक, सामाजिक, राजकीय व नैतिक स्वरूपाचे इष्ट अनिष्ट परिणाम अर्थव्यवस्थेत होताना दिसून येतात. अर्थात याचा अर्थ अर्थव्यवस्थेत चलनवाढ घेऊ नये असे नव्हे. अर्थव्यवस्थेत उत्पादन क्षेत्रात आशावादी वातावरण ठेवण्यासाठी, आर्थिक विकासाला गती देण्यासाठी, अल्पप्रमाणात चलनवाढ होणे आवश्यक असते. परंतु तिचा अतिरेक झाल्यास इष्ट परिणामाऐवजी अनिष्ट परिणाम दिसून येतात.

मागणी प्रेरित आणि खर्च प्रेरित भाववाढ:

चलनवाढीच्या विविध प्रकारात या दोन प्रकारांचा म्हणजेच मागणी प्रेरित आणि खर्च प्रेरित चलनवाढीचा समावेश होतो. अर्थव्यवस्थेत चालनावाढ का होते याबाबत दोन विचार स्पष्ट प्रवाह दिसून येतात. एका विचार प्रवाहातून मागणीतील वाढीमुळे चलनवाढ होते. तर दुसऱ्या विचार प्रवाहानुसार उत्पादन खर्चातील वाढीमुळे चलनवाढ निर्माण होते त्याचे सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

१.६ मागणी प्रेरित भाववाढ (DEMAND PULL INFLATION)

चलनवाढीचे सिद्धांत म्हणूनही यांचा विचार केला जातो. या प्रकारात वर्तमान काळात वस्तूंची जी किंमत असेल त्या चालू किंमतीला वस्तु व सेवांची जी मागणी असेल ती

पुरवठ्यापेक्षा जास्त असते. त्यामुळे पुरवठ्यावर मागणीचे अधिक्य निर्माण होते. परिणामी मागणी जास्त आणि पुरवठा कमी यामुळे वस्तूच्या किंमती वाढतात.

व्याख्या:

मागणीतील वृद्धीमुळे जी चलनवाढ निर्माण होते तिला मागणी प्रेरित चलनवाढ असे म्हणतात. भाववाढीत जे मागणीचे पुरवठ्यावर अधिक्य निर्माण होते ते अनेक कारणामुळे निर्माण होते. ती कारणे पुढीलप्रमाणे:

१) पूर्णरोजगार:

अर्थव्यवस्था जर पूर्ण रोजगार पातळीवर असेल तर वास्तव उत्पन्नात वाढ घडून येत नाही व त्यामुळे किंमती वाढतात व मागणी प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

२) गुंतवणूक खर्च जास्त:

अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्रात किंवा खाजगी क्षेत्रात ही उत्पादन शक्यता असते. त्यापेक्षा गुंतवणूक खर्च जास्त झाल्यास लोकांचे उत्पन्न वाढून खरेदी शक्तीत वाढ होते. परंतु उत्पादन त्या प्रमाणात वाढले नाहीतर चलनवाढ होते.

३) जावा चलन निर्मिती:

समजा सरकारने नवीन चालनाची निर्मिती केली तर अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा वाढतो परंतु त्या प्रमाणात उत्पादन वाढत नसल्याने चलनवाढ होते.

४) पतनिर्मिती:

व्यापारी बँकामार्फत होणाऱ्या पतपैशांच्या निर्मितीमुळे सुद्धा अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा जादा होतो. उत्पादन मात्र त्या मानाने वाढत नाही. परिणामी चलनवाढ होते.

५) युद्ध कालीन परिस्थिती:

युद्ध काळात देशातील उत्पादन सामग्री युद्धसाहित्याच्या निर्मितीसाठी वापरल्यामुळे उपभोक्त वस्तूंचे उत्पादन कमी होते. परंतु सरकारच्या युद्ध खर्चामुळे लोकांचे उत्पन्न वाढते. परिणामी पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त होऊन चलनवाढ होते.

६) युद्ध पाश्चात:

युद्धसमाप्तीनंतर विस्कळीत झालेल्या अर्थव्यवस्थेत लगेच उत्पादन सुरू करता येत नाही. परंतु याबाबत (युद्धकाळात) समाजाच्या दबलेल्या मागणीचा उद्रेक होऊन मागणी जास्त व पुरवठा कमी असल्याने चलनवाढ होते.

७) भांडवलाची सीमांत लाभक्षमता:

भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेत वाढ झाल्यावरही मागणीचे पुरवठ्यावर अधिक्य निर्माण होऊन मागणी प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

munotes.in

८) संरक्षण खर्च:

सरकार देशाच्या संरक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करते. त्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांची खरेदीशक्ती वाढते. परंतु ज्या प्रमाणात मागणी वाढते त्या प्रमाणात उत्पादन वाढत नसल्याने चलनवाढ होते.

९) तुटीचे अंदाजपत्रक:

तुटीच्या अंदाजपत्रातील तुट भरून काढण्यासाठी व उत्पन्न आणि खर्च यांच्यात मेळ साधण्यासाठी शासन तुटीची अर्थभरण्या अंतर्गत नवीन चलनांची निर्मिती करते. त्यामुळे देशातील पैशाचा पुरवठा वाढतो. परंतु उत्पादन त्या प्रमाणात वाढत नसल्याने वाढत्या मागणीचा परिणाम होऊन चलनवाढ होते.

१०) वाढती निर्यात:

परकीय चलन मिळविण्यासाठी निर्यात वाढविली जाते. परिणामी देशातील वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तूंची कमतरता निर्माण होऊन शेवटी चलनवाढ होते.

वरील सर्व कारणामुळे मागणीचे पुरवठ्यावर आधिक्य निर्माण होऊन मागणी प्रेरित भाववाढ होते. मागणी प्रेरित चलनवाढीची संकल्पना पुढील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल.



आकृतीमध्ये O-X अक्षावर मागणी पुरवठा व उत्पादन दर्शविले असून O-Y अक्षावर किंमत पातळी दर्शविलेली आहे. $S-S_2$ हा पुरवठा वक्र असून खालून वर महणजेच डावीकडून उजवीकडे सरकणारा धनात्मक उताराचा आहे. “E” बिंदूच्या ठिकाणी अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होऊन पुरवठा वक्र O-Y अक्षाला समांतर होतो.

सुरूवातीस DD हा मागणी वक्र SS या पुरवठा वक्राला E ह्या बिंदूत छेदतो. या संतुकन बिंदूच्या ठिकाणी ON इतक्या उत्पादनाची OP इतकी किंमत निश्चित होते व त्याच ठिकाणी अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित होतो.

समजा मागणीत वाढ झाली तर मागणी वक्र वरच्या दिशेने सरकून नवीन D_1-D_1 हा मागणी वक्र SS या पुरवठा वक्रास E_1 याबिंदूत छेदेल या नवीन संतुलन बिंदूच्या ठिकाणी एकूण उत्पादनात कोणत्याही प्रकारचा बदल न होता किंमत पातळी OP वरून OP_1 पर्यंत वाढते.

समता मागणीत आणखी वाढ झाली तर मागणी वक्र वरच्या बाजुला सरकून नवीन D_2-D_2 हा नवीन मागणी वक्र S. या पुरवठ्या वक्राला E_2 या बिंदूत छेदेल. या नवीन संतुलन बिंदूच्या ठिकाणी उत्पादनात कोणत्याही प्रकारची वाढ न होता किंमत मात्र $O-P_2$ पर्यंत वाढेल. म्हणजेच E या पूर्णरोजगाराच्या बिंदूनंतर मागणीत वाढ झाल्यास उत्पादन न वाढता फक्त किंमत पातळी वाढून जी चलनवाढ दिसून येते ती म्हणजेच मागणी प्रेरित चलनवाढ होय.

१.७ खर्च प्रेरित चलनवाढ / भाववाढ (COST PUSH INFLATION)

अतिरिक्त मागणी नसतानाही चलनवाढ होऊ शकते हा दृष्टीकोन खर्च प्रेरित चलनवाढ सिद्धांतात मांडला आहे. १९५० च्या दशकात करण्यात आलेल्या या प्रकाराला विवेचनानुसार उत्पादक खर्चातील वाढीमुळे किंमतवाढ निर्माण होते. ही किंमतवाढ दोन प्रकारची असू शकते.

१) वेतन प्रेरित

२) नफा प्रेरित

१. वेतन प्रेरित:

श्रमीक संघटना आपज्या संघटीत शक्तीच्या बळावर आपल्या वेतनात वाढ घडवून आणू शकतात. श्रमिकाच्या वेतनात वाढ झाल्याने उत्पादन खर्च वाढतो. वस्तूच्या किंमती वाढतात. परंतु उत्पादनात मात्र त्या प्रमाणात वाढ होत नाही.

संघटनशक्तीच्या जोरावर श्रमिकांचे जे वेतन वाढलेले असते. त्यांचा परिणाम त्यांची विविध वस्तु व सेवा साठी असलेली मागणी वाढते. परंतु श्रमिकांच्या उत्पादन क्षमतेत वाढ झालेली नसल्याने एकूण उत्पादन न वाढल्यास किंमती वाढतात. अशा किंमती वाढू लागल्या की श्रमिक पुन्हा वेतनाची मागणी करतात. यातूनच वेतनातील वाढीमुळे किंमतवाढ व किंमतीतील वाढीमुळे पुन्हा वेतनवाढ अशी प्रक्रिया सातत्याने चालू राहून खर्च प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

२) नफा प्रेरित:

उत्पादकही आपल्या मक्तेदारी प्रभावामुळे किंमतीत वाढ करून अधिकाधिक नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात व त्यातून अशा प्रकारची चलनवाढ निर्माण होते.

अर्थात नफा हा एकूण किंमतीचा अल्पसा भाग असल्याने उत्पादक खर्चातील वाढीला कारणीभूत ठरणारा घटक म्हणून नफ्यापेक्षा वेतन वाढ हा घटक महत्वाचा मानला आहे. ही संकल्पना पुढील आकृतीच्या साहाय्याने अधिक स्पष्ट करता येईल.



मागणी पुरवठा व उत्पादन

वरील आकृतीमध्ये OX अक्षावर मागणी पुरवठा व उत्पादन तर OY अक्षावर किंमत पातळी दर्शविलेली आहे. SS हा पुरवठावक्र असून तो ON या पूर्ण रोजगार उत्पादन पातळीनंतर O-Yअक्षाला समांतर आहे. DD हा सुरूवातीचा मागणी वक्र SS पुरवठा वक्रास E बिंदूत छेदतो या संतुलन बिंदूच्या ठिकाणी O.N इतक्या उत्पादनाची O.P इतकी किंमत निश्चित होते समजा श्रमिकांच्या वेतनात वाढ झाल्यास S_1S हा पुरवठा वक्र DD मागणी वक्राला E_1 या बिंदूत छेदेल व या समतोल बिंदूच्या ठिकाणी OP_1 इतकी किंमत ON_1 इतके उत्पादन निश्चित होईल. म्हणजेच उत्पादन व रोजगारात घट होते.

समजा सरकारने पूर्ण रोजगार टिकवून ठेवण्यासाठी आपल्या खर्चात वाढ केली. त्यामुळे मागणी वक्र D_1D_1 हा नवीन मागणी वक्र S_1S या पुरवठा वक्रास E_2 या बिंदूत छेदतो. या

नवीन संतुलन बिंदूच्या ठिकाणी पूर्वीपेक्षा जास्त किंमत निश्चित होईल ती OP_2 इतकी असेल. परिणामी श्रमिक अधिक वेतनाची मागणी करतील.

श्रमिकांच्या वाढत्या वेतनवाढीच्या मागणीमुळे उत्पादन खर्चात वाढ होऊन पुरवठा वक्र S_2S हा मिळेल. हा पुपवठा वक्र D_1D मागणी वक्रात E_3 ह्या बिंदूत छेदेल या संतुलन बिंदूच्या ठिकाणी OP_3 इतकी किंमत निश्चित होईल.

पुन्हा शासन पूर्ण रोजगार टिकवून ठेवण्यासाठी आपल्या खर्चात वाढ करेल. त्यामुळे D_2D_2 हा नवीन मागणी वक्र S_2S या पुरवठा वक्रास E_1 या बिंदूत छेदेल सर संतुलन बिंदूच्या ठिकाणी $O\text{-}P_4$ इतकी किंमत निश्चित होईल.

एकूणच वेतनवाढ उत्पादन खर्चात वाढ व किंमतवाढ व पुन्हा वेतनवाढ असे चक्र सुरू राहून खर्च प्रेरित चलनवाढ अस्तित्वात येते.

१.८ फिलिप वक्र (PHILLIPS CURVE)

नव सनातनी अर्थशास्त्रज्ञांच्या मते महागाई, बेरोजगारीवर कोणताही परिणाम करत नाही. पण सन १९५८ मध्ये ब्रिटिश अर्थतज्ञ London School of Economics येथील प्राध्यापक, ए.डब्ल्यू. फिलिप्स यांनी १८६२ ते १९५८ पर्यंत ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या अभ्यासातून बेरोजगारी व चालू मजुरीच्या दरातील बदल यातील संबंध स्पष्ट केला. बेरोजगारी व चालू मजुरीचा दार यांच्या मध्ये ऋण संबंध असून त्यामध्ये समतोल साधला जातो. बेरोजगारीचा दार कमी करण्यासाठी महागाई मध्ये वाढ होणे गरजेचे आहे.

१.९ सारांश (SUMMARY)

अर्थव्यवस्थेत वस्तु व सेवांच्या किंमती सतत वाढल्यामुळे उद्भवणारी स्थिती म्हणजे भाववाढ/चलन विसतार होय. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेबरोबर ती सतत होत असताना जाणवते. अर्थात ती कोणत्या कारणामुळे होते त्यानुसार तिचे विविध प्रकार दिसून येतात. अशी ही भाववाढ अर्थव्यवस्थेत वस्तूच्या मागणी व पुरवठ्यात ज्या विविध कारणांमुळे बदल घडून येतात. त्यामुळे होताना दिसून येते. मर्यादित चलनवाढ ही अर्थव्यवस्थेच्या हिताची असते परंतु तिचा अतिरेक झाला की त्याचे अनेक दुष्परिणाम अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर दिसून येतात. अर्थात ह्या दूष्परिणामावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक देश मौद्रिक व राजकोषिय उपाय करीत असतात. याशिवाय इतर ही काही उपाय करून ती नियंत्रीत करता येते.

१.१० प्रश्न (QUESTIONS)

१) चलनवाढ म्हणजे काय? वस्तूच्या किंमती वाढीनुसार चलनवाढीचे विविध प्रकार स्पष्ट करा.

२) शासकीय हस्तक्षेप व काळानुसार भाववाढीचे कोणते प्रकार पडतात?

३) चलनवाढीच्या विविध कारणांची चर्चा करा.

munotes.in

४) चलनवाढीच्या विविध परिणामांवर आपले मत मांडा.

५) चलनवाढ रोखण्याचे मौद्रिक उपाय स्पष्ट करा.

६) चलनवाढीवर राजकोषिय धोरणातर्गत कोणते नियंत्रणात्मक पाऊले उचलता येतात?

फरक स्पष्ट करा.

a. मागणी प्रेरित व खर्च प्रेरित भाववाढ

टिपा लिहा.

१) वेतन प्रेरित नफा प्रेरित भाववाढ

२) चलनवाढीचे आर्थिक परिणाम

३) चलनवाढीवरील मौद्रिक उपाय

४) चलनवाढीवरील राजकोषिय उपाय

munotes.in

*****

२

मंदीयुक्त भावफुगवटा

घटक रचना

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ मंदीयुक्त भावफुगवटा अर्थ

२.३ मंदीयुक्त भावफुगवट्याची कारणे

२.४ मंदीयुक्त भावफुगवट्याचे परिणाम

२.५ सारांश

२.६ प्रश्न

२.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

- मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे काय याचा अभ्यास करणे.
- मंदीयुक्त भावफुगवटा करणे कोणती ते तपासणे.
- मंदीयुक्त भावफुगवटा परिणाम अभ्यासणे.
- पुरवठ्याच्या बाजूच्या अर्थशास्त्रीय घटकांचे टीकात्मक अभ्यास करणे.

२.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

केनीशियन अर्थशास्त्रात चलनवाढीशी / भाववाढीशी लढा देण्यासाठी किंवा धोरणांचा (आर्थिक आणि वित्तीय धोरणे) अवलंब करण्याच्या महत्त्वावर जोर देण्यात आला. केन्सचे असे मत होते की जेव्हा देश पूर्ण रोजगार अवस्थेला पोहोचतो तेव्हाच चलनवाढ / भाववाढ / महागाई होते. याचा अर्थ असा होतो की महागाई आणि बेरोजगारी एकाच वेळी अस्तित्वात येऊ शकत नाहीत.

तथापि, फिलिप्स वक्राने महागाई आणि बेरोजगारी यांच्या दरम्यान एक व्यस्त संबंध स्थापित केला. देशाला एकाच वेळी किंमत स्थिरता आणि पूर्ण रोजगार मिळविणे शक्य नव्हते.

त्यामुळे धोरणकर्त्यांसमोर कोंडीची (दुविधा / पेचप्रसंग) परिस्थिती आली. बेरोजगारीचा दर वाढू दिला तरच महागाईचा दर कमी होऊ शकतो आणि महागाईचा दर वाढू दिला तरच बेरोजगारी चा दर कमी करता येईल.

munotes.in

२.२ मंदीयुक्त भावफुगवटा अर्थ (MEANING OF STAGFLATION)

१९७० च्या दशकात जगातील बहुतेक प्रगत भांडवलशाही देशांना मंदीयुक्त भावफुवटाचा समस्येचा सामना करावा लागला. या नवीन समस्येचे निराकरण करण्यात केनीशियन धोरणात्मक उपाय अयशस्वी झाले / ठरले. याचा परिणाम म्हणून अर्थशास्त्राची नवीन शाळा उदयास आली. हे पुरवठा बाजूचे अर्थशास्त्र म्हणून ओलखले जाते जे मंदीयुक्त भावफुगवटा या समस्यसेशी लढण्यासाठी एकूण पुरवठ्याच्या व्यवस्थापनावर ताण ठेवते / जोर देते (म्हणजे, स्थिरतेच्या / कुंठिततेच्या दरम्यान महागाई).

मंदीयुक्त भावफुगवटा या शब्दाचा अर्थ असा आहे की अशी स्थिती जी स्थिरता आणि चलनवाढ सह-अस्तित्त्वात / एकत्र असतात. कमी आर्थिक वाढ, वाढती बेरोजगारी आणि महागाईचा उच्च दर हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हे फिलिप्स वक्राच्या निष्कर्षांच्या विरुद्ध आहे, जे महागाई आणि बेरोजगारीमधील व्यस्त संबंध दर्शविते. यामध्ये आपल्याला किंमतीच्या पातळीत सातत्याने झालेली वाढ आणि बेरोजगारीचे वाढलेले प्रमाण यांना सामोरे जावे लागते.

मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे स्थिर / कुंठित अर्थव्यवस्थेतील महागाई आणि बेरोजगारीतील सहजीवन होय. “मंदीयुक्त भावफुगवटा” ही संज्ञा व तिचा पहिलाच वापर हा १९६० दशकात युनायटेड किंगडम मधील आर्थिक तणावाच्या वेळी लेन मकलीलड यानी केला जेव्हा ते हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बोलत होते. त्यावेळी ते एकीकडे महागाई आणि दुसरीकडे अर्थव्यवस्था ठप्प (स्थिरता / कुंठितता) पडण्याविषयी बोलत होते आणि त्यास ठप्प परिस्थिती असे संबोधत होते. तेलाच्या संकटानंतरच्या १९७० च्या दशकात मंदीच्या काळातील वर्णनासाठी ही संज्ञा पुन्हा वापरण्यात आली, जेव्हा अमेरिकेने मंदीचा सामना केला तेव्हा नकारात्मक स्थूल आंतरदेशीय उत्पादनात पाच चतुर्थांश वाढ आणि १९७३ मध्ये महागाई द्विगुणित झाली आणि १९७४ मध्ये दोन अंकापर्यंत पोहोचली तर मे १९७५ पर्यंत बेरोजगारी ९% पर्यंत पोहोचली .

२.३ मंदीयुक्त भावफुगवट्याची कारणे (CAUSES OF STAGFLATION)

मंदीयुक्त भावफुगवट्याच्या कारणांबदइल अर्थशास्त्रज्ञांच्यात एकमत नाहीत.

काहीजणांचे असे म्हणणे आहे की पुरवठा धक्के / धोके किंवा परीव्ययजन्य हे मंदीयुक्त भावफुगवट्यास जबाबदार असणारे प्रमुख घटक आहेत तर जिथे इतरांचे म्हणणे होते की मंदीयुक्त भावफुगवटा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या असामान्य आर्थिक घटनेमागील मुख्य कारण म्हणजे मागणीजन्य हे आहे. मंदीयुक्त भावफुगवटा होण्यास कारणीभूत असलेले घटक खालीलप्रमाणे आहेत.

१) धोरण बदल:

लोकशाही सरकारे मतदानावर लक्ष ठेवून मूलभूत उत्पन्न धोरण, शेतकरी कर्जमाफी, नि:शुल्क वीज, खरेदी किंमतीत वाढ आणि पगार व वेतनात वाढ यासारखे लोकप्रिय

munotes.in

धोरणात्मक उपाय लागू करु शकतात. या सर्व उपाययोजनांमुळे मागणीच्या वाढीच्या तुलनेत वस्तू व सेवांच्या उत्पादनात कमी वाढ झाली आहे.

२) संरचनात्मक बेरोजगारीत वाढ:

पारंपारिक उद्योगात घट झाल्यास आपल्याकडे अधिक संरचनात्मक बेरोजगारी आणि कमी उत्पादन मिळू शकते. अशाप्रकारे जरी महागाई देखील वाढत असेल तरी आपल्याला जास्त बेरोजगारी मिळू शकेल.

३) अमेरिकेतील कारणे:

कृषी उत्पादनांचा पुरवठा कमी होणे, डॉलरची उदासिनता / मंदी, वेतन आणि किंमत नियंत्रण निर्मूलन हे देखील अमेरिकेमधील पुरवठा हादऱ्यास / धक्यास जबाबदार आहेत ज्यामुळे मंदीयुक्त भावफुगवटा होतो. १९६० च्या उत्तरार्धात व्हिएतनामच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकने मोठा लष्करी खर्च केल्यामुळे १९७० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात महागाईचा दर वाढण्याची अपेक्षा कामगारांना केली होती. त्यामुळे कामगार संघटनांनी जास्त वेतनाची मागणी केली आणि जास्त वेतन मिळवण्यात यश मिळविले ज्यामुळे नंतर खरेदी शक्ती वाढल्यामुळे महागाईची समस्या निर्माण झाली. यामुळे पद याच्या परिणामामुळे खर्च जास्त झाला / वाढला, उत्पादन घसरले आणि एकूण पुरवठा वक्र डावीकडे सरकला ज्यामुळे शेवटी मंदीयुक्त भावफुगवटा झाला.

२.४ मंदीयुक्त भावफुगवट्याचे परिणाम (CONSEQUENCES OF STAGFLATION)

- मंदीयुक्त भावफुगवटा म्हणजे कुंठित (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) अर्थव्यवस्थेतील महागाई आणि बेरोजगारीचे सहजीवन होय. कुंठित अर्थव्यवस्थेमध्ये महागाई ही मंदीयुक्त भावफुगवट्याची परिस्थिती आहे. त्यामुळे महागाई आणि मंदीशी संबंधित सर्व नकारात्मक बाबी यात आहेत. फिलिप्स वक्राच्या निष्कर्षाकडे (अनुमानाकडे) दुर्लक्ष करणारी ही एक विचित्र परिस्थिती आहे.

- ही अशी परिस्थिती आहे जिथे अर्थव्यवस्था कुंठित (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) असते. उद्दिष्टि / उत्पादन आणि रोजगार रखडलेले / कुंठित आहेत, वाढत नाहीत, तरीही किंमती सतत वाढत जातात.

- उत्पादन आणि रोजगाराच्या बाबतीत अर्थव्यवस्था मंदीच्या स्थितीत आहे. याचा अर्थ अर्थव्यवस्था ही कुंठित (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) स्थिर स्थितीत आहे.

- बेरोजगारी वाढत असताना, किंमत वाढीमुळे मिलणाऱ्या प्रोत्साहनांना गुंतवणूक प्रतिसाद देत नाही. गुंतवणूकीत घट झाल्यामुळे वस्तू आणि सेवांचे उत्पादन कमी होते.

- येथे पडझडीचे / अधःपतनाचे दुष्टचक्र आहे. गुंतवणूक कमी झाल्याने किंवा गुंतवणूकीत घट झाल्यामुळे उत्पादन घटते आणि परिणामी पुन्हा उत्पन्न कमी होते किंवा घटते. यामुळे बचतीत घट होते आणि नंतर गुंतवणूकीत घट होते .

- वर स्पष्ट केलेल्या परिस्थितीमुळे खरेतर किंमतीत घट झाली पाहिजे. पण त्याउलट किंमतीची पातळी वाढते. तथापि, ही महागाई जास्त गुंतवणूक रोजगार आकर्षित करत नाही.

चलनवाढ आणि बेरोजगारीमधील सममूल्यनाचा अर्थव्यवस्थेला फायदा होत नाही. जेथे लोक महागाई आणि बेरोजगारीच्या दुहेरी समस्यांपासून त्रस्त असतात तेथे संबंध थेट असतो. उत्पादन आणि पुरवठा कमी होतो, ज्यामुळे उत्पन्न आणि रोजगार कमी केले जातात आणि त्याचवेळी किमतींना वर ढकलले. अधिक उत्पादन आणि रोजगाराला प्रोत्साहित करण्यासाठी कोणत्याही अतिरिक्त पैशाच्या पुरवठ्यामुळे वस्तुंच्या आणि सेवांच्या पुरवठ्याकडून अगदी अल्पप्रतिसाद मिळत केवळ किमतींमध्ये वाढ होईल. खालील आकृती ही उत्पादन / उद्दिष्टि आणि किंमत वरील परिणाम स्पष्ट करते.



आकृती २.१

वरील आकृतीत X एक्स अक्षावर उत्पादन / उद्दिष्टि दर्शविली जाते आणि Y अक्षावर

किंमत पातळी दर्शविली जाते. मूळ एकत्रित मागणी वक्र AD_1 हा मूळ एकत्रीत पुरवठा वक्र AS_1 यास E_1 या समतोल बिंदूवर / बिंदुपाशी छेदतो. उत्पादन / उद्दिष्टि OY_1 आहे आणि किंमत OP_1 आहे. एकूण पुरवठा वक्र डावीकडे म्हणजेच AS_2 पर्यत डावीकडे सरकतो. नवीन समतोल बिंदू E_2 आहे. उत्पादन OY_1 हे OY_2 पासून पर्यन्त कमी होते आणि किंमत ही OP_1 पासून OP_2 पर्यत वाढते. येथे अर्थव्यवस्था ही कुंठितता (अवरुद्ध, गतिशून्य, स्थिर) (उत्पादनात घसरण) आणि चलनावाढ (वाढत्या किंमती) या दोन्ही गोष्टींचा अनुभव घेते. या परिस्थितीला मंदीयुक्त भावफुगवटा असे म्हणतात.

जर आपण फिलिप्स वक्राद्वारे परिस्थितीबद्दल चर्चा केली तर आपल्याकडे वर सरकत जाणारा पुरवठा वक्र असेल जिथे किंमतींची पातळी आणि बेरोजगारी एकत्र वाढतात.

जर आपण फिलिप्स कव्हद्वारे परिस्थितीबद्दल चर्चा केली तर आमच्याकडे वरची उत्तर पुरवठा वक्र असेल जिथे किंमतींची पातळी आणि बेरोजगारी एकत्र वाढतात.

अर्थव्यवस्थेला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सरकारला अशा उपाययोजनांचे मिश्रण अवलंबण्याची आवश्यकता असू शकते ज्याचा एकाच वेळी महागाईवर आणि वस्तू व सेवांचे उत्पादन उत्तेजित करण्यावर परिणाम होतो.

२.५ सारांश (SUMMARY)

मंदीयुक्त भावफुगवटा या शब्दाचा अर्थ असा आहे की अशी स्थिती जी स्थिरता आणि चलनवाढ सह-अस्तित्त्वात / एकत्र असतात. कमी आर्थिक वाढ, वाढती बेरोजगारी आणि महागाईचा उच्च दर हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हे फिलिप्स वक्राच्या निष्कर्षाच्या विरुद्ध आहे, जे महागाई आणि बेरोजगारीमधील व्यस्त संबंध दर्शविते. यामध्ये आपल्याला किंमतीच्या पातळीत सातत्याने झालेली वाढ आणि बेरोजगारीचे वाढलेले प्रमाण यांना सामोरे जावे लागते.

२.६ प्रश्न (QUESTIONS)

१) मंदीयुक्त भावफुगवटा अर्थ स्पष्ट करा.

२) भावफुगवटा कारणे कोणती ते उदाहरणांदाखल स्पष्ट करा.

३) मंदीयुक्त भावफुगवटाचे परिणाम कोणते याचे स्पष्टीकरण द्या.

४) पुरवठयाच्या बाजूच्या अर्थशास्त्राची सखोल चर्चा करा.

*****

मॉड्युल-II

३

मौद्रिक धोरण

घटक रचना

३.० उद्दिष्टये

३.१ प्रस्तावना

३.२ मौद्रिक धोरणाची उद्दिष्टये

३.३ मौद्रिक धोरणाची साधने

३.४ मौद्रिक धोरणाच्या मर्यादा

३.५ विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये मौद्रिक धोरणाची भूमिका

३.६ सारांश

३.७ प्रश्न

३.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

- चलनविषयक / मौद्रिक धोरण म्हणजे काय हे जाणून घेणे.
- चलनविषयक धोरणाच्या साधनांचा अभ्यास करणे.
- मौद्रिक धोरणाची उद्दिष्टये अभ्यासणे.
- मौद्रिक धोरणाच्या मर्यादांचा आढावा घेणे.
- विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये मौद्रिक धोरणाची भूमिका अभ्यासणे.

३.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

१९३० च्या महामंदीनंतर लॉर्ड केन्स यांनी सर्वात प्रथम मौद्रिक धोरणाची परिणामकारकता सिध्द करुन दाखवली. अर्थव्यवस्थेतील किंमत स्थिरता, रोजगार प्राप्ति, आर्थिक वृध्दी इ. उद्दिष्टप्राप्तीसाठी राजकोषियक धोरणाबरोबरच मौद्रिक धोरणाला देखिल महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. मौद्रिक धोरणालाच चलनविषयक धोरण किंवा नाणेविषयक नीती असेही म्हटले जाते. अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्याचे मध्यवर्ती बँकेच्या हातातील महत्वाचे साधन म्हणजेच चलनविषयक धोरण होय.

मौद्रिक / चलनविषयक धोरण:

मौद्रिक धोरण ही संकल्पना पुढील व्याख्यांव्दारे अधिक स्पष्ट करता येईल.

munotes.in

१) प्रा. ए.जी हॉर्ट:

“पैशाच्या साठ्यावर किंवा लोकांच्या पैशाच्या मागणीवर प्रभाव टाकणाऱ्या आणि सार्वजनिक रोखतेची स्थिती बदलणाऱ्या धोरणास चलनविषयक धोरण असे म्हणतात.”

२) प्रा. हॅरी जॉन्सन:

“आर्थिक धोरणाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँकेच्या पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्याचे एक साधन म्हणजे चलनविषयक धोरण होय.”

थोडक्यात अर्थव्यवस्थेची महत्वाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्यासाठी केंद्रिय बँकेकडून जे प्रयत्न केले जातात त्यांना चलनविषयक धोरण असे म्हणतात. या धोरणाची आखणी व अंमल बजावणी करण्याची जबाबदारी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे असते.

३.२ चलनविषयक धोरणाची उद्दिष्टये (OBJECTIVES OF MONETARY POLICY)

स्थळ, काळ सापेक्ष प्रत्येक देशाची मौद्रिक धोरणाची उद्दिष्ट्ये वेगवेगळी असू शकतात. परंतू तरीदेखिल आर्थिक धोरणाची विविध उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मौद्रिक धोरणाचा योग्य वापर करता येतो. कोणत्याही देशातील चलनविषयक धोरणाव्दारे त्या देशातील मध्यवर्ती बँकेला पुढील काही महत्वाची उद्दिष्ट्ये साध्य करता येतात.

१) आर्थिक वृध्दीचा अपेक्षित दर साध्य करणे:

कोणत्याही देशाच्या जलद आर्थिक वृध्दीमूळे त्या देशातील राष्ट्रीय उत्पन्न, बचत उपभोग, गुंतवणूक, इ. मध्ये वाढ घडून येते. परंतू त्यासाठी जास्तित जास्त बचत, गुंतवणूक व भांडवलाची गरज असते. मौद्रिक धोरणाचा एक महत्वाचा उद्देश म्हणजेच प्रार्थमिक, व्दीतीय आणि सेवा व पायाभूत क्षेत्रांना पुरेसा निधी उपलब्ध करुन देणे हा होय. यासाठी अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बचत गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी बँका व वित्तीय संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरवून बँकांना ठेवी स्वीकारणे आणि कर्जे देण्यास प्रवृत्त करण्यासाठी मौद्रिक धोरण मदत करते.

मध्यवर्ती बँकेच्या कर्जपुरवठ्यातून नवीन रोजगार संधी उपलब्ध होतात. त्यातून मागणी वाढून वित्तीय व्यवहारांचा वेग वाढू लागतो व त्यातून आर्थिक विकासाल गती मिळू लागते.

२) किंमत स्थैर्य:

सुवर्ण परिमाण अस्तित्वात असेपर्यंत विनिमय दर स्थिर ठेवणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट्ये समजले जात असे परंतू अलिकडील काळात देशातील किंमतपातळी स्थिर ठेवणे म्हणजेच देशांतर्गत पैसाचे अंतर्गत मूल्य स्थिर ठेवून भाववाढ किंवा भावघट यातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढून अर्थव्यवस्थेत किंमत स्थिरता निर्माण करणे हे मौद्रिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट्ये समजले जाते.

munotes.in

भाववाढ किंवा भावघट टाळण्यासाठी किंमत स्थैर्य असणे अत्यंत आवश्यक असते. किंमत जर स्थिर असेल तर उत्पादन व रोजगारात वाढ घडून येते.

मध्यवर्ती बँक आपल्या मौद्रिक धोरणाव्दारे भाववाढीच्या परिस्थितीवर किंवा भावघटीवर संख्यात्मक किंवा गुणात्मक साधनांव्दारे नियंत्रण ठेवून किंमत स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करते.

३) विनिमय दर स्थिरता:

१९ व्या शतकाच्या प्रारंभी विदेशी व्यापार सतत वाढत होता. त्याचवेळी सूवर्ण चलन परिमाण पध्दती अस्तित्वात होती. त्यावेळी देशातील चलनाचे इतर देशातील चलनाच्या संदर्भात असलेले बाह्य मूल्य (विनिमय दर) स्थिर ठेवणे हे मौद्रिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट्ये मानले गेले. परंतू सुवर्ण चलन पध्दती जाऊन आता कागदी चलन पध्दतीमध्ये हा विनिमयदर स्थिर ठेवणे मध्यवर्ती बँकेला अवघड बनले आहे. परंतू विनिमयदरात स्थिरता ठेवण्याची ही जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे सूपूर्त करण्यात आलेली आहे.

विदेशी व्यापारात वाढ घडवून आणून देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी विनिमय दरात स्थिरता असणे अत्यंत महत्वाचे आहे. मध्यवर्ती बँक आपल्याकडील विदेशी चलन साठ्यात आवश्यक ते बदल करुन विनिमयाचा दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यातून सट्टेबाजी सारख्या प्रकारांना आपोआप आळा बसतो.

४) पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे:

कोणत्याही देशाचे मुख्य उद्दिष्ट्ये अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे असते म्हणजेच आर्थिक कल्याणाबरोबरच देशातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार पुरविणे होय. लॉर्ड केन्स यांनी महामंदीतून बाहेर पडण्यासाठी रोजगार वाढ हा उपाय सुचविलेला होता.

उपलब्ध वेतनदरावर ज्यांची काम करण्याची इच्छा व क्षमता आहे. अशा सर्वांना काम (रोजगार) मिळणे म्हणजेच पूर्ण रोजगार होय. लोकांना रोजगार मिळाल्यास त्याचे उत्पन्न वाढून मागणी वाढून राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

मौद्रिक धोरणाव्दारे व्याजदरात बदल करुन भांडवलाची कार्यक्षमता वाढविल्यास गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळून उत्पादन वाढीस चालना मिळेल व उत्पादन वाढीतून उदयोग वाढीस लागून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करता येतील.

५) तटस्थ पैसा:

प्रा. हायेक, विकस्टीड, रॉबर्टसन, कोपमन इ. अर्थतज्ज्ञांनी 'तटस्थ पैसा' हे मौद्रिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट्ये सुचविले आहे.

अर्थव्यवस्थेत खरेदी – विक्रिच्या व्यवहारासाठी जितका पैसा आवश्यक आहे. तीतकाच पैसा चलनात ठेवणे म्हणजे तटस्थ पैसा होय. पैशाचा परिणामकारक पुरवठा स्थिर ठेवला तर किंमतपातळीवर त्याचा फारसा परिणाम होत नाही. या स्थितीत पैसा विनिमयाचे माध्यम म्हणून काम करतो तर पैशाचा किंमतीवर परिणाम होत नाही.

६) व्यवहार तोल संतूलन:

दोन देशातील आयात – निर्यात व्यवहारांचा मांडलेला लेखाजोखा म्हणजेच व्यवहार तोल होय. कोणत्याही देशाचा प्रमुख उद्देश हा आयात व निर्यात व्यापारात म्हणजेच व्यवहारतोलात संतूलन ठेवणे हा असतो. जर आयात जास्त व निर्यात कमी असेल तर त्या देशाच्या व्यवहारतोलात तूट निर्माण होते. ही तूट वाढत गेल्यास तूटीची भरपाई करण्यासाठी विदेशी कर्जे काढावी लागतात. त्यातून देश कर्जाच्या सापळ्यात अडकण्याची शक्यता असते.

जर मौद्रिक धोरणाव्दारे किंमत स्थिर ठेवण्यात यश आले तर देशाची निर्यात वाढून व्यापारी तूट कमी होऊन वाढाव्याची परिस्थिती निर्माण होईल. थोडक्यात मौद्रिक धोरणाव्दारे देशाच्या व्यवहार तोलातील असंतूलन दुर करणे हे महत्वाचे उद्दिष्ट्ये पूर्ण करता येते.

७) आर्थिक विकास:

उत्पादन क्षमता व चलनाची एकूण मागणी यांत योग्य समन्वय साधावा लागतो. अनेकदा कर्जपुरवठ्यावर नियंत्रण ठेवावे लागते. किंवा चलनघटीचा धोका असेल तर कर्ज पुरवठ्याला प्रोत्साहन दयावे लागते. आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बचत गुंतवणूकीला योग्य असे वातावरण निर्माण करावे लागते.

३.३ मौद्रिक धोरणाची साधने (पतनियंत्रणाचे मार्ग) (INSTRUMENTS OF MONETARY POLICY)

अर्थव्यवस्थेतील पतपैशावर नियंत्रण ठेवण्याचे महत्वाचे कार्य त्या देशातील मध्यवर्ती बँकेला पार पाडावे लागते. मध्यवर्ती बँकेच्या मौद्रिक धोरणाव्दारे अर्थव्यवस्थेतील पतचलन निर्मितीचे नियमन करता येते. त्यासाठी मध्यवर्ती बँकेला ज्या साधनांचा वापर करावा लागतो त्यांचे पुढील दोन प्रकारात वर्गीकरण करता येते.

मौद्रिक धोरणाची साधने

संख्यात्मक साधने

१) बँक रेट
२) खुल्या बाजारात रोख्यांची खरेदी-विक्री
३) रोख राखिव निधीचे प्रमाण

गुणात्मक साधने

१) कर्ज तारण यातील अंतर वाढविणे.
२) विशिष्ट कामासाठी कर्ज देणे.
३) उपभोग्य कर्जाचे नियंत्रण.
४) कर्ज वाटप धोरण.
५) प्रत्यक्ष कारवाई.
६) नैतिक समजावणी.
७) प्रसिध्दी.

munotes.in

अ) संख्यात्मक साधने:

पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने म्हणजेच अशी साधने की ज्या व्दारे देशातील एकूण पतपैशाची संख्या प्रभावित केली जाते. या साधनांचा वापर करुन मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवते. या साधनांना पतनियंत्रणाची 'सामान्य साधने' असेही म्हटले जाते.

१) बँकरेट:

देशातील मध्यवर्ती बँक ज्या दराने व्यापारी बँकांना कर्जे देते त्या व्याजाच्या दराला बँकरेट असे म्हणतात. तसेच ज्या दराने मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या हुंडयांची वटणावळ किंवा पुनर्वटणावळ करुन देते त्या वटावदाराला बँकरेट असे म्हणतात.

बँकेरेटच्या प्रमाणात परिस्थितीनुसार बदल करुन मध्यवर्ती बँक पतचलनाचे नियंत्रण करते. जर अर्थव्यवस्थेत पैशाचे प्रमाण वाढलेले असेल व ते नियंत्रित करायचे असेल तर मध्यवर्ती बँक बँकरेट मध्ये वाढ करते. त्यामुळे मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांना जी कर्जे दिली जातात ती महाग बनल्याने व्यापारी बँका कर्ज वाटप कमी प्रमाणात करतील परिणामत: अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण आपोआप नियंत्रित होईल.

या उलट जर अर्थव्यवस्थेत पतनिर्मितीला चालना दयायची असेल तर मध्यवर्ती बँक बँकरेट मध्ये घट करेल. त्यामुळे व्यापारी बँकांना मध्यवर्ती बँकेकडून मिळणारे कर्जे स्वस्त बनल्याने व्यापारी बँकांची कर्जवाटप क्षमता अधिक राहून अर्थव्यवस्थेत पतपैशाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

२) खुल्या बाजारातील कर्जरोख्यांची खरेदी विक्री:

या साधनाचा वापर करुन मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेतील पतनियंत्रणाची जबाबदारी पूर्ण करते. त्यासाठी सरकारी उपक्रमांच्या कर्जरोख्यांची जाणीवपूर्वक मध्यवर्ती बँकेमार्फत खरेदी-विक्री केली जाते.

ज्यावेळी अर्थव्यवस्थेत पैशाचे प्रमाण वाढते त्यावेळी मध्यवर्तीबँक व्यापारी बँकांकडील आणि सर्वसामान्य लोकांकडील पैसा स्वत:कडे घेण्यासाठी सरकारी कर्जरोख्यांची व्यापारी बँका व व्यक्तींना विक्री करते त्यामुळे आपोआप त्यांच्याकडील अतिरीक्त पैसा मध्यवर्ती बँकेकडे गुंतविला जाऊन व्यपारी बँकांची पतनिर्मितीची क्षमता घटते.

याऊलट ज्यावेळी अर्थव्यवस्थेत पतपैशाची टंचाई निर्माण होते. तेव्हा विक्री केलेल्या कर्जरोख्यांची आता खरेदी करुन व्यापारी बँका व व्यक्तींकडील पैशाच्या प्रमाणात वाढ घडवून आणली जाते.

३) रोख राखीव निधीचे प्रमाण:

प्रत्येक देशात व्यापारी बँकांना स्वत:जवळ जमा झालेल्या एकूण ठेवींच्या एका विशिष्ट प्रमाणात रक्कम मध्यवर्ती बँकेकडे ठेवण्याचे कायदेशिर बंधन असते. यालाच राखीव निधीचे प्रमाण असे म्हणतात. मध्यवर्ती बँकेला या प्रमाणात परिस्थितीनुसार बदल

करण्याचा अधिकार असतो. या अधिकाराचा वापर करुन मध्यवर्ती बँक पतचलनाचे नियंत्रण करु शकते.

राखीव निधीच्या प्रमाणात वाढ केल्यास व्यापारी बँकांच्या ठेवींपैकी अधिक हिस्सा मध्यवर्ती बँकेकडे जमा झाल्याने बँकांच्या पतनिर्मीतीच्या कार्यावर आपोआप मर्यादा निर्माण होते.

याऊलट राखीव निधीच्या प्रमाणात घट केल्यास व्यापारी बँकांकडे एकूण ठेवींचे प्रमाण अधिक असल्याने पतनिर्मितीला प्रोत्साहन मिळते.

ब) गुणात्मक साधने:

पतपुरवठ्यांची गुणवत्ता ठरविणारी साधने म्हणजेच गुणात्मक साधने होय. मौद्रिक धोरणाच्या संख्यात्मक साधनांच्या काही मर्यादा असल्याने पतनियंत्रणासाठी गुणात्मक साधनांचा वापर केला जातो. या साधनांना निवडक (Selective) साधने असेदेखिल म्हटले जाते.

अलिकडील काळात मध्यवर्ती बँक ज्या गुणात्मक साधनांचा वापर करतात त्यामध्ये पुढील साधनांचा समावेश होतो.

१) कर्ज आणि तारण यामधील अंतर वाढविणे:

बँका ग्राहकांना कर्जे देतांना विविध तारणांवर आधारीत कर्जे देत असतात. यामध्ये व्यापारी, मध्यस्त यांचाही समावेश होतो. हे व्यापारी किंवा मध्यस्थ वस्तूंच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करीत असतात बँकेच्या कर्जाचा वापर हे व्यापारी वस्तूंची खरेदी व साठेबाजीसाठी करीत असतात. त्यातून कृत्रिम भाववाढ अशा अनिष्ट व्यापारी प्रवृत्ती वाढून सर्वसामान्यांना त्याची झळ बसते.

अशा वेळी व्यापारी बँका व्यापाऱ्यांना कर्जे देतांना कर्जरक्कम आणि व्यापाऱ्याने दिलेल्या तारणाची चालू बाजारभावाने होणारी किंमत यामधील अंतर (गाळा) वाढविते. त्यामुळे व्यापाऱ्यांचा कर्जपुरवठा नियंत्रित होऊन साठेबाजी सारख्या अनिष्ट प्रवृत्तीला आळा बसतो.

२) विशिष्ट कामासाठी कर्ज देणे:

पतपैशाच्या नियमनासाठी कोणत्या कार्यासाठी कर्जे दयावीत व कोणत्या कार्यासाठी कर्जे देऊ नयेत हे मध्यवर्ती बँक ठरविते. अर्थव्यवस्थेतील चलनवाढीची परिस्थिती विचारात घेऊन मध्यवर्ती बँक व्यापारी बँकामार्फत केवळ अत्यावश्यक आणि उत्पादक कार्यासाठीच कर्ज पुरवठा करते अनावश्यक व अनुत्पादक कार्यासाठी कर्जपुरवठा नाकारला जातो.

३) उपभोग्य कर्जाचे नियंत्रण:

अनेकदा अर्थव्यस्थेतील बहुतांश लोकामार्फत ऐशआराम आणि चैनिच्या उपभोग्य च्या खरेदीसाठी व्यापारी बँकांकडून कर्जे घेतली जातात. उदा. मोटार, प्रिÀज, टिव्ही, एसी इ. परंतू अशा उपभोग्य कर्जांच्या वाटपातून अर्थव्यवस्थेत चलनवाढीचा धोका निर्माण होतो.

munotes.in

अशावेळी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना सुचना देऊन उपभोग्य कर्जावर मार्यादा घालू शकते.

४) कर्ज वाटप धोरण:

व्यापारी बँका आपल्या कर्ज वाटप धोरणातून अर्थव्यवस्थेतील पतनिर्मितीचे कार्य करीत असतात. त्यासाठी त्यांना मध्यवर्ती बँकेडून पतपुरवठा होत असतो. परंतू जर अर्थव्यवस्थेत पतपैशाचे नियंत्रण करायचे असेल तेव्हा मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना किती पैसा पुरवायचा याचे प्रमाण ठरवून त्या प्रमाणातच कर्ज वाटप करते.

त्यामुळे व्यापारी बँकांची रोखता घटून कर्ज वाटप क्षमता नियंत्रित राहते त्यातून आपोआप पतनिर्मिती वर मर्यादा निर्माण होतात.

५) प्रत्यक्ष कारवाई:

अनेकदा व्यापारी बँका भरपूर नफा मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करतात त्यातून मोठ्या प्रमाणात पतनिर्मिती कर्ज वाटप करतात त्यातून मोठ्या प्रमाणात पतनिर्मिती घडून येते. परंतू त्याचवेळी बँका धोक्यात येऊन बँक बुडण्याची देखिल शक्यता असते अशा वेळी नियमबाह्य कार्य करणार्या बँकांना मध्यवर्ती बँक तशा सुचना देते. जर सुचनांचे उल्लंघन केले तर बँकांना मिळणाऱ्या सुविधा, सवलती नाकारल्या जातात. तसेच दंडात्मक किंवा कडक कायदेशिर कारवाई करण्याचा अधिकार मध्यवर्ती बँकेला आहे.

६) नैतिक समजावणी:

वरील प्रमाणे जर मध्यवर्ती बँकेने कडक कारवाई केली तर व्यापारी बँका आणि मध्यवर्ती बँक यामध्ये कटूता निर्माण होते ती टाळण्यासाठी मध्यवर्ती बँक 'नैतिक समाजावणी' या मार्गाचा अवलंब करतात याव्दारे मध्यवर्ती बँक देशातील व्यापारी बँकांना पतनियंत्रण धोरणाची आवश्यकता पटवून देऊन पतचलनवाढीचे धोके समजावून सांगते त्यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना विश्वासात घेऊन योग्य मार्गदर्शन करते.

७) प्रसिध्दी:

देशाची मध्यवर्ती बँक या नात्याने व्यापारी बँकाकडून आवश्यक माहिती मागवून घेऊन तीचे विश्लेषण व ती प्रसिद्ध करण्याचे महत्वाचे कार्य महयवर्ती बँकेला करावे लागते. त्यातून वेळोवेळी मध्यवर्ती बँकेने कोणकोणत्या धोरणांचा अवलंब केला याविषयी व्यापारी बँकांना माहिती मिळते. त्यातून व्यापारी बँका पतनियंत्रणाबाबत आपले स्वत:चे धोरण आणि निती कशी असावी याविषयी योग्य निर्णय घेवू शकतात.

३.४ मौद्रिक धोरणाच्या मर्यादा (LIMITATIONS OF MONETARY POLICY)

अल्प विकसित देशांमध्ये धोरणात्मक उद्दिष्टे पूर्ण करण्यात येणाऱ्या अडचणींमुळे आणि आधी चर्चा केल्याप्रमाणे स्थूल-आर्थिक उद्दिष्टांमधील अंतर्निहित विरोधाभासांमुळे मौद्रिक

किंवा चलनविषयक धोरणातील मर्यादा निर्माण होतात. गेल्या काही वर्षांतील मौद्रिक धोरणाने खालील मर्यादा उघड केल्या आहेत.

१. व्याप्ती मर्यादित: स्थूल-आर्थिक धोरणाची उद्दिष्टे केवळ मौद्रिक धोरणाच्या साधनांच्या मदतीने हाताळली जाऊ शकत नाहीत आणि साध्य केली जाऊ शकत नाहीत. उदाहरणार्थ, किंमत स्थिरता आणि विनिमय दर स्थिरता ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करण्यात भारतामध्ये मौद्रिक धोरण व्यावहारिकदृष्ट्या अयशस्वी ठरले आहे. १९७४-७५ मध्ये महागाईचा दर २५.२ टक्के इतका होता. नव्वदच्या दशकाच्या पहिल्या सहामाहीतही महागाईचा दर दुहेरी अंकात होता. चलनविषयक धोरणाची साधने अर्थव्यवस्थेच्या एकूण मागणीवर प्रभाव टाकू शकतात, परंतु पुरवठा व्यवस्थापनातील अपयशामुळे मौद्रिक धोरणाचा उद्देशच नाकारला जाईल. अशा प्रकारे चलनवाढीवर हल्ला करण्यासाठी चलन, वित्तीय, विनिमय दर आणि उत्पन्न धोरणांचे संयोजन आवश्यक आहे.

२. बँकेच्या पैशांपेक्षा चलनातील पैशाला प्राधान्य:

भारतासारख्या अल्प विकसित अर्थव्यवस्थांमध्ये, लोक सामान्यतः चलन पैशाला बँक पैशापेक्षा प्राधान्य देतात. बँकिंग विकासाचा अभाव, बँकिंग प्रक्रिया आणि पद्धतींबद्दलचे अज्ञान आणि देशात पसरलेली निरक्षरता यामुळे चलन पैशाला प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारे कायदेशीर राखीव आवश्यकतांमध्ये कपात करून विस्तारित मुद्रा धोरण पैशाच्या पुरवठ्यामध्ये इच्छित विस्तार लक्षात घेण्यास सक्षम होणार नाही. उदाहरणार्थ, कायदेशीर आवश्यकतांमध्ये पन्नास टक्के कपात केल्याने पैशांचा पुरवठा १०० टक्क्यांहून अधिक वाढेल, जर लोकांनी त्यांच्या ठेवी बँकांमधून काढल्या नाहीत. पैशांच्या पुरवठ्यातील वास्तविक वाढ ठेवी काढण्याच्या प्रमाणात कमी होईल.

एक उदाहरण घेऊ. आपण असे गृहीत धरू की व्यावसायिक बँकांकडे अतिरिक्त राखीव रक्कम ९०० अब्ज आहे आणि रोख राखीव प्रमाण १० टक्के आहे. व्युत्पन्न क्रेडिट ९०० अब्ज × १०० ~ १० = ९,००० अब्ज असेल. आता रोख राखीव गुणोत्तर पाच टक्क्यांपर्यंत कमी केल्यास पत विस्तार ९५० अब्ज × १०० ~ ५ = १९,००० अब्ज होईल. तथापि, जर लोकांनी बँकिंग प्रणालीतून ४५० अब्ज रुपये काढले, तर क्रेडिटचा विस्तार ५०० अब्ज × १०० ~ ५ = १०,००० अब्ज इतकाच होईल. भारतासारख्या अल्प-विकसित अर्थव्यवस्थांमध्ये, पैशाच्या पुरवठ्याचा एक मोठा भाग रोख स्वरूपात लोकांकडे असतो आणि ठेवींच्या स्वरूपात बँकिंग प्रणालीकडे परत येत नाही. यामुळे बँकिंग प्रणालीच्या रिझर्व्हच्या वाढीच्या आधारावर नवीन क्रेडिट्स तयार करण्याच्या क्षमतेवर गंभीर मर्यादा निर्माण होते.

३. मुद्रा बाजार द्वैतवाद:

बँक दर, रोख राखीव प्रमाण आणि खुल्या बाजारातील व्यवहार यासारख्या चलनविषयक धोरण साधनांचा वापर करून अंमलात आणलेल्या आकुंचनात्मक मौद्रिक धोरणाचा मुद्रा बाजार चांगल्या प्रकारे विकसित किंवा पूर्णपणे एकत्रित नसल्यास इच्छित परिणाम होऊ शकत नाही. व्यापारी बँका, परदेशी बँका, सहकारी बँका, वित्त निगम इत्यादींचा समावेश असलेला संघटित मुद्रा बाजार मध्यवर्ती बँकेच्या धोरणात्मक उद्दिष्टांनुसार कार्य करू

munotes.in

शकतो, तर असंघटित क्षेत्र ज्यामध्ये अनियंत्रित बिगर बँकिंग, वित्तीय मध्यस्थ, देशी बँकर आणि पैसा यांचा समावेश होतो. कर्जदारांचा संघटित क्षेत्राशी कोणताही संबंध नाही आणि ते केंद्रिय बँकेच्या मौद्रिक धोरणाचे पालन करण्यास कायदेशीररित्या बंधनकारक नाहीत. पुढे, ट्रेझरी आणि कमर्शियल बिल मार्केट सारख्या मुद्रा बाजाराचे उप-बाजार चांगले विकसित नसतील तेव्हा, मौद्रिक धोरणाची उद्दिष्टे पूर्णपणे यशस्वी होण्याची शक्यता कमी असेल.

४. समांतर अर्थव्यवस्था:

जेव्हा एखादा आर्थिक व्यवहार अधिकृतपणे नोंदविला जात नाही किंवा नोंदविला जात नाही तेव्हा तो काळा किंवा बेकायदेशीर व्यवहार म्हणून ओळखला जातो. अल्पविकसित अर्थव्यवस्थांमध्ये अशा काळ्या व्यवहारांचे आकार आणि प्रमाण प्रचंड असते.

उदाहरणार्थ, भारतातील काळी किंवा समांतर अर्थव्यवस्था ही भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५० टक्क्यांहून अधिक असल्याचा अंदाज आहे. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे डॉ. सूरज गुप्ता यांनी काळ्या उत्पन्नाच्या निर्मितीवर एक अभ्यास केला आणि त्यांना असे दिसून आले की १९८०-८१, १९८३-८४ आणि १९८७-८८ या वर्षांमध्ये सध्याच्या किंमतींवर काळ्या उत्पन्नाची किंमत जीडीपीच्या ४१, ४५ आणि ५० टक्के होती. १९८४-९५ मध्ये, संसदेच्या स्थायी समितीने भारतातील GNP अंदाजाच्या १३० टक्के काळ्या पैशाचा अंदाज लावला होता. चलनात असलेला काळा पैसा ११ ट्रिलियन असण्याचा अंदाज होता, तर अधिकृत GNP अंदाज ८.४३ ट्रिलियन होता. अशा परिस्थितीत, मौद्रिक धोरण साधनांचे मौद्रिक व्यवस्थापनाची अप्रभावी साधने म्हणून वर्णन केले जाऊ शकते.

५. केंद्रिय किंवा मध्यवर्ती बँकेच्या स्वातंत्र्याचा आणि स्वायत्ततेचा अभाव:

एक केंद्रीय बँक जी सरकारच्या धोरणांच्या अधीन आहे आणि तिला राष्ट्रीय आर्थिक हितसंबंधांनुसार आर्थिक धोरण ठरवण्यासाठी आवश्यक स्वायत्तता आणि स्वातंत्र्य नाही, ती स्वतःची धोरणात्मक उद्दिष्टे साध्य करण्याची कल्पना करू शकत नाही. उदाहरणार्थ, फेडरल रिझर्व्ह बँक जी युनायटेड स्टेट्सची (US) केंद्रिय बँक आहे ती पूर्णपणे स्वायत्त आणि स्वतंत्र सरकारी एजन्सी म्हणून कार्य करते. त्याला थेट युनायटेड स्टेट्स सरकार जबाबदार आहे. तथापि, तिच्या आणि सरकारच्या मतांमध्ये कोणताही संघर्ष झाल्यास, फेडरल रिझर्व्ह बँक नेहमीच राष्ट्राच्या आर्थिक हितासाठी किंवा सार्वजनिक हितासाठी कार्य करते. याचे कारण असे की फेडरल रिझर्व्ह बँकच्या गव्हर्नरांनी घेतलेले निर्णय पूर्णपणे स्वतंत्र असतात आणि बाहेरून प्रभावित होऊ शकत नाहीत. ऐतिहासिक अभ्यासांनी हे सिद्ध केले आहे की, स्वतंत्र केंद्रीय बँक महागाई नियंत्रित करण्यात आणि त्याद्वारे सरकारच्या कार्यकारी शाखेद्वारे नियंत्रित असलेल्या केंद्रीय बँकांपेक्षा देशाच्या चलनाचे मूल्य संरक्षित करण्यात अधिक यशस्वी आहे. भारतीय रिझर्व्ह बँक स्वतंत्र क्षणिक धोरणाचा अवलंब करण्याइतकी स्वायत्त नाही. उदाहरणार्थ, सरकारी तूट भरून काढण्यासाठी चलन पुरवठ्याच्या विस्तारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर नेहमीच चलनवाढीचा दबाव निर्माण झाला आहे आणि भारत सरकारने रिझर्व्ह बँकेला महागाई नियंत्रित करण्याची परवानगी दिली नाही कारण अशा कृतीमुळे दर कमी होईल असे वाटले. अर्थव्यवस्थेच्या वाढीचे.

व्याजदराचे प्रशासन आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना पतपुरवठा हे अनेकदा रिझर्व्ह बँकेच्या धोरणांपेक्षा सरकारच्या धोरणानुसार ठरवले गेले होते. तथापि, अर्थव्यवस्थेचे मुक्त बाजार अर्थव्यवस्थेत रूपांतर करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आणि अर्थव्यवस्था अधिक प्रगत आणि एकात्मिक झाल्यानंतर, आर्थिक धोरणावरील सरकारी धोरणाची प्राथमिकता यासारख्या प्रणालीगत मर्यादा नाहीशा होऊ शकतात. चलनविषयक किंवा मौद्रिक धोरण मुक्त बाजार अर्थव्यवस्थेतच अधिक प्रभावी ठरू शकते.

६. तेजी आणि मंदी नियंत्रित करण्यात कमी प्रभावी:

जेव्हा गुंतवणूक, रोजगार, उत्पादन, उत्पन्न, मागणी आणि किंमतीच्या उत्तरोत्तर उच्च दरांसह अर्थव्यवस्था भरभराटिस येते, तेव्हा चलनविषयक धोरण उच्च महागाई दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी फारसे प्रभावी ठरू शकत नाही, विशेषत: जेव्हा भांडवलावरील परताव्याचा दर प्रचलित व्याजदरांपेक्षा खूप जास्त असतो. उच्च व्याजदरांचा गुंतवणुकीची मागणी आणि किंमतींवर परिणाम होण्यास बराच वेळ लागेल. तुलनेने कमी कार्यक्षम कंपन्या त्यांची गुंतवणूक काढून घेण्यास सुरुवात करतील, त्यामुळे रोजगार, उत्पन्न, मागणी आणि किमती कमी होतील. त्याचप्रमाणे, मंदीच्या काळात, जेव्हा गुंतवणुकीवरील परताव्याचा दर एकतर अनिश्चित किंवा नगण्यपणे कमी असतो, तेव्हा पैशाचा पुरवठा वाढला आणि व्याजदर कमी केले तरीही गुंतवणुकीची मागणी वाढणार नाही. अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढण्यासाठी वित्तीय धोरण अधिक प्रभावी आहे.

७. अर्थव्यवस्थेतील सामान्य तरलतेवर नियंत्रणाचा अभाव:

अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी आणि त्यामुळे किमती कमी करण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यात घट आणि उच्च व्याजदर पुरेसे प्रभावी नाहीत. कारण खर्च करण्याची क्षमता केवळ पैशाच्या पुरवठ्याद्वारेच नाही, तर व्यक्ती आणि कंपन्यांची तरलता स्थिती देखील निर्धारित केली जाते. रोख शिल्लक, बँक शिल्लक, वेळ आणि बचत ठेवी, आर्थिक मालमत्ता आणि कर्ज घेण्याची शक्यता यासारख्या घटकांद्वारे सामान्य तरलता स्थिती निर्धारित केली जाते. अशा प्रकारे, किमती नियंत्रित करण्याचा अधिक प्रभावी मार्ग म्हणजे अर्थव्यवस्थेतील सामान्य तरलता नियंत्रित करणे.

३.५ विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये मौद्रिक धोरणाची भूमिका (ROLE OF MONETARY POLICY IN DEVELOPING ECONOMIES)

विकसनशील अर्थव्यवस्थेतील चलनविषयक धोरण हे विकसित अर्थव्यवस्थेपेक्षा मुख्यतः भिन्न आर्थिक परिस्थिती आणि दोन प्रकारच्या अर्थव्यवस्थांच्या आवश्यकतांमुळे बरेच वेगळे असावे. एक विकसित देश मौद्रिक धोरणाचे उद्दिष्ट म्हणून पूर्ण रोजगार किंवा किंमत स्थिरीकरण किंवा विनिमय स्थिरता स्वीकारू शकतो. परंतु विकसनशील किंवा अविकसित देशात आर्थिक वाढ ही प्राथमिक आणि मूलभूत गरज असते. अशाप्रकारे, विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट असले पाहिजे, अशा आर्थिक धोरणाचा अवलंब करून विकसनशील अर्थव्यवस्थेचे मौद्रिक प्राधिकरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते ज्यामुळे जलद आर्थिक वाढीसाठी आवश्यक

munotes.in

परिस्थिती निर्माण होते. चलनविषयक धोरण विकसनशील अर्थव्यवस्थांच्या खालील विकासात्मक गरजा पूर्ण करू शकते.

१. विकासात्मक भूमिका:

विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये, पतपुरवठा आणि पत वापरावर प्रभाव टाकून, चलनवाढ नियंत्रित करून आणि देयक संतुलन राखून आर्थिक विकासाला गती देण्यासाठी चलनविषयक धोरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. एकदा विकासाला गती मिळाली की, प्रभावी चलनविषयक धोरण कर्जाचा लवचिक पुरवठा करून व्यापार आणि लोकसंख्येच्या विस्ताराच्या गरजा पूर्ण करण्यात मदत करू शकते.

२. वित्तीय संस्थांची निर्मिती आणि विस्तार:

विकसनशील अर्थव्यवस्थेतील चलनविषयक धोरणाचे प्राथमिक उद्दिष्ट हे तिची चलन आणि पत व्यवस्था सुधारणे हे आहे. याकरिता अधिक बँका आणि वित्तीय संस्था स्थापन केल्या पाहिजेत, विशेषतः ज्या भागात या सुविधा नाहीत. व्यावसायिक बँकांचा विस्तार आणि बचत बँका, सहकारी बचत सोसायट्या, म्युच्युअल सोसायट्या, इत्यादीसारख्या इतर वित्तीय संस्थांची स्थापना केल्याने पत सुविधा वाढविण्यात, लोकांच्या ऐच्छिक बचतीचे एकत्रीकरण आणि त्यांना उत्पादक उपयोगात आणण्यास मदत होईल. देशाच्या विकास आराखड्याच्या आवश्यकतेनुसार संस्थांचा निधी प्राधान्य क्षेत्र किंवा उद्योगांमध्ये वळवला जाईल याची खात्री करणे ही आर्थिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे.

३. प्रभावी केंद्रिय किंवा मध्यवर्ती बँकिंग:

विकासात्मक गरजा पूर्ण करण्यासाठी अविकसित देशाच्या मध्यवर्ती बँकेने विविध चलनविषयक साधनांद्वारे, जसे की बँक दर, खुल्या बाजारातील व्यवहार, रोख राखीव प्रमाण इत्यादीद्वारे कर्जाचे प्रमाण नियंत्रित केले पाहिजे आणि नियंत्रित करण्यासाठी प्रभावीपणे कार्य केले पाहिजे.

सट्टा आणि अनुत्पादक क्रियाकलापांमधून बचत वळवून उत्पादक वापरांकडे अधिक आणि अधिक प्रभावी क्रेडिट नियंत्रणे संसाधनांच्या वाटपावर प्रभाव पाडतील.

४. संघटित आणि असंघटित मुद्रा बाजाराचे एकत्रीकरण:

बहुतेक अविकसित देश दुहेरी चलन प्रणालीद्वारे वैशिष्ट्यीकृत आहेत ज्यात एकीकडे लहान परंतु अत्यंत संघटित मुद्रा बाजार आणि दुसरीकडे मोठा परंतु असंघटित मुद्रा बाजार एकाच वेळी चालतो.

असंघटित मुद्रा बाजार मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाबाहेर आहे. प्रभावी उपायांचा अवलंब करून, चलन प्राधिकरणाने मुद्रा बाजाराच्या असंघटित आणि संघटित घटकांचे एकत्रीकरण केले पाहिजे.

५. बँकिंग सवयी विकसित करणे:

कमी विकसित देशाच्या चलन प्राधिकरणाने देशाच्या एकूण चलन पुरवठ्यामध्ये बँक पैशाचे प्रमाण वाढवण्यासाठी योग्य उपाययोजना केल्या पाहिजेत. यासाठी लोकांच्या बँकिंग सवयी

munotes.in

विकसित करून आणि क्रेडिट साधनांचा वापर (उदा. चेक, ड्राफ्ट इ.) लोकप्रिय करून बँक ठेवींमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

६. अर्थव्यवस्थेचे मुद्रीकरण:

एक अविकसित देश देखील मोठ्या गैर-मुद्रीकरण क्षेत्राच्या अस्तित्वाद्वारे चिन्हांकित आहे. या क्षेत्रात, सर्व व्यवहार वस्तु विनिमय प्रणालीद्वारे केले जातात आणि पैशाच्या पुरवठ्यात बदल आणि व्याजदराचा आर्थिक क्रियाकलापांवर अजिबात प्रभाव पडत नाही. चलन प्राधिकरणाने या गैर-मुद्रीकरण क्षेत्राची कमाई करण्यासाठी आणि त्याच्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी उपाय योजले पाहिजेत.

७. एकात्मिक व्याज दर संरचना:

अविकसित अर्थव्यवस्थेत, एकात्मिक व्याजदर संरचनाचा अभाव असतो. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये व्याजदरांमध्ये व्यापक असमानता आहे आणि हे दर बँक दरातील बदलांना प्रतिसाद देत नाहीत, त्यामुळे चलनविषयक धोरण अप्रभावी बनते.

आर्थिक प्राधिकरणाने अर्थव्यवस्थेच्या व्याजदर संरचना एकत्रित करण्यासाठी प्रभावी पावले उचलली पाहिजेत. शिवाय, एक योग्य व्याज दर संरचना विकसित केली पाहिजे जी केवळ बचत आणि गुंतवणूकीला प्रोत्साहन देत नाही, तर सट्टा आणि अनुत्पादक कर्जांना देखील परावृत्त करते.

३.६ सारांश (SUMMARY)

अर्थव्यवस्थेची महत्वपूर्ण उद्दिष्टये साध्य करण्यासाठी पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्यासाठी देशाच्या केंद्रिय किंवा मध्यवर्ती बँकेकडून जे प्रयत्न केले जातात, त्यालाच चलनविषयक किंवा मौद्रिक धोरण असे म्हणतात.

प्रस्तुत प्रकरणामध्ये मौद्रिक धोरणाची उद्दिष्टये,साधने व मर्यादा यांचा सविस्तरपणे अभ्यास करण्यात आला आहे. तसेच मौद्रिक किंवा चलनविषयक धोरणाची विकसनशील अर्थव्यवस्थांमधील भूमिका देखील अभ्यासण्यात अली आहे.

३.७ प्रश्न (QUESTIONS)

१. मौद्रिक धोरण म्हणजे काय? मौद्रिक धोरणाची उद्दिष्टये स्पष्ट करा.

२. मौद्रिक धोरणाची साधने व मर्यादा स्पष्ट करा.

३. मौद्रिक धोरणाची विकसनशील अर्थव्यवषेतील भूमिका स्पष्ट करा.

*****

४

राजकोषिय धोरण

घटक रचना

४.० उद्दिष्टये

४.१ प्रस्तावना

४.२ राजकोषिय धोरणाची उद्दिष्टये

४.३ राजकोषिय धोरणाची साधने

४.४ राजकोषिय धोरणाच्या मर्यादा

४.५ विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये राजकोषिय धोरणाची भूमिका

४.६ सारांश

४.७ प्रश्न

४.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

- राजकोषीय धोरणाचा अर्थ समजून घेणे.
- राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे पाहणे.
- राजकोषीय धोरणाच्या साधनांचा अभ्यास करणे.
- राजकोषीय धोरणाच्या मर्यादा.
- विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये राजकोषीय धोरणाची भूमिका जाणून घेणे.

४.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

पूर्वी राज्यसत्तेने म्हणजेच शासनाने कमीत कमी कामे करावित अशी भूमिका अर्थशास्त्रज्ञांनी घेलती होती. यालाच अहस्तक्षेप किंवा निर्हस्तक्षेप नीती म्हटले जाते. परंतू अलिकडील काळात ही निर्हस्तक्षेप निती पाठीमागे पडून पारंपारिक विचारसरणी पूर्णपणे बदलली आहे. सरकारने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी कल्याणकारी कार्ये करावीत अशी विचारसरणी पुढे येऊ लागली. राजस्व (Public finance) याचा अर्थ केवळ सार्वजनिक महसूल गोळा करणे व खर्च करणे याच्याशी संबंधित न राहता अशा व्यवहारांना सरकारच्या हातातील एक प्रभावी साधन म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

लॉर्ड केन्स यांनी देखिल अर्थव्यवस्थेच्या सर्वांगिण विकासांसाठी योग्य असे आर्थिक धोरण सरकारने स्विकारावे असे मत मांडले. या अर्थिक धोरणांमध्ये मौद्रिक धोरणा बरोबरच राजकोषिय धोरणाचा देखिल समावेश होतो.

munotes.in

व्याख्या:

१) प्रा. बोल्डींग:

"राजवित्तीय धोरण ही संकल्पना सरकारच्या पैसे घेणे आणि पैसे देणे या व्यवहाराशी संबंधित असलेल्या बाजूचा उल्लेख करण्यासाठी स्थूलमानाने वापरली जाते."

२) प्रा. जॉन्सन:

"आर्थिक व्यवहारांची पातळी उंचावण्यासाठी करांमध्ये आणि सरकारी खर्चामध्ये जे बदल घडवून आणले जातात त्या धोरणाचा उल्लेख राजवित्तीय धोरण असा केला जातो."

म्हणजेच वित्तीय धोरण म्हणजेच असे धोरण कि ज्यामध्ये सरकार त्यांच्या उत्पन्न व खर्चाच्या कार्यक्रमाद्वारे उत्पन्न व रोजगारात अपेक्षित बदल घडवून आणते व अर्थव्यवस्थेवर होणारे विपरीत परिणाम टाळण्याचा प्रयत्न करते.

४.२ राजकोषिय धोरणाची उद्दिष्टये (OBJECTIVES OF FISCAL POLICY)

राजकोषिय धोरणाच्या अंमलबजावणीच्या माध्यमातून सरकार पुढील प्रमुख उद्दिष्टे साध्य करते.

१) बचत व भांडवल निर्मितीला प्रोत्साहन:

अल्पविकसित देशांत भांडवलाची टंचाई असते. व योग्य प्रमाणात भांडवल गुंतवणूक झाल्याशिवाय आर्थिक विकास शक्य नसतो. अपेक्षित भांडवल गुंतवणूकीसाठी मोठ्या प्रमाणात बचत होणे आवश्यक असते. त्या दृष्टीने सरकारने कर आकारणी करुन खर्च करणे आवश्यक आहे.

२) तेजी – मंदीवर नियंत्रण:

आर्थिक विकासाच्या मार्गातील एक प्रमुख अडथळा म्हणजेच तेजी – मंदीची चक्रे होय. अतिरीक्त किंमतवाढ किंवा किंमतघट ही अर्थव्यवस्थेला हानीकारक असते. त्यावर उपाय म्हणून सरकारने कर योजना, खर्चाच्या योजना, अनुत्पादक खर्चावर नियंत्रण, सार्वजनिक खर्च कमी करणे, उत्पादन कार्यात विविध कर सवलती, लघू उदयोगांना सवलीत देणे इ. उपाययोजना किंमतीवाढी विरुध्द करणे अपेक्षित असते. त्यादृष्टीने वित्तीय धोरणाची भूमिका महत्वाची असते.

३) बेरोजगारी कमी करणे:

कोणत्याही देशाच्या राजकोषिय धोरणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट म्हणजेच पूर्ण रोजगार परिस्थिती निर्माण करणे होय. मात्र अर्थव्यवस्थेतील रोजगार पातळी ही बहुतांश देशामध्ये कमी असते कारण समाजाची प्रभावी मागणीतील कमतरता होय. अशा वेळी सरकारने राजकोषिय धोरणाद्वारे सार्वजनिक खर्चात वाढ, रोजगार वाढ, उत्पन्न वाढ, मागणीत वाढ घडून येऊन अर्थव्यवस्थीतील रोजगार पातळी ऊंचावण्यास मदत होते.

४) सामाजिक दृष्ट्या योग्य गुंतवणूकीला प्रोत्साहन:

समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी वाहतूक, दळण-वळण, शिक्षण, आरोग्य, धरणे, कालवे, वीज निर्मिती, असा पायाभूत सुविधांचा विकास होणे अत्यंत आवश्यक असते. सरकारराजकोषिय धोरणद्वारे सार्वजनिक खर्चात वाढ करुन ही समाजकल्याणकारी कार्यांमधील गुंतवणूक वाढवू शकते.

५) सामाजिक न्यायासह आर्थिक विकास साध्य करणे:

सामाजिक न्याय म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप होतांना ते समान होणे आवश्यक असते. त्यामुळे आर्थिक विषमता कमी होऊन सामाजिक न्याय प्रस्थापित होतो. त्यासाठी सरकार करआकारणी करतांनाच प्रगतीशील पद्धतीने करु शकते. तसेच सार्वजनिक खर्चाद्वारे दारिद्र्य निर्मूलन योजना राबवून गरीबीची तिव्रता कमी करणे अपेक्षित आहे.

६) आर्थिक स्थिरता व आर्थिक विकास:

आर्थिक स्थिरता निर्माण करणे म्हणजेच तेजी-मंदीची चक्रे नियंत्रित करुन त्याचे दुष्पपरीणाम टाळून अर्थव्यवस्थेचा विकास सतत चालू ठेवणे होय. त्यासाठी तेजीच्या काळात सार्वजनिक खर्चात कपात, करांमध्ये वाढ करणे, कर्ज उभारणी करणे याऊलट मंदीमध्ये सार्वजनिक खर्चात वाढ, करांमध्ये घट इ. मार्गांचा अवलंब करणे अपेक्षित असते.

४.३ राजकोषिय धोरणाची साधने (INSTRUMENTS OF FISCAL POLICY)

राजकोषिय धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील साधनांचा वापर केला जातो.



A) सार्वजनिक कर:

डॉ. डाल्टन यांच्या मते 'कर भरणार्याला करांद्वारे किती प्रमाणात लाभ प्राप्त होतो. याचा विचार न करता सरकारने नागरिकांवर लादलेले सक्तीचे देणे म्हणजे 'कर' (Tax) होय.'

कर हे सरकारच्या हातातील उत्पन्न गोळा करण्याचे राजकोषिय धोरणाचे एक महत्वाचे साधन आहे. सरकारला जन कल्याणास्तव अनेक कल्याणकारी योजनांवर खर्च करावा लागतो.

हा खर्च भरुन काढण्यासाठी सरकारला जनतेमार्फत दिले जाणारे सक्तीचे देणे म्हणजे कर होय. कर ही महसूली उत्पन्नाची बाजू असून करांचे पुढील दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.

munotes.in

१) प्रत्यक्ष कर.

२) अप्रत्यक्ष कर.

B) सार्वजनिक खर्च:

अलिकडील काळात सरकारची भूमिका 'कल्याणकारी' राज्याची बनलेली असून त्याद्वारे देशाचे परकियांपासून संरक्षण करणे, अंतर्गत शांतता, सुव्यवस्था, पायाभूत सुविधांची निर्मिती इ. साठी सरकार जो खर्च करते त्यास सार्वजनिक खर्च असे म्हणतात.

सार्वजनिक खर्चामुळे कृषी, उदयोग, व्यापार सेवा क्षेत्रांचा विकास, आर्थिक विषमता दुर करणे, मुलभूत व अवजड उदयोगांचा विकास करणे, प्रादेशिक समतोल निर्माण करणे, इ. उद्दिष्ट्ये साध्य करता येतात.

C) सार्वजनिक कर्ज:

कल्याणकारी राज्याची भूमिका पार पाडतांना सरकारला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. हा खर्च भरुन काढण्यासाठी करांचा आधार घेतला जातो, परंतू अनेकदा करांद्वारे मिळणारे उत्पन्न अपूरे पडते व त्यामुळे सरकारला सार्वजनिक कर्ज उभारुन उत्पन्न वाढवावे लागते. अशा रीतीने कर्ज उभारुन मिळणारे उत्पन्न सरकारला कायमचे मिळत नाही तर त्याचे स्वरुप तात्पुरते असते कारण ठराविक काळानंतर सरकारने घेतलेल्या कर्जाची व्याजासह परतफेड करावी लागते.

सरकारी कर्जरोख्यांची विक्री करुन किंवा राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, किसान विकास पत्रे, भविष्य-निर्वाह निधी इ. द्वारे भारतात सरकारने मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कर्जाची उभारणी केलेली आहे.

D) तूटीचा अर्थभरणा:

आर्थिक विकासासाठी साधन सामग्री गोळा करण्याचा मार्ग या दृष्टीने तूटीच्या अर्थभरण्याला महत्वाचे स्थान आहे.

'जेव्हा सरकारच्या महसूली उत्पन्नापेक्षा महसूली खर्च जास्त असतो तेव्हा त्या अंदाज-पत्रकाला तूटीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.' तूटीच्या अर्थभरण्यासाठी पूढील मार्गांचा अवलंब केला जातो.

१) मध्यवर्ती बँकेकडून कर्जे घेणे.

२) व्यापारी बँकांकडून कर्जे घेणे.

३) नवीन चलनाची छपाई करणे.

अशा प्रकारे स्थिरतेसह आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सरकार राजकोषिय धोरणाद्वारे वरील साधनांचा प्रभावीपणे वापर करु शकते.

munotes.in

४.४ राजकोषिय धोरणाच्या मर्यादा (LIMITATIONS OF FISCAL POLICY)

राजकोषीय धोरणाची परिणामकारकता खालील मर्यादांच्या अधीन आहे:

१. व्यावहारिक अडचणी:

सैद्धांतिकदृष्ट्या, राजकोषीय धोरणाचे परिणाम काही गृहितकांवर आधारित असतात. तथापि, वास्तविक स्थूल आर्थिक परिस्थिती अधिक जटिल आहे. राजकोषीय धोरण कुचकामी बनवणारे काही गृहितके प्रत्यक्षात अस्तित्वात नसू शकतात. उदाहरणार्थ, महागाईच्या काळात कर वाढवले जातात आणि सार्वजनिक खर्च कमी केला जातो. सरकारच्या तूटिच्या वित्तपुरवठ्याने अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा वाढला नाही, तरच ही उपाययोजना महागाई नियंत्रणात प्रभावी ठरेल. तसेच, राजकोषीय धोरण हे चलनविषयक धोरणाला पूरक असले पाहिजे.

२. अंदाज लावण्याच्या अडचणी:

राजकोषीय उपायांच्या यशामध्ये लक्ष्य चलांचा विश्वासार्ह अंदाज हा एक अतिशय महत्त्वाचा घटक आहे. या चलांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन, किंमत पातळी, रोजगार, उपभोग आणि गुंतवणूक यांचा समावेश होतो. अंदाज हे डेटा संकलन आणि विश्लेषणाचे कार्य आहे जे विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये कठीण आहे. विकसित अर्थव्यवस्थांमध्येही, अंदाज वर्तवलेला नाही.

३. गुणक:

गुंतवणूक गुणक, कर गुणक अशा विविध गुणकांच्या कार्याद्वारे वित्तीय उपायांचे प्रयत्न अर्थव्यवस्थेत प्रसारित केले जातात. उदाहरणार्थ, पायाभूत सुविधांवर प्रेरित सरकारी गुंतवणुकीचा परिणाम गुणक प्रक्रियेद्वारे उत्पन्न आणि उपभोगात वाढ करेल. अशा गुंतवणुकीचा नेमका परिणाम गुंतवणूक गुणक गुणांकावर अवलंबून असतो. प्रथम, गळती आणि अनिश्चिततेमुळे गुणक गुणांकांच्या मूल्यांचा अंदाज लावणे कठीण आहे. दुसरे म्हणजे, गुणकाच्या क्रियाशिलतेमध्ये काल पश्चायन असते. असे होऊ शकते की आर्थिक निर्णयाचा संपूर्ण परिणाम अर्थव्यवस्थेवर जाणवू लागेपर्यंत, आर्थिक परिस्थिती अशा प्रकारे बदललेली असू शकते की त्यासाठी आधीच्या निर्णयापेक्षा आणखी एक विपरीत आर्थिक निर्णय आवश्यक असतो. उदाहरणार्थ, आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सरकार खर्च वाढवण्याचा निर्णय घेऊ शकते. यामुळे राजकोषीय तूट वाढू शकते. आर्थिक वाढ पुनरुज्जीवित होईपर्यंत, राजकोषीय तूट एवढी वाढू शकते की सरकारला भांडवली आणि महसुली खर्चात कपात करण्यास भाग पाडते, ज्यामुळे पुन्हा एकदा विकासावर परिणाम होतो.

४. काल पश्चायन:

विवेकाधीन राजकोषीय धोरणाच्या बाबतीत हे अंतर अस्तित्त्वात आहे जे सरकारने जाणीवपूर्वक केलेल्या उपाययोजना आहेत. सरकारला समस्या ओळखण्यासाठी आणि

नंतर समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य धोरण लागू करण्याचा निर्णय घेण्यासाठी वेळ लागतो. हे अंतर्गत काल पश्चायन आहे. पॉलिसीचा प्रभाव जाणवण्यासाठी लागणारा वेळ या स्वरूपात बहिर्गत काल पश्चायन आहे. या विलंबांमुळे राजकोषीय धोरणाची परिणामकारकता कमी होते.

५. अविकसित अर्थव्यवस्था:

कमी करपात्र क्षमता, मोठी असंघटित आणि कमाई न केलेली आर्थिक व्यवस्था, कमी उत्पन्नाची पातळी आणि भ्रष्टाचार यासारख्या कारणांमुळे अविकसित अर्थव्यवस्थांमध्ये वित्तीय उपाय तसेच आर्थिक धोरण उपाय फारसे प्रभावी नाहीत.

६. राजकीय प्रभाव:

चलनविषयक धोरण मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाखाली असताना, राजकोषीय धोरण सरकारद्वारे लागू केले जाते. मध्यवर्ती बँक ही एक स्वायत्त संस्था आहे जी तुलनेने राजकीय प्रभावापासून मुक्त आहे. हे राजकोषीय धोरणाच्या बाबतीत खरे नाही. लोकशाही सरकारे अनेकदा त्यांच्या अर्थसंकल्पीय निर्णयांमध्ये राजकारण आणि अर्थशास्त्राची सरमिसळ करतात. हे राजकोषीय धोरणाची परिणामकारकता मर्यादित करते. उदाहरणार्थ, निवडणुकीच्या काळात, सरकार सार्वजनिक समर्थन मिळवण्यासाठी सबसिडी आणि इतर खर्च वाढवू शकते. यामुळे राजकोषीय तूट वाढू शकते आणि दीर्घकाळासाठी अर्थव्यवस्थेचे नुकसान होऊ शकते. अशाप्रकारे, अल्पकालीन राजकीय नफ्यामुळे राजकोषीय धोरणाच्या दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांमध्ये तडजोड होऊ शकते.

४.५ विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये राजकोषिय धोरणाची भूमिका (ROLE OF FISCAL POLICY IN DEVELOPING ECONOMIES)

विकसनशील देशांमधील राजकोषीय धोरण हे वरवर पाहता जलद आर्थिक विकासासाठी अनुकूल असले पाहिजे. गरीब देशात, राजकोषीय धोरण यापुढे भरपाई देणारे राजकोषीय धोरण राहू शकत नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेत तिची भूमिका कठोर आहे आणि तिला विकास-सह-स्थिरतेच्या समस्येला तोंड द्यावे लागते.

नव्याने विकसनशील अर्थव्यवस्थेत राजकोषीय धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे भांडवल निर्मितीच्या शक्यतेच्या सर्वोच्च दराला प्रोत्साहन देणे हे आहे. अविकसित देश भांडवलाच्या कमतरतेमुळे गरिबीच्या दुष्टचक्राने वेढलेले आहेत; हे दुष्ट वर्तुळ तोडण्यासाठी संतुलित वृद्धी आवश्यक आहे. त्यासाठी भांडवल निर्मितीचा वेग वाढवणे आवश्यक आहे.

या देशांमध्ये खाजगी भांडवल सामान्यतः लाजाळू असल्याने, सरकारला ही कमतरता भरून काढावी लागते. सामाजिक ओव्हरहेड भांडवल तयार करण्यासाठी वाढता सार्वजनिक खर्च देखील आवश्यक आहे. भांडवल निर्मितीच्या दराला गती देण्यासाठी, एकूण बचतीचा स्तर उंचावण्यासाठी आणि लोकांचा वास्तविक आणि संभाव्य वापर कमी करण्यासाठी वित्तीय धोरण तयार केले पाहिजे.

आर्थिक धोरणाचे आणखी एक उद्दिष्ट, गरीब देशात विद्यमान संसाधने अनुत्पादक ते उत्पादक आणि सामाजिकदृष्ट्या अधिक इष्ट वापराकडे वळवणे हे आहे. त्यामुळे राजकोषीय धोरण, विकासाच्या नियोजनात मिसळले पाहिजे.

विकसनशील अर्थव्यवस्थेतील राजकोषीय धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे समाजात उत्पन्न आणि संपत्तीचे समान वितरण करणे होय. इथे मात्र एक अडचण निर्माण होते. जलद वाढ आणि उत्पन्नात समानता प्राप्त करणे ही दोन विरोधाभासी उद्दिष्टे आहेत. कारण वाढीसाठी अधिक बचतीची आवश्यकता आहे आणि समान वितरणामुळे एकूण बचत कमी होते, कारण श्रीमंत वर्गाची बचत करण्याची प्रवृत्ती नेहमीच जास्त असते आणि गरीब उत्पन्न गटाची कमी असते. त्यामुळे उच्च आर्थिक वृद्धी हे उद्दिष्ट असेल, तर असमानता किती प्रमाणात कमी करायची असा प्रश्न निर्माण होतो. अर्थात, अनेक वेळा, समाजवादाच्या उद्दिष्टाखाली, सरकार असमानता कमी करण्यासाठी असमानता कमी करण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे समृद्धीऐवजी गरिबीचे वितरण होऊ शकते. वाढ आणि असमानता कमी करण्याच्या या दोन विरोधाभासी उद्दिष्टांचा समन्वय केल्यास निश्चितच चांगले परिणाम मिळू शकतात. शिवाय, गरीब देशातील वित्तीय धोरणाची देशांतर्गत उच्च चलनवाढ आणि परदेशातील अस्वास्थ्य कर घडामोडींपासून अर्थव्यवस्थेचे संरक्षण करण्याची अतिरिक्त भूमिका असते. वाढीच्या प्रक्रियेत काही प्रमाणात चलनवाढ अपरिहार्य असली तरी, चलनवाढीला आळा घालण्यासाठी वित्तीय उपाय योजले पाहिजेत. सापेक्ष किंमत स्थिरता हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेतील राजकोषीय धोरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एकत्रित तसेच विभागीय असावा. पूर्वीचा एकूण आर्थिक विस्तार होऊ शकतो आणि बेरोजगारीचा सामान्य दबाव कमी होऊ शकतो; परंतु अडथळ्यांच्या अस्तित्वामुळे सामान्य किंमत स्थिरता राखली गेली असली तरी, क्षेत्रीय किंमत वाढ अपरिहार्यपणे आढळू शकते. हे क्षेत्रीय असमतोल योग्य विभागीय राजकोषीय उपायांद्वारे दुरुस्त केले जातील जे घर्षण आणि अचलतेच्या वळणाची मागणी योग्य दिशानिर्देशांमध्ये काढून टाकतील आणि वाढीतील इतर अडथळे दूर करण्याचा प्रयत्न करतील.

४.६ सारांश (SUMMARY)

प्रस्तुत प्रकरणामध्ये राजकोषिय धोरणाच्या विविध अर्थतज्ञांनी मांडलेल्या व्याख्या देण्यात आल्या आहेत. राजकोषीय धोरणामध्ये प्रामुख्याने कर, खर्च व कर्ज यांचा अभ्यास केला जातो. या प्रकरणामध्ये विस्तृतपणे राजकोषीय धोरणाची उद्दिष्टये, राजकोषीय धोरणाची साधने व राजकोषीय धोरणाच्या मर्यादांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच राजकोषीय धोरणाची विकसनशील अर्थव्यवस्थांमधील भूमिका देखील स्पष्ट करण्यात आली आहे. एकंदरीत, राजकोषीय धोरणाचा साविस्तर अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.

४.७ प्रश्न (QUESTIONS

१. राजकोषीय धोरणाची व्याख्या देऊन राजकोषीय धोरणाची उद्दिष्टये स्पष्ट करा.

२. राजकोषीय धोरणाची साधने व मर्यादा यांची सविस्तर चर्चा करा.

३. राजकोषीय धोरणाची भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेतील भूमिका विशद करा.

*****

munotes.in

मॉडयुल-III

५

आयएस वक्र

घटक रचना

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ वस्तू बाजार समतोल वक्र

५.३ IS वक्राचे आरेखन

५.४ IS वक्राचा उतार

५.५ IS वक्राचे स्थलांतर

५.६ प्रश्न

५.० उद्दिष्ट्ये (OBJECTIVES)

१) IS वक्राची संकल्पना समजून घेणे.

२) IS वक्राचे आरेखन समजून घेणे.

३) IS वक्राचा उतार अभ्यासणे.

४) IS वक्राचा स्थलांतर कसे होते हे समजून घेणे.

५.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

वस्तू बाजार आणि पैसा बाजार व त्यामधील दुवा:

सुरवातीच्या प्रकरणामध्ये आपण अभ्यासल्याप्रमाणे स्थूल किंवा समग्रलक्षी अर्थशास्त्र हे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करते. जे. एम. केन्स यांच्या १९३६ साली प्रकाशित झालेल्या "General Theory of Employment, interest and money" या पुस्तकामध्ये, एखादी अर्थव्यवस्था जेव्हा उदासीन कामगिरी करत असते त्या परिस्थितीतून बाहेर पाडण्यासाठी परिणाम कर्क मागणीचे तत्व योग्य आहे, याचे विवेचन उत्तम प्रकारे केले आहे. केन्स यांच्या मते, बहुतांश स्थूल अर्थशास्त्रीय घटक हे एकमेकांवर अवलंबून असतात.

उदा. व्याजदरामध्ये केलेला बदल हा अर्थव्यवस्थेतील उपभोग, गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न यामध्ये सुद्धा बदल घडवून आणतो.

पुढे १९३७ मध्ये प्रा. हिक्स यांनी IS-LM प्रतिमान विकसित केले, ज्याद्वारे वस्तू बाजार आणि वित्त बाजार हे एकाचवेळी एकाच उत्पन्न व व्याज दरावर समतोल साधतात, हे स्पष्ट

केले जाऊ शकते. म्हणून IS-LM प्रतिमानास केन्स प्रतिमानाचे विस्तारित स्वरूप मानले जाते. राजकोषीय तसेच मौद्रिक धोरणांचा अभ्यास करत असताना IS-LM प्रतिमान हे एक महत्त्वाचे स्थूल अर्थशास्त्रीय साधन आहे.

IS-LM प्रतिमानामध्ये,

I = Investment (गुंतवणूक)

S = Saving (बचत)

L = Liquidity Preference (पैशाची मागणी)

M = Money Supply (पैशाचा पुरवठा)

हिक्स यांनी आपल्या प्रतिमानात दोन वक्र दर्शविले आहेत.

१) IS वक्र

२) LM वक्र

IS वक्र हा वस्तू बाजाराचे प्रतिनिधित्व करतो. तर LM वक्र वित्त बाजाराचे प्रतिनिधित्व करतो. नव केन्सवादी अर्थशास्त्रज्ञ हिक्स, हॅन्सन आणि लर्नर यांच्या मते, बचत, गुंतवणूक, तरलता प्राधान्य (रोख पैशाची मागणी) आणि पैशाचा पुरवठा हे चार प्रमुख घटक उत्पन्नाशी जोडले गेले आहेत. IS-LM प्रतिमान व्याजाचा दर आणि उत्पन्न यांच्या परिणामातून वस्तू बाजार व वित्त बाजार यांचा समतोल कशाप्रकारे साधला जातो हे स्पष्ट करते.

५.२ वस्तू बाजार समतोल वक्र (IS CURVE)

जेव्हा बचत आणि गुंतवणूक (I = S) समान असतात तेव्हा वस्तू बाजार समतोल साधतो. बचत आणि उत्पन्न यांच्यामध्ये धन संबंध असतो. म्हणजेच जेव्हा उत्पन्न वाढते तेव्हा बचत देखील वाढत असते.

S = f (Y) (बचत = उत्पन्नाचे फलन)

तसेच गुंतवणुकीवर व्याज दराचा प्रभाव असतो. व्याज दर व गुंतवणूक यांच्यात ऋण सहसंबंध असतो. उदाहरणार्थ व्याज दर वाढल्यास गुंतवणूक कमी होते, तर व्याजाचा दर घटल्यास गुंतवणूक वाढते.

I = f (r) (गुंतवणूक = व्याजदराचे फलन)

बचत आणि गुंतवणूक पुढील सूत्रानुसार समान होईल.

Y = C + S

उत्पन्न म्हणजे आपण ज्याचा उपभोग घेतो ते आणि आपण ज्याचा उपभोग घेत नाही. उत्पन्नाचा असा हिस्सा बचत म्हणून ठेवला जातो. या दोघांची बेरीज होय. यापैकी कोणत्याही दोन घटकांची किंमत दिली असता तिसऱ्या घटकाची किंमत मोजता येते.

C = Y – S.

S = Y – C.

व्दिक्षेत्रिय बंदिस्त अर्थव्यवस्थेत, जेथे फक्त गृहसंस्था आणि उत्पादनसंस्था बचत आणि गुंतवणूक करतात तेथे,

Y = C + I (ii)

समीकरणात (i) आणि (ii) वरून आपणांस पुढील समीकरण मिळते.

C + S = C + I (iii)

समीकरणात दोन्ही बाजूतून C वजा केल्यास

S = I

(iv) हे चौथे समीकरण मिळते.

अल्प काळात बचत आणि गुंतवणूक समान असणे आवश्यक आहे.

५.३ IS वक्राचे आरेखन (DERIVATION OF IS CURVE)

IS वक्र हे वस्तू बाजाराच्या समतोलाचे आकृती प्रारूप आहे. IS वक्र हा उत्पन्न, उत्पादन, उपभोग आणि व्याजाचा दर यासारख्या अंतर्गत घटकातून निर्माण होतो. जेव्हा व्याजाचा दर कमी होतो तेव्हा गुंतवणूकदार गुंतवणुकीस प्रवृत्त होतात. कारण व्याज दर घाटल्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. वाढीव गुंतवणूक एकूण मागणीला पूरक ठरते. परिणाम स्वरूप राष्ट्रीय उत्पन्न वाढते. म्हणजेच IS वक्र हा विविध व्याज दरावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या समतोल पातळीशी निगडीत आहे.

IS वक्र हा व्याजदर आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या समतोलाच्या विविध बिंदूना जोडणारी रेषा आहे. जी रेषा वस्तू बाजाराचा समतोल दर्शविते.

munotes.in



आकृती क्र. ५.१ IS वक्राचे आरेखन

वरील आकृती मधून Panel A मध्ये 'क्ष' अक्षावर गुंतवणूक 'य' अक्षावर व्याजाचा दर दर्शविला आहे. जेव्हा व्याजाचा दर r_0 अपेक्षित गुंतवणूक I_0 आहे. Panel B मध्ये, ४५^0 रेषेवरील प्रत्येक बिंदू हा एकुण मागणी आणि राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी यांची समानता दर्शवते. $AD = Y$ एकूण मागणी $C + I_0$ आणि समतोल बिंदू E_0 अर्थव्यस्थेचे राष्ट्रीय उत्पन्न आहे Y_0 म्हणून Panel C मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी Y_0 ही व्याजदराच्या विरूद्ध दर्शविली आहे.

पुढे व्याज दर r_1 पर्यंत कमी झाल्यास, उद्योजकांना उत्पादन प्रकल्पाचा खर्च कमी लागेल. परिणामी ते जास्त गुंतवणूक करतील (ΔI) व गुंतवणूक I_1 इतकी होईल व अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी वक्र वरच्या बाजूस सरकेल. $C + I_1$ सूत्रानुसार राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल व राष्ट्रीय उत्पन्नाचा समतोल उच्च पातळीवर म्हणजेच Y_1 वर साधला जाईल. परिणामी Panel C वर राष्ट्रीय उत्पन्न वाढून इतके होईल.

व्याज दर पुढे r_2 पर्यंत खाली आल्यास गुंतवणूक सुद्धा I_2 पर्यंत वाढेल. परिणामी एकूण मागणी वाढून $C + I_2$ होईल. समतोल उत्पन्नाची पातळी E_2 होईल व राष्ट्रीय उत्पन्न Y_2 पर्यंत वाढेल.

Panel C वरील A, B आणि बिंदू C जोडले असता, व्याज दर कमी झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होते. हे दर्शविणारा अधोगामी IS वक्र प्राप्त होईल.

५.४ IS वक्राचा उतार (SLOPE OF IS CURVE)

IS वक्राचा उतार अधोगामी असतो जो व्याज दर आणि राष्ट्रीय उत्पन्न यातील ऋण संबंधाचा निर्देशक आहे.

IS वक्राच्या उताराची तीव्रता (Steepness) ही पुढील घटकांवर अवलंबून असते.

१) गुंतवणूक मागणी वक्राची लवचिकता:

जर गुंतवणूक मागणी व्याज दराच्या बाबतीत अधिक लवचिक असेल तर व्याजदरामध्ये थोडी कपात झाल्यास गुंतवणुकीमध्ये होतो. ज्यामुळे एकूण मागणीचा वक्र देखील जास्त प्रमाणात विस्तारीत होतो व वरील बाजूस सरकतो. परिणामी IS वक्राच्या उताराची तीव्रता कमी होऊन तो आडवा होतो.

२) गुणकाची किंमत:

IS वक्राच्या उताराची तीव्रता ही गुणकाच्या किंमतीवर देखील अवलंबून असते. ग्राहकांची सीमांत प्रवृत्ती (MPC) ही गुकाची किंमत निर्धारित करत असते. उदा. जर ग्राहकांची सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) उच्च असेल तर व्याज दर कमी होत असताना गुंतवणूक वाढते. वाढीव सीमांत उपभोग प्रवृत्ती (MPC) मुळे एकूण मागणी गुणकाच्या किंमतीच्या पटीत वाढेल व IS वक्राच्या उताराची तीव्रता कमी होईल. गुणकाची किंमत कमी असल्यास तो समतोल उत्पन्न पातळीवर कमी बदल घडवेल ज्यामुळे IS वक्राच्या उताराची तीव्रता जास्त राहील.

५.५ IS वक्राचे स्थलांतर (SHIFTING OF IS CURVE)

वक्राचे स्थान हे स्वायत्त खर्चाच्या पातळीवर ठरत असते. स्वायत्त खर्च म्हणजे असा खर्च जो उत्पादनावर अवलंबून नसतो. बहुतेक कल्याणकारी सरकारी योजना व धोरण नुसार केला जाणारा खर्च हा उत्पन्न आणि व्याज दरावर अवलंबून नसतो.

उदाहरणार्थ:

वाढत्या लोकसंख्येबरोबर शाळा, आरोग्य, रस्ते, वाहतूक, निवारा वाढत असतात. या सुविधांमधील वाढ ही उत्पादनावर अवलंबून नसते. परिणामी अशा स्वरूपाच्या स्वायत्त गुंतवणुकीमुळे IS वक्र वरच्या दिशेने स्थलांतरित होतो किंवा उलट परिस्थितीत खालच्या दिशेने स्थलांतरित होतो.



आकृती क्र. ५.२ IS वक्राचे स्थलांतर

अ) आकृती क्र. ५.२ नुसार उच्च स्वायत्त खर्चामुळे IS वक्र उजवीकडे सरकेल.

आ) स्वायत्त खर्चामधील घट IS वक्र आपली मूळ स्थानापासून डावीकडे सरकेल.

इ) स्वायत्त खर्च वाढल्यास IS वक्रामध्ये गुणकाच्या किंमतीच्या पटीत स्थलांतर होईल.

५.६ प्रश्न (QUESTIONS)

१. 'IS वक्राचे आरेखन' यावर टीप लिहा.

२. 'IS वक्राचा उतार' यावर टीप लिहा.

३. IS वक्राचा अर्थ सांगून IS वक्राचे स्थलांतर स्पष्ट करा.

*****

munotes.in

६

एलएम वक्र

घटक रचना

६.० उद्दिष्टये

६.१ प्रस्तावना

६.२ वित्त बाजारातील समतोल वक्र

६.३ LM वक्राचा उतार

६.४ LM वक्राचे स्थलांतर

६.५ IS-LM एकत्रित संतुलन

६.६ सारांश

६.७ प्रश्न

६.० उद्दिष्टये (OBJECTIVES)

- LM वक्राची संकल्पना अभ्यासणे.
- LM वक्राचे आरेखन अभ्यासणे.
- LM वक्राचा उतार अभ्यासणे.
- LM वक्राचे स्थलांतर अभ्यासणे.
- IS-LM एकत्रित संतुलन समजून घेणे.

६.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

IS - LM प्रतिमान आपल्याला वस्तू बाजार (Goods Market) व मुद्रा बाजार (Money Market) यांचा संयोग दिसून येतो. वस्तू बाजारात उत्पन्न पातळीचा खर्चावरील व खर्चाचा उत्पादन निश्चितीवरील परिणाम लक्षात घेतला जातो. म्हणजेच IS - LM प्रतिमान हे खर्च, उत्पन्न, व्याजदर, गुंतवणूक पातळी ही वस्तूबाजार मुद्रा बाजार यांच्या संयुक्त संतूलनातून साध्य होते.

IS - LM प्रतिमान हे प्रा.जे.आर. हिक्स यांनी १९३७ मध्ये विकसित केले. त्यानंतरच्या काळात हैन्सन, पॅटीन्कीन, मॉडिग्लिआनी इ. अर्थतज्ज्ञांनी त्यामध्य महत्वाची भर घातली. हिक्सने आपल्या लेखाद्वारे वस्तूबाजार व मुद्राबाजार यांचा एकाच उत्पन्न आणि व्याजदर पातळीला समतोल कसा साध्य होतो तो IS - LM प्रतिमानाद्वारे स्पष्ट केले आहे. ह्यासाठी हिक्सने वस्तूबाजारासाठी IS वक्राचा तर मुद्राबाजारासाठी LM वक्राचा वापर केलेला आहे.

munotes.in

६.२ वित्त बाजारातील समतोल वक्र (LM CURVE)

LM वक्र व्याज दर आणि राष्ट्रीय उत्पन्न यांच्यातील संबंध दर्शवतो. LM हा वित्त बाजारातील समतोलातून मिळवला जातो.

$M^s = M^d$

M^s = पैशाचा पुरवठा.

M^d = पैशाची मागणी.

नव केन्सवादी अर्थशास्त्रज्ञ (हिक्स, लर्नर आणि हॅन्सन) यांनी LM वक्राची संकल्पना मांडली. प्रा. केन्स यांच्या मते, पैशाची मागणी, व्यवहार, सावधगिरी आणि सट्टेबाजी या हेतूनी प्रेरित असते. यापैकी व्यवहार, सावधगिरी हे हेतू उत्पन्नाशी निगडीत असतात, तर सट्टेबाजीचा हेतू व्याज दरावर अवलंबून असतो. पैशाची मागणी ही उत्पन्न पातळीवर अवलंबून असते. कारण लोकांना त्यांच्या दैनंदिन व्यवहाराच्या गरजा पूर्ण करावयाच्या असतात. तसेच व्याजदर देखील पैशाच्या मागणीवर प्रभाव टाकतो. कारण पैसा जवळ बाळगण्याचा संधी त्याग खर्च व्याजदराइतका असतो.

या पैश्याची मागणी आपण पुढीलप्रमाणे मांडू शकतो.

$M^d = L(Y,r)$

येथे,

M^d = पैशाची मागणी

Y = उत्पन्न

r = व्याजाचा दर

पैशाची मागणी हे उत्पन्न आणि व्याजाचा दर याचे फलित असते. हॅन्सन यांच्या मते, म्हणण्यानुसार केन्स यांच्या सूत्रानुसार आपल्याला विविध उत्पन्नाच्या पातळीवर तरलता प्राधान्याच्या विविध जोड्या मिळतात. विविध उत्पन्नाच्या पातळीवर वित्तीय संस्थेकडून पैशाचा पुरवठा स्थिर असतो.



आकृती क्र. ६.१ उत्पन्नाच्या विविध स्तरावर वित्त बाजारातील समतोल.

वरील आकृतीवरून आपण LM वक्राचे विविध घटक अभ्यासू शकतो. यामध्ये पैशाची मागणी, पैशाचा पुरवठा, व्याज दार आणि राष्ट्रीय उत्पन्न यांचा समावेश होतो. केन्स यांच्या तरलता प्राधान्य सूत्रानुसार व्याजाचा दार हा पैशाची मागणी आणि पुरवठा जेथे समान होतो अशा ठिकाणी निश्चित होत असतो.

अर्थव्यवस्थेत पैशाची मागणी ही १. व्यवहार, २. सावधगिरी, ३. सट्टेबाजी या हेतूनी प्रेरित असते. व्यवहार हेतू L_t अक्षराने दर्शवला जातो, सावधगिरी L_p हेतू अक्षराने दर्शवला जातो, तर सट्टेबाजी हेतू L_s अक्षराने दर्शवला जातो.

Md = Lt + Lp + Ls ……………………….. (i)

ज्यामध्ये $L_t + L_p = L_1$ ज्यावर उत्पन्नाचा परिणाम होतो.

$L_1 = f(y)$ ……………………………….. (ii)

केन्स च्या सूत्रानुसार, L_0 हे L_2 समजले जाते.

$L_2 = f(r)$ ………………………………… (iii)

म्हणून एकूण पैशाची मागणी

$L = L_1 + L_2$ ……………………………… (iv)

जर L ला M_d समजल्यास.

$\therefore M_d = L_1 + L_2$

म्हणजेच पैशाची मागणी ही उत्पन्नाबरोबर वाढत असते. वास्तव पैशाची मागणी व्याजदराशी ऋण संबंध दर्शवते तर उत्पन्नाशी धन संबंध दर्शवते. म्हणून केन्स यांच्या

तरलता प्राधान्य वक्राचा अभ्यास केल्यास आपणास उत्पन्नात बदल झाल्यास समतोल व्याजदरातील बदलाचे विश्लेषण करता येईल.

LM वक्र आकृतीचे विश्लेषण:

Panel A मध्ये 'क्ष' अक्षावर पैशाचा पुरवठा व 'य' अक्षावर व्याजाचा दर दर्शविण्यात येतो. Panel B मध्ये 'क्ष' अक्षावर राष्ट्रीय उत्पन्न तर 'य' अक्षावर व्याज दर दर्शविण्यात आला आहे. Panel B नुसार जेव्हा उत्पन्न Y_0 वरून Y_1 होते व शेवटी Y_2 वर जाते. तेव्हा वाढीव उत्पन्न पैशाची मागणी वक्र उजवीकडून सरकतो. वास्तव पैशाचा साथ स्थिर राहतो. अशा परिस्थितीत व्याज दर r_0 पासून r_1 पुढे r_2 पर्यंत वाढणे अपेक्षित आहे. ज्यामुळे वित्त बाजारात समतोल निर्माण होतो.

म्हणून तरलता प्राधान्य प्रतिमानानुसार उत्पन्न वाढल्यास व्याजदर देखील वाढतो.

Panel B वरील बिंदू A, B आणि बिंदू C जोडल्यास आपल्याला ऊर्ध्वगामी LM वक्र मिळतो.

LM वक्र उत्पन्न आणि व्याजाचा दर यांच्यातील संबंध दर्शवतो. उच्च उत्पन्नाच्या स्थितीत, वास्तव पैशाची मागणी उच्च असते व समतोल व्याजाचा दर देखील उच्च राहतो. LM परिणामी वक्र आकृती ४.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ऊर्ध्वगामी असतो.

६.३ LM वक्राचा उतार (SLOPE OF LM CURVE)

LM वक्राचा उतार प्रामुख्याने पुढील दोन घटकांवर अवलंबून असतो.

१) तरलता प्राधान्य व बदलते उत्पन्न:

उदा. Panel B मध्ये दर्शविल्याप्रमाणे जर उत्पन्न Y_0 वरून Y_1 झाले, तर पैशाची मागणी M_0 वरून M_1 होईल हा उत्पन्न वाढीचा परिणाम असेल. पैशाची मागणी व्यवहार हेतू साठी वाढेल. $L_1 = f(y)$ याचा परिणाम वित्तीय बाजाराच्या समतोलावर होईल. परिणामी व्याजाचा दर वाढणे अपेक्षित आहे.

२) पैशाच्या मागणीची लवचिकता किंवा व्याजदरातील बदलास पैशाच्या मागणीचा प्रतिसाद (सट्टेबाजीच्या हेतूसाठी):

LM वक्राचा उतार हा पैशाच्या मागणीची उत्पन्न लवचिकता व व्याजदर लवचिकता यावर अवलंबून असते. पैशाच्या मागणीची उत्पन्न लवचिकता जास्त असेल आणि पैशाच्या मागणीची व्याजदर लवचिकता कमी असल्यास LM वक्राचा उतार तीव्र असतो.

समजा, पैशाच्या मागणी व्याज दराशी तुलनेने असंवेदनशील असेल तर LM वक्र हा लंब/उभी रेषा असते व पैशाची मागणी व्यजदराशी तुलनेने अतिसंवेदनशील असेल, तर LM वक्र क्ष अक्षाला समांतर आडवी रेष असते.

व्याज दाराच्या बदलांच्या संदर्भात सट्टेबाजीच्या हेतूसाठी पैशाची मागणी कमी लवचिक असते. LM वक्र हा तीव्र उताराचा असतो, तर व्याज दराच्या बदलांच्या संदर्भात

सट्टेबाजीच्या हेतूसाठी पैशाची मागणी जास्त लवचिक असते, तेव्हा LM वक्र हा क्ष अक्षाला समांतर आडवी रेष असते.

६.४ LM वक्राचे स्थलांतर (SHIFTING OF LM CURVE)

पैशाची मागणी ही विविध हेतूनी प्रेरित असते, ती उत्पन्नाच्या वाढी बरोबर पैशाची मागणी वाढते. LM वक्र, वित्त बाजारातील समतोल पुढील दोन कारणामुळे बदलू शकतो.

१) पैशाच्या मागणीतील बदल

२) पैशाचा पुरवठा

आपणास माहितीच आहे कि प्रा. केन्स यांच्या तरलता प्राधान्य सिद्धांत व व्याजदराचे निर्धारण यानुसार जर पैशाचा पुरवठा वाढला व पैशाची मागणी स्थिर राहिली तर व्याजाचा दर कमी होतो. अशा परिस्थिती मध्ये LM वक्र उजवीकडे सरकतो. याच्या विरुद्ध पैशाचा पुरवठा कमी झाला किंवा दिलेल्या उत्पन्न पातळीवर व्याज दर कमी झाल्यास LM वक्र मूळ स्थानाच्या डावीकडे सरकेल.

६.५ IS-LM एकत्रित संतुलन

वरील विवेचनावरुन वस्तूबाजार व IS वक्र तसेच मुद्राबाजार व LM वक्राची प्राप्ती कशी होते हे दिसून येते. आता वस्तूबाजार IS व मुद्राबाजार (LM) यांच्याद्वारे IS-LM संतूलन व संतूली व्याजदराची निश्चिती कशी होते हे स्पष्ट करता येईल.



आकृती क्रमांक ६.३

वरील आकृतीमध्ये E या संतूलन बिंदूमध्ये पैशाची मागणी व पैशाच्या पुरवठा जेथे संतूलित असतो तो मुद्राबाजारातील LM वक्र बचत व गुंतवणूक ज्या ठिकाणी समान बनते तो वस्तू बाजारातील IS वक्र परस्परांना छेदतात. म्हणून E बिंदू वस्तू बाजार व मुद्राबाजारतील एकत्रित संतूलन (IS = LM) प्रस्थापित होऊन संतूलित व्याजदर or व संतूलित उत्पन्नाची पातळी OY निश्चित होतो.

राजकोषिय धोरणाचा (Fiscal Policy) एक भाग म्हणून किंवा मौद्रिक धोरणाचा (Monetary Policy) एक भाग म्हणून जर IS किंवा LM वक्रात कोणताहि बदल झाला तर

वरील संतूलन बदलून व्याजदर आणि उत्पन्न पातळीदेखील बदलेले हेच पूढीलप्रमाणे दर्शविता येईल.

६.६ सारांश (SUMMARY)

IS वक्र हा वस्तू बाजाराचे प्रतिनिधित्व करतो, तर LM वक्र वित्त बाजाराचे प्रतिनिधित्व करतो. IS वक्र हा व्याज दर व राष्ट्रीय उत्पन्न यामधील ऋण सहसंबंध निर्देशित करतो. IS वक्र हा अधोगामी असतो. तर दुसरीकडे LM वक्र ऊर्ध्वगामी स्वरूपाचा असतो. IS-LM वक्रांचा छेदन बिंदू हा वस्तू बाजार आणि वित्त बाजार यांचा समतोल निर्देशित करतो. ज्याठिकाणी व्याजाचा दर आणि उत्पन्नाचा स्थर निर्धारित होतो.

६.७ प्रश्न

१. LM वक्राची व्याख्या देवून LM वक्र रेखांकित करा.

२. LM वक्राचा उतार व स्थलांतर स्पष्ट करा.

३. IS-LM एकत्रित संतुलन स्पष्ट करा.

*****

munotes.in

मॉड्युल-IV

७

व्यवहारतोल

घटक रचना

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ व्यवहारतोल रचना

७.३ व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार

७.४ व्यवहारतोल असमतोलाची कारणे

७.५ व्यवहारतोल असमतोल दुरूस्त करण्याचे उपाय

७.६ सारांश

७.७ सराव प्रश्न

७.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

अर्थ शास्त्रात रूढ असलेल्या सूक्ष्म व स्थूल या संकल्पना आंतरराष्ट्रीय व्यापारातही वापरल्या जातात. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल किंवा आंतरराष्ट्रीय व्यवहार शेष ही संकल्पना समष्टी (स्थूल) दृष्टिकोनातून अभ्यासली जाते. आपण सदर प्रकरणात आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाची संकल्पना व संरचना समजावून घेणे.

२. द्विनोंद पद्धती समजून घेणे.

३. प्रतिकूल व्यवहार तोलाचा अर्थ व त्याचे विविध प्रकार व कारणे अभ्यासणे.

७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

एका देशाचे दुसऱ्या देशाबरोबरचे पैशातील देणे-घेणे फक्त व्यापारी वस्त्राच्या आयाती – निर्याती मधूनच निर्माण होते असे नाही तर अशा अनेक बाबी आहेत की, त्याच्यामुळे देश दुसऱ्या देशाला काही देणे लागतो व त्यामुळेच दुसऱ्या देशातून काही उत्पन्नही येत असते.

व्यापारी बाबींना किंवा वस्त्राच्या आयात निर्यातीला दृष्य बाबी असे म्हणतात. या बाबींची नोंद बंदरावरील कस्टम अधिकाऱ्यांकडे असते. म्हणजे आपल्या देशातून किती वस्तू बाहेरच्या देशात निर्यात झाल्या आणि किती आयात झाल्या याचे प्रत्यक्ष नोंद बघण्यास मिळते. म्हणून या बाबींना दृश्य बाबी असे म्हणतात.

'अदृश्य बाबी म्हणजे ज्याची नोंद त्यावरील कस्टम अधिकाऱ्याकडे होत नाही, परंतु देशाच्या बाबतीत देणे आणि घेणे निर्माण होत असते. उदा. वाहतूक, बँक, पर्यटन सेवा इत्यादी. उदा. समजा आपल्या देशातील बँकेने परकीयांना सेवा दिली तर परकीय लोक त्याचा काही मोबदला आपल्या बँकेला देतील. त्यामुळे ते आपल्या देशाचे उत्पन्न असते.' आंतरराष्ट्रीय व्यवहार देणे आणि घेणे अशा दोन गटात वर्गीकरण केले जाते.

B= RE-PF

व्यवहारतोल = परकीय येणे- परकीय खर्च

B = व्यवहारतोल

RF= परकीय येणे

PF = परकीय खर्च

परिस्थिती ऋण फरकाची असेल तर त्यास तुटीचा व्यवहारतोल असे म्हणतात.

७.२ व्यवहारतोल संरचना (STRUCTURE OF BOP)

व्यवहारतोलात समाविष्ट केल्या जाणाऱ्या बाबी (Components of Balance of payment):

व्यवहार तोलात दोन विभाग समाविष्ट आहेत

१) चालू खाते

२) भांडवली खाते

त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारांचे (१) वास्तव व व्यवहार व (२) वित्तीय व्यवस्था असे दोन प्रकार केले जातात उदा. आयात निर्यात. निर्यात उत्पन्न निर्माण करते, तसेच देशातील लोक परकीयांकडून वस्त्र व सेवा खरेदी करतात. त्याला आपण आयात म्हणतो. ती परकीयांसाठी उत्पन्न निर्माण करते. म्हणून वस्त्र व व्यवहार उत्पन्न निर्माण करणारे असतात. याउलट पैशाच्या किंवा चलनाच्या स्वरूपात होणारे व्यवहार वित्तीय व्यवहारात मोडतात. वित्तीय व्यवहार बऱ्याचदा भांडवली व्यवहार म्हणून ओळखले जातात. हे व्यवहार देशाच्या उत्पन्न पातळीवर प्रत्यक्षपणे परिणाम करत नाहीत. व व्यवहारामध्ये फक्त भांडवल व भांडवली संपत्ती तसेच देशाची देयता यांच्यात बदल होत असतो. म्हणून उत्पन्न निर्माण करणारे व्यवहार किंवा वास्तव व्यवहार व्यवहारतोलाच्या चालू खात्यांमध्ये येतात तर वित्तीय किंवा भांडवली व्यवहार भांडवली खात्यात येतात.

व्यवहारतोलाची संरचना (Structure of BOP)

प्राप्ती(पत) येणे जमा		**देणी (खर्च)**	
१.	मालाची निर्यात	अ)	मालाची आयात

munotes.in

व्यापारी (खाते) (१ - अ)			
२.	सेवांची निर्यात	ब)	सेवांची आयात
३.	व्याज नफा आणि लाभांश प्राप्ती	क)	व्याज, नफा आणि लाभांश देणी
४.	एक पक्षी प्राप्ती	ड)	एक पक्षी देणे
चालू खाते			
(१ + २ + ३ + ४) - (अ + ब + क + ड)			
५.	परकीय गुंतवणूक	इ)	परदेशात केलेली गुंतवणूक
६.	अल्पकालीन करणे	ई)	अल्पकालीन करते कर्ज
७.	मध्यम आणि दीर्घकालीन कर्ज घेणे	प)	मध्यम आणि दीर्घ कालीन कर्जे देणे
भांडवली खाते			
(५ + ६ + ७) - (इ + ई + प)			
८.	दोष आणि त्रुटी	फ)	दोष आणि त्रुटी
९.	साठ्यातील बदल	ग)	साठ्यातील बदल
(८ + ९ +) - (फ + ग)			
एकूण प्राप्ती = एकूण देणी			
Total Receipts = Total Payments			
(१ ते ९) - (अ ते ग)			

१) चालू खाते:

चालू खात्यामध्ये दोन मुख्य बाबी असतात.

१) दृश्य बाबी किंवा दृश्य खाते

२) अदृश्य बाबी किंवा अदृश्य खाते.

दृश्य खात्यांमध्ये वस्तूची आयात आणि निर्यात समाविष्ट होते तर अदृश्य खात्यामध्ये सेवांचे मोबदले किंवा देणग्या यांचा समावेश होतो. म्हणजेच बदली देणाऱ्यांचा समावेश या खात्यातही होतो. सर्वसाधारणपणे बँक, विमा, कर्जावरील व्याज, पर्यटकांचा खर्च, वाहतूक शुल्क, आणि देणग्या यांचा समावेश या विभागात होतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) पुढील बाबींचा समावेश अदृश्य बाबींमध्ये केला आहे.

१. वस्तूंची आंतरराष्ट्रीय वाहतूक, यामध्ये वाहतूक करताना कराव्या लागणाऱ्या साठवणूक खर्च व इतर खर्चाचाही समावेश होतो.

२. व्यवहार, शिक्षणा, आरोग्य, आंतराष्ट्रीय समारंभ इत्यादींसाठीचा प्रवास खर्च.

३. विम्याचे हप्ते आणि दावे.

४. व्याज, खंड, लाभांश, आणि नफा यांसारखे गुंतवणूक उत्पन्न.

५. जाहिरात, दलाली, सिनेमांचे भाडे, निवृत्तीवेतन, पेटंट फी, रॉयल्टीज आणि नियतकालीकाची वर्गणी.

६. देणग्या

७. भांडवली गुंतवणूकीवरील घसारा.

२) भांडवली खाते:

कर्ज आणि इतर दावे भांडवली खात्यात येतात. आयात-निर्यातीसाठी करण्यात येणारा भांडवल पुरवठा तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून येणार भांडवल पुरवठा होणाऱ्या कर्जाऊ व्यवहाराचा समावेश या खात्यात होतो. त्यानुसार खाजगी भांडवली, आंतरराष्ट्रीय संस्था भांडवली खाते आणि सरकारी भांडवली खाते, अशी विविध खाती भांडवली खात्यात येतात.

खाजगी भांडवली खात्यात महामंडळे आणि व्यापारी बँका यांचे आंतरराष्ट्रीय भांडवली व्यवहार येतात. हे व्यवहार अल्पकालीन आणि दीर्घकालीन असू शकतात. आंतरराष्ट्रीय भांडवली खात्यात जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय वित्त पुरवठा महामंडळ, आंतरराष्ट्रीय विकास संस्था, बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट यासारख्या या संस्थांनी अल्पकालीन आणि दीर्घकालीन केलेल्या भांडवली व्यवहारांचा समावेश होतो. सरकारी भांडवली खात्यात अनुदाने, अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्जाचे सरकारी पातळीवर होणारे व्यवहार समाविष्ट असतात.

३) समायोजन खाते:

यालाच सरकारची संरक्षित मालमत्ता असे म्हटले जाते. इंग्लंड आणि अमेरिकेच्या बाबतीत प्रदेश-देश स्वतंत्र दाखवता येतात. त्याचे व्यवहार स्वतंत्र असल्याने सरकारने निव्वळ सरकारी राखीव संपत्ती ठेवते. सरकार तडजोडीने देयता बदलते. देयकाची जबाबदारी सरकारवर असते. प्रत्येक वर्षी सरकारी राखीव संपत्तीत बदल होतो. सरकारी राखीव संपत्ती परकीय चलनात बदलता येते आणि तशी तरतूद आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) मध्ये आहे.

४) चूक आणि भूल:

जमाखर्चाची तीन्ही खाती बरोबर असल्यास त्यामुळे समतोल होतो ही देशाच्या व्यवहारतोल समतोलाची बाब आहे. देशाच्या व्यवहारतोल द्वीनोंदी लेखाकर्म पद्धतीने तयार केला जातो. त्यामुळे प्रत्येक बाब देणे आणि घेणे बाजूला येते. त्यामुळे लेखाकर्माच्या दृष्टीने येणे आणि देणे दोन्ही सारखे दिसतात.

आपली प्रगती तपासा:

१. व्यवहारतोल म्हणजे काय

२. व्यवहारतोलाच्या संरचनेतील प्रमुख घटक/खाते सांगा

३. व्यवहारतोलाची द्विनोंद पद्धत म्हणजे काय

munotes.in

७.३ व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार व कारणे (TYPES AND REASONS OF BOP DISEQUILIBRIUM)

जेव्हा एखाद्या देशाच्या एकूणच दृश्य आणि अदृश्य आयातीचे मूल्य हे एकूण निर्यात मूल्यापेक्षा जास्त असते तेव्हा देशाचा व्यवहारतोल प्रतिकूल होतो. याउलट एखाद्या देशाच्या एकूण दृश्य व अदृश्य आयात मूल्यापेक्षा निर्यात मूल्य जास्त असेल तर त्या देशाला व्यवहार शेष अनुकुल आहे असे म्हणतात. एकूण व्यवहार तोलाचा विचार केल्यास त्यामध्ये नेहमी समतोल असतो.

देशाच्या व्यवहारतोलात समतोल साधणे हे भांडली खात्यातील समायोजनातून शक्य होते. जेव्हा चालू खात्यावरील येणी आणि देणी समान होतात; तेव्हा व्यवहारतोलाचा समतोल साधला जातो. तथापि, अशा प्रकारचा समतोल क्वचितच दिसून येतो. चालू खात्यावरील तूट किंवा शिल्लक ही भांडवली खात्यावर हस्तांतरित करून समतोल साधला जातो. यासाठी प्रामुख्याने पुढील तीन निर्णय घेतले जातात.

१. देशाच्या राखीव निधीचा वापर केला जातो.

२. विदेशातून कर्ज घेतले जाते.

३. सोन्याची निर्यात केली जाते तसेच नाणेनिधी कडून अल्पकालीन मदत घेतली जाते.

व्यवहारतोल आतील प्राप्ती खर्चाच्या असमतोल आतून संतुलन निर्माण होते त्याचे प्रमुख चार प्रकार पडतात.

BOP = R – P

R = एकूण प्राप्ती

P = एकूण खर्च

वरील सूत्रानुसार,

जर R>P तर BOP = 0 किंवा +ve BOP असमतोल

जर R>P तर BOP = 0 किंवा -ve BOP असमतोल

जर R = P तर BOP = 0 - असमतोल

व्यवहारतोल असमतोलाचे प्रकार:

१. संरचनात्मक असमतोल:

देशात निर्माण होणाऱ्या रचनात्मक बदलातून आयात आणि निर्यात वस्तूंच्या मागणी पुरवठ्यात रचनात्मक व स्वरुपाचे बदल होतात. त्यातून व्यवहारतोल आत संरचनात्मक असमतोल निर्माण होतो.

समजा, भारताची ज्यूट वस्तूंची विदेशातील मागणी कमी झाली म्हणून भारताच्या ज्यूट उद्योगांतील साधनांचा इतर निर्यात उद्योगात स्थानांतरीत करावे लागेल. जर ते शक्य झाले नाही तर भारताच्या निर्यातीत घट होईल आणि त्याच वेळेला आयात पूर्वीसारखी राहील. आणि व्यवहारतोलात असमतोल निर्माण होईल. या असमतोलाला संरचनात्मक असमतोल असे म्हणतात.

२) दीर्घकालीन असमतोल:

हा समतोल काही मूलभूत कारणांमुळे निर्माण होत असतो आणि तो दीर्घकाळ टिकून राहतो. भांडवल निर्मिती, लोकसंख्या वाढ, प्रादेशिक विस्तार, तांत्रिक सुधारणा, नवनिर्मिती इत्यादी. यासारख्या कारणांमुळे असा समतोल निर्माण होतो. नवीन विकसनशील अर्थव्यवस्थेत आर्थिक वृद्धीसाठी अंतर्गत बचतीपेक्षा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. म्हणून आयात मोठ्या प्रमाणात होऊन व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. असा असमतोल एकाएकी दुरुस्त करता येत नाही. दीर्घ काळ टिकून राहतो. म्हणून त्याला दीर्घकालीन असमतोल असे म्हणतात. त्याचप्रमाणे एखाद्या देशामध्ये लोकसंख्या वाढ वेगाने होत असेल तर, त्या देशाची आयात वाढते. त्याचवेळेला निर्यातीत घट होते आणि अर्थव्यवस्थेत दृढमूल (Chronic) स्वरूपाचा असमतोल निर्माण होतो.

३) अल्पकालीन समतोल

व्यवहार शेषातील जो असमतोल अस्थायी किंवा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो त्यास अल्पकालीन असमतोल म्हणतात. जेव्हा एखादा देश नाणे निधीसारख्या संस्थेकडून अल्पकाळासाठी पैशाची उचल घेतो तेव्हा असा असंतुलन उद्भवण्याची शक्यता असते. परंतु जेव्हा विशिष्ट कालावधीत ही उचल परत केली जाते तेव्हा असा असमतोल आपोआप दूर होत असतो. परंतु जर हा असमतोल योग्य वेळेत सोडविला नाही तर त्याचे जुनाट स्वरुपाचं असमतोलात रूपांतर होते.

४) चक्रीय असमतोल:

व्यापार सक्रिय बदलांच्या प्रभावामुळे व्यवहारतोलात चक्रीय असमतोल निर्माण होतो. त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ) व्यापार चक्राचे स्वरूप:

अ) वेगवेगळ्या देशात व्यापारचक्राचे स्वरूप वेगवेगळे असते तसेच व्यापारचक्राचा कालावधी आणि निर्माण होण्याची वेळ वेगवेगळ्या देशात वेगवेगळी असते.

ब) वेगवेगळ्या देशात समतोलासाठी सारख्याच प्रकारचे कार्यक्रम आणि उपाययोजना केल्या जात नाहीत.

क) वेगवेगळ्या देशात आयात मागणीची किंमत लवचिकता वेगवेगळी असते.

ड) वेगवेगळ्या देशातील आयातीच्या मागणीची उत्पन्न लवचिकताही हे वेगवेगळी असते.

त्याचप्रमाणे लोकांची पसंती, फॅशन, सवयी, उत्पन्न, आर्थिकप्रगती यांसारख्या कारणानेही मागणीत बदल होतो. आयात प्रवृत्तीत बदल होतो. काही आयात वस्तूंची मागणी वाढते. तर काही वस्तूंची मागणी घटते. त्यामुळे देखील व्यवहार तोलात असमतोल निर्माण होतो.

प्रतिकूल व्यवहार तोलाची कारणे:(Causes of disequilibrium in BOP):

एक किंवा अनेक घटकांतील बदलांमुळे व्यवहारतोलात असमतोल निर्माण होत असतो. हे घटक क्लिष्ट स्वरूपाचे असतात. त्यांचा एकमेकांवरही परिणाम होत असतो. व्यवहारतोलावर दिसणारा प्रत्यक्ष परिणाम पुन्हा वेगळा असतो. व्यवहारतोलातील असमतोलाचे स्वरूप देशागणिक वेगवेगळे असते. व्यवहारतोलाच्या रचनेवर अनेक बाबी परिणाम करत असतात. यामध्ये दृश्य-अदृश्य आयात-निर्यातीचे देशांचे एकमेकांबरोबरचे परिणाम करत असतात. एखाद्या घटकांमध्ये एकाच बाजूचे कायमस्वरूपी बदलत असेल तर त्यामुळेही व्यवहारतोलात असमतोल निर्माण होतो. व्यवहारतोलात असमतोल निर्माण करणारी काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

याची विभागणी दोन गटात केली जाते:

अ) आर्थिक कारणे

आ) आर्थिकेत्तर कारणे

अ) आर्थिक कारणे:

१. विकास कार्यावरील खर्च:

अनेक विकसनशील राष्ट्रांत करून जलद आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला असतो. परिणामी देशातील लोकांच्या क्रयशक्तीत वाढ घडून येते. वाढत्या क्रयशक्ती मुळे लोकांच्या आयात क्षमतेत वाढ होते आणि देशाची आयात वाढते. मात्र याचवेळी देश विकासाच्या प्राथमिक अवस्थेत असल्याने अशी देशांची निर्यातक्षमता कमी असते. याचा परिणाम म्हणून व्यापारतूट निर्माण होते आणि कालांतराने त्याचे रूपांतर व्यवहारशेषातील असमतोलात होते.

२. व्यापार चक्रे:

अनेक देशातील आर्थिक घटनांमध्ये सातत्याने चक्रीय स्वरूपाचे बदल घडून येतात. अर्थव्यवस्थेत कधी तेजी तर कधी मंदीची चक्रे सतत येत असतात. त्याचा परिणाम संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर होत असतो. ज्या देशातील तेजीची अवस्था दीर्घकाळ राहते त्या देशाची आयात वाढते. परिणामी त्या देशाची व्यापारतूट वाढते आणि व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

३. आयात लवचिकतेतील बदल:

जेव्हा आपल्या देशाची आयात लवचिकता बदलते तेव्हा हा आपली आयातीची क्षमता बदलते. तसेच जेव्हा देशांची आयात लवचिकता बदलते तेव्हा त्या देशाची आयातक्षमता बदलत असते. तर आयात लवचिकता बदलल्यामुळे एखाद्या देशाची आयात वाढत असेल

तर अन्य देशातील उत्पादन, रोजगार, गुंतवणूक आदी गोष्टींना चालना मिळते. आणि त्याची निर्यात क्षमताही बदलते. परिणामी व्यापार असमतोल व व्यवहार असमतोल निर्माण होतो.

४ . बाह्य उचल:

जेव्हा एखाद्या देशाकडून मोठ्या प्रमाणावर विदेशी उचल घेतली जाते तेव्हा भांडवली खात्यावर पैसे होत असले तरीही त्यामुळे भविष्यातील देयता मोठ्या प्रमाणावर वाढते. याचा परिणाम म्हणून व्यवहारशेषात तूट तसेच असमतोल निर्माण होतो.

५. भाववाढ :

आर्थिक विकासासाठी केलेल्या खर्चामुळे देशातील लोकांची क्रयशक्ती मोठ्या प्रमाणावर सुधारते. परिणामी जनतेकडून देशी तसेच विदेशी वस्तूंची आयात मोठ्या प्रमाणावर होते. देशी वस्तूंच्या वाढत्या मागणीमुळे वस्तूंची टंचाई निर्माण होते. त्यामुळे त्या देशाची निर्यात घटण्याची शक्यता असते. तसेच वाढत्या मागणीमुळे देशात भाववाढीची स्थिती निर्माण होऊन आयातवृद्धी होण्याची शक्यता असते त्यामुळेही व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

६. वाढती लोकसंख्या:

अविकसित देशात लोकसंख्या झपाट्याने व मोठ्या प्रमाणावर वाढत असते. अशा सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशाच्या आयातीत वाढ होते तर निर्यातीत घट होते. आणि त्यामुळे देशाचा व्यवहार समतोल बिघडतो.

७. प्रदर्शन प्रभाव

प्रदर्शन प्रभाव हे विशेषतः अविकसित देशाच्या व्यवहारशेषातील असमतोलाचे कारण होय. जेव्हा अविकसित देश आर्थिक, राजकीय, सामाजिक बंधनांमुळे विकसित देशांच्या संपर्कात येतात तेव्हा विकसित देशांच्या राहणीमानाचा प्रभाव पडून अविकसित देशांची विविध वस्तूंकरिता मागणी वाढते त्यामुळे आयात वाढते

८. विकसित देशांकडून गुंतवणुकीचा अभाव:

विकसित देशांनी अविकसित देशात जर मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली तर अविकसित देशात उद्योगधंदे वाढून रोजगार निर्मिती व उत्पादनात वाढ होते. परिणामी निर्यात वाढते आणि त्यामुळे व्यवहारशेषातील असमतोल दूर होऊ शकतो. परंतु अलीकडच्या काळात विकसित देश व अविकसित देशात गुंतवणूक करण्यास असमर्थ ठरले आहेत त्यामुळे अविकसित देशांच्या व्यवहारशेषात असमतोल आढळून येतो.

९. नावलौकिक:

बऱ्याच विकसनशील देशांनी आपल्या मालाविषयी नावलौकिकता कमावलेली आहे. त्या देशांत माल चांगला, टिकाऊ, दर्जेदार, व खात्रीदायक असतो अशी जगभर प्रसिद्धी झालेली असते. त्यामुळे बहुतांशी देशात अशा देशातीलच मालाची मागणी केली जाते. आज असा Made in U.S.A., Made in Japan असा शिक्का असणाऱ्या मालाला भरपूर मागणी

आहे. त्यामुळे जागतिक अनेक देश अशा देशांकडून मालाची मोठ्या प्रमाणावर आयात करतात. परिणामी आयातीत झालेल्या वाढीमुळे व्यवहार शेषात असमतोल निर्माण होतो.

१०. आर्थिक विषमता:

विकसित देशाचा विकास होत असताना देशात आर्थिक विषमता वाढते. आर्थिक विषमतेमुळे अविकसित देशात श्रीमंतांचा एक वर्ग परदेशी प्रवास करणे, परदेशी वस्तू अधिक प्रमाणात वापरणे अशा अनेक गोष्टी करतात. त्यामुळे अविकसित देशातील पैसा परदेशात जातो. देशाची परदेशी मालाची आयात वाढते आणि त्याचा परिणाम म्हणून देशाच्या व्यवहारशेषात असमतोल निर्माण होतो.

ब) आर्थिकेत्तर कारणे:

१) राजकीय घटक:

देशात जर राजकीय अस्थिरता असेल तर मोठ्या प्रमाणावर परकीय भांडवल देशाबाहेर जाऊ शकते तसेच देशांतर्गत गुंतवणूकीचे प्रमाणही घटत जाते. परिणामी देशातील उत्पादन प्रक्रियेत अडथळे येतात व ती मंदावते. या सर्वांचा परिणाम त्या देशाच्या व्यवहारशेषात तूट किंवा असमतोल निर्माण होतो.

२. सामाजिक घटक:

लोकांच्या सवयी, आवडी, सामाजिक चालीरीती, रूढी-परंपरा, सतत बदलणारी फॅशन इत्यादी अनेक घटकांचा प्रभाव देशाची आयात प्रभावित करतात. तसेच लोकसंख्या वाढ, देशी वस्तूंबाबतचा पूर्वग्रह इत्यादी अनेक घटकांमुळेही त्या देशाच्या निर्यात क्षमतेवर प्रभाव पडतो. अशा प्रकारे या सामाजिक घटकातील बदलांमुळेही व्यवहारशेष असमतोल आढळतो.

आपली प्रगती तपासा

१. व्यवहार तोल असमतोलाचे प्रकार सांगा.

२. व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे कोणती आहेत?

७.५ व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे उपाय (MEASURES TO CORRECTING DISEQUILIBRIUM IN BOP)

देशाच्या या व्यवहारतोल आत दीर्घकाळ असंतुलन टिकून राहत असेल तर ते आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आणि त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अयोग्य असते. व्यवहार तोलात जेव्हा तूट असते, तेव्हा त्या देशांच्या वस्तूंची व सेवांची निर्यात आयातीच्या तुलनेने अधिक घटते. व्यवहारतोलात सतत तूट किंवा आधिक्य राहणे, अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने अयोग्य राहते.

व्यवहारतोलातील तुटीचे अधिक्यापेक्षा देशाच्या आर्थिक वृद्धीवर अधिक गंभीर परिणाम होत असतात. म्हणून व्यवहारतोलातील तूट लवकरात लवकर भरून काढण्यासाठी प्रयत्न

करावे लागतात. प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी निर्यातीला प्रोत्साहन आणि आयातीला प्रतिबंध असू शकेल. अशा प्रकारच्या उपाय योजना कराव्या लागतात.

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे उपाय दोन प्रकारात स्पष्ट केले जातात.

अ) चलनी साधने:

१) चलन संकोच

२) चलनाच्या बाह्यमूल्यात घट/ ऱ्हास

३) अवमूल्यन

४) विनीमय नियंत्रण

या साधनांचा समावेश होतो.

ब) गैरचलनी साधने:

१. आयात जकाती

२. आयात कोटा

३. निर्यात प्रोत्साहन धोरण आणि कार्यक्रम इत्यादींचा समावेश होतो.

व्यवहारतोल स्थिती मध्ये सुधारणा करण्यासाठी योजण्यात येणाऱ्या चलनी साधनांचा दुहेरी परिणाम होत असतो. चलनी साधने एका बाजूला निर्यातीत वृद्धीसाठी उपयुक्त होतात तर दुसऱ्या बाजूला आयात कमी करण्यासाठी मदत करतात, चलनी साधनांचा परिणाम अप्रत्यक्षपणे होत असतो. तर दुसऱ्या बाजूला गैरचलनी साधनांचा परिणाम प्रत्यक्षपणे होत असतो. हा परिणाम प्रभावी असला तरी तो एकांगी असतो.

अ) चलनी साधने (Monetary Measures):

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी सामान्यपणे चलनी साधने निर्माण वाढीला आणि आयात घटी ला मदत करत असतात. काही प्रमुख चलनी साधने पुढील प्रमाणे आहेत.

१. चलन संकोच:

व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्यासाठी सनातन अर्थशास्त्रज्ञांनी हा उपाय सुचविला होता. चलनसंकोच म्हणजे महाग पैसा आणि पतधोरण स्वीकारून देशातील पैशाच्या संख्येत घट केली जात असते. त्यामुळे देशी वस्तूंचा खर्च आणि किंमतीमध्ये घट होते. त्यामुळे देशाच्या निर्यात वस्तू विदेशी बाजारपेठांमध्ये स्वस्त होतात. म्हणून विदेशी बाजारपेठांमधील त्यांची मागणी वाढ होऊन देशाच्या चलनसंकोचामुळे उत्पन्नात घट होऊन लोकांच्या देशी वस्तूंची मागणी कमी केली जाते. पुढे जास्तीत जास्त वस्तू

निर्यातीसाठी उपलब्ध होतात व देशाची निर्यात वाढण्यास मदत होते. चलन संकोचामुळे देशातील लोकांचे उत्पन्न घटते त्यामुळे त्याची आयात प्रवृत्ती कमी होऊन आयात घटीस चालना मिळते. म्हणून चलन संकोचकारक चलनी धोरणामुळे जेव्हा निर्यात वाढते आणि आयात कमी होते तेव्हा व्यवहारतोलातील तूट आपोआप दुरुस्त होते.

२. चलनाच्या बाह्य मूल्यात घट:

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे महत्वाचे साधन म्हणून देशी चलनाच्या बाह्य मूल्यात घट करण्याचे धोरण याकडे बघितले जाते. जेव्हा देशात बदलते विनिमय दर धोरण स्वीकारलेले असते तेव्हाच साधनांचा वापर करता येतो आणि चलनाच्या बाह्य मूल्यात घट करणे शक्य होते. एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशातील चलनातील मूल्य जेव्हा कमी होते तेव्हा याचा अर्थ चलनाच्या या बाह्य मूल्यात ऱ्हास होतं आहे असा होतो.

देशी चलनाचा बाह्य मूल्यात ऱ्हास झाल्याने देशी वस्तू परकीयांना स्वस्त वाटतात. त्यामुळे निर्यात वाढीस चालना मिळते. याउलट आयात वस्तू देशी लोकांना महाग होतात. त्यांची मागणी कमी होऊन आयातीत घट होते. त्यामुळे व्यवहारतोलात असलेली तूट कमी होऊन व्यवहारातील देशासाठी अनुकूल होण्यास मदत होते. देशाची आयात आणि निर्यात वस्तूंची मागणीची लवचिकता बऱ्यापैकी लवचिक असेल तर चलनाच्या बाह्य-मूल्यातील नाममात्र घट देखील व्यवहारतोलातील तूट सहजपणे दुरुस्त करण्यास मदत करणारी ठरते.

३. अवमूल्यन:

प्रतिकूल व्यवहारतोल असलेल्या देशांमध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे साधन म्हणजे चलनाचे अवमूल्यन होय. अवमूल्यन म्हणजे कायदेशीररित्या या चलनाचे बाह्यमूल्य कमी करणार आहे. हे अवमुल्यन सर्व देशांच्या चलनाच्या बाबतीत किंवा सोन्याच्या संदर्भात केलेले असते. परंतु कधीकधी काही निवडक देशांच्या चलनांच्या बाबतीतही केलेले असते. उदा. ६ जून १९६६ रोजी भारतीय डॉलरच्या संदर्भातील मूल्य ५७.५% कमी केले जाते. त्यामुळे अमेरिकन डॉलरच्या रुपयातील विनिमयदर = २२ सेंट ऐवजी १ = १३.३ असा निश्चित करण्यात आला.

चलनाच्या अवमूल्यनामुळे नियमित वृद्धीसाठी मदत होते. कारण परकीयांना आपल्या वस्तू स्वस्त वाटू लागतात. त्यामुळे ते आपल्या वस्तू अधिक प्रमाणात खरेदी करतात. उलट परकीय वस्तू आपल्या देशातील ग्राहकांना देशी वस्तूंच्या तुलनेत महाग वाटतात. म्हणून आपले लोक त्या वस्तूंना फारशी पसंती देणार नाहीत. या सर्वांचा एकत्रितपणे परिणाम असा होतो की निर्यातीत मोठी वाढ होते आणि आयातीत घट होते.

४. विनीमय नियंत्रण:

व्यवहारतोल आतील असमतोल दुरुस्त करण्यासाठी विविध देशांमध्ये वापरण्यात येणारे आणखी एक महत्वाचे साधन म्हणजे विनीमय नियंत्रण होय. व्यवहारतोलातील असमतोल खात्रीशीरपणे दूर करण्यासाठी या साधनांचा वापर होतो. या पद्धती अंतर्गत विनिमय नियंत्रण मंडळ किंवा मध्यवर्ती बँक निर्यातदारांना त्यांचे परकीय चलनातील सर्व उत्पन्न

मध्यवर्ती बँकेकडे जमा करण्यास सांगते आणि हे परकीय चलन परवानाधारक आयात दारांना नियंत्रित दराने वाटते.

म्हणूनच विनिमय नियंत्रणामध्ये फक्त आयात परवाना धारकांनाच वस्तूची आयात करण्याची परवानगी असते. आयातीचा कोटाही निश्चित केलेला असतो. त्यामुळे देशाची आयात-निर्यात उत्पन्नाच्या मर्यादेमध्येच ठेवली जाते. आणि व्यवहारतोल असमतोल निर्माण होऊ दिला जात नाही.

ब) गैरचलनी साधने किंवा राजकोषीय साधने:

गैरचलनी साधनांमध्ये आयात जकाती आणि कोटा यांचा प्रामुख्याने उपयोग केला जात असतो. या साधनांमुळे निर्यातीला प्रोत्साहन मिळत असते. आयातीत घट घडून येते आणि देशी उद्योगांना संरक्षण मिळून आयात पर्यायीकरण आणि त्याचवेळेला काही प्रमाणात निर्यात वाढीला चालना मिळत असते त्यामुळे देशाच्या प्रतिकूल व्यवहारतोलात दुरुस्त होण्यास मदत होते.

१. आयात जकाती:

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आयातशुल्क या साधनांचा वापर केला जातो. निवडक आयात वस्तूंवर आयात शुल्क लादल्यामुळे त्यांच्या आपल्या देशातील किंमती वाढतात. म्हणून त्या वस्तूंच्या मागणीत घट होते. जर निर्यात परिणाम कमी राहत असेल किंवा वाढत असेल आणि आयातीत घट होत असेल तर देशाच्या या प्रतिकूल व्यवहारतोलात दुरुस्त होण्यास मदत होते.

२. आयात कोटा:

प्रतिकूल व्यवहारतोलात दुरुस्त करण्यासाठी आयात कोटा हे एक उपयुक्त साधन म्हणून वापरण्यात येते. या आयात कोटा पद्धतीत सरकार आयात वस्तूंची परिणाम किंवा मूल्य निश्चित करते आणि तेवढेच या विशिष्ट कालावधीमध्येच आयात करता येते. त्यामुळे विदेशातील होणारी आयात मर्यादित साधली जाते. आणि व्यवहारातील तुट त्याच्या प्रमाणात कमी केली जाते.

व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्याची एक प्रत्यक्ष पद्धती म्हणून कोटा हे एक उपयुक्त साधन मानले जाते. कोणत्या पद्धतीचा लगेच परिणाम होतो. पाहिजे असल्यास आयात शून्यावर देखील आणता येते.

३. निर्यात प्रोत्साहन व धोरण आणि कार्यक्रम:

वरील साधनांव्यतिरिक्त व्यवहारतोलात तूट असलेला देश निर्यात प्रोत्साहनाचे धोरण आणि कार्यक्रम राबवितो. निर्यात शुल्क कमी करणे, निर्यात उद्योगांना अनुदाने देणे या सारख्या साधनांचा वापर करून निर्यातीला वेगाने चालना देता येते. आयात पर्यायी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक मदत आणि सहकार्य करून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करते.

प्रतिकूल व्यवहारतोल दुरुस्त करण्यासाठी ही गैर चलनी साधने अधिक परिणामकारक असतात. या साधनांचा वापर उपयोग चलनी साधनाऐवजी केला जातो.

आपली प्रगती तपासा.

१. असमतोल व्यवहारतोल दुरुस्त करणाऱ्या मौद्रिक पद्धती (उपाय) कोणत्या आहेत?

२. अवमूल्यन म्हणजे काय?

३. असमतोल व्यवहारतोल दुरुस्त करण्याची गैरचलनी साधने कोणती?

७.५ सारांश (SUMMARY)

समष्टी अर्थशास्त्रात व्यवहारतोल ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. विशिष्ट काळात स. आयात व निर्यात होणाऱ्या या आर्थिक व्यवहाराची पद्धतशीरपणे नोंद ठेवणे व्यवहारतोल होय. व्यवहारतोलाची रचना व व्यवहार दुहेरी नोंद पद्धतीप्रमाणे होत असतात. व्यवहारतोल असमतोलाचे अल्पकालीन, दीर्घकालीन, मूलभूत चक्रीय असे विविध प्रकार आहेत. तसेच अनेक आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांचा प्रभाव व्यवहारतोल असमतोल होण्यास दिसून येतो. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था किंवा शासन व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्यासाठी मौलिक(Monetary) राजस्व (Fiscal) आणि प्रत्यक्ष उपायांचा उपयोग करून व्यवहारतोलातील असमतोल साधण्याचा प्रयत्न करते. साधारणतः जागतिक अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने अविकसित, विकसनशील देश चालू खात्यावरील आणि भांडवली खात्यावरील व्यवहारतोल योजनासाठी प्रयत्नशील असतात.

७.६ सराव प्रश्न (PRACTICE QUESTIONS)

१. व्यवहारतोल म्हणजे काय. व्यवहारतोलाची संरचना स्पष्ट करा

२. व्यवहाराची संज्ञा स्पष्ट करून व्यवहाराच्या संरचनेचे आणि घटकांचे थोडक्यात वर्णन करा

३. व्यवहारतोल असमतोलाची विविध कारणे कोणती आहेत?

४. व्यवहारतोल असमतोलास जबाबदार असणाऱ्या विविध घटकांची चर्चा करा.

५. व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे विविध उपाय थोडक्यात स्पष्ट करा.

६. व्यवहारतोल असमतोल दुरुस्त करण्याचे मौद्रिक व राजकोषीय उपाय स्पष्ट करा.

७. टीप लिहा: असमतोलाचे विविध प्रकार.

*****

munotes.in

८

परकीय चलन बाजार व विनिमय दर

घटक रचना

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ परकीय चलन बाजार

८.३ विनिमयदर धोरण

    ८.३.१ भारताचे विनिमयदर धोरण १९९१ पर्यंत

    ८.३.२ १९९१ नंतरचे विनिमयदर धोरण

८.४ विनिमय दराचे निर्धारण

८.५ स्थिर व लवचिक विनिमय दर

८.६ स्पॉट व फॉरवर्ड विनिमय दर

८.७ प्रश्न

८.० उद्दिष्टे (OBJECTIVES)

१. परकीय चलन बाजार व चलन बाजारातील सहभागी घटकांचा अभ्यास करणे.

२. भारताचे विनिमय धोरण अभ्यासणे.

३. रुपयाची व्यापार व भांडवली खात्यावरील परिवर्तनीयता समजावून घेणे.

४. विदेशी भांडवलाच्या भारताला असलेल्या गरजेचा आढावा घेणे.

५. भारतातील परकीय भांडवलाची स्थिती समजावून घेणे.

८.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

जगातील विविध देशात नैसर्गिक साधन सामग्री, भौगोलिक स्थिती आणि उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या घटकाच्या बाबतीत फरक आढळतो. जगातील कोणताही देश आपल्याला आवश्यक असलेल्या सर्वच वस्तू व सेवांची उत्पादन करू शकत नाही. त्यामुळे जगातील वेगवेगळ्या देशात वस्तू व सेवांचे देवाण-घेवाण सातत्याने चालू असते. आयातनिर्यातीच्या व्यवहारात सहभागी झालेले देश काही वस्तूंची आयात करतात तर काही वस्तूंची निर्यात करतात असे व्यवहार करण्यासाठी परकीय चलनाची आवश्यकता भासते कारण त्याशिवाय असे व्यवहार शक्य होत नाही. परकीय चलन उपलब्ध होण्यासाठी एका चलनाची दुसऱ्या चलना बरोबर अदलाबदल करण्याची गरज असते. आपल्या देशाचे चलन देऊन दुसऱ्या देशाचे परकीय चलन मिळवले जाते. अशाप्रकारे

परकीय चलन मिळविण्यासाठी चलना चलनातील देवाणघेवाण आवश्यक ठरते. खुल्या अर्थव्यवस्थेत अंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी परकीय चलनाची आवश्यकता असते.

८.२ परकीय चलन बाजार (FOREIGN EXCHANGE MARKET)

परकीय चलन बाजार म्हणजे अशी व्यवस्था किंवा यंत्रणा की ज्याद्वारे एका देशाचा चलनाचे रुपांतर दुसऱ्या देशांच्या चलनात करता येते.

परकीय चलन बाजारात एका देशाचे चलन देऊन दुसऱ्या देशाचे चलन मिळविले जाते. यातूनच चलनाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. हे व्यवहार परकीय चलन बाजारात होत असल्याने परकीय चलन बाजाराचा अर्थ पुढीलप्रमाणे, " परकीय चलन बाजार म्हणजे असा बाजार की, ज्या बाजारात विविध चलनांची खरेदी विक्री केली जाते. '

८.३ विनिमयदर धोरण (EXCHANGE RATE POLICY)

विनिमय दर एक महत्त्वाची संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणाऱ्या देशांना आपल्या देशाच्या चलनाच्या बदल्यात परकीय चलन मिळवावे लागते. दोन देशांच्या चलनांची देवाणघेवाण किंवा दोनच चलनांच्या विनिमय दर ज्या दराने ठरतो त्यास विनिमयदर म्हणतात. एका देशाचे चलन देऊन दुसऱ्या देशाचे चलन ज्या दराने मिळविले जाते त्यास परकीय विनिमय दर म्हणतात. विनिमयदर म्हणजे एका चलनाची दुसऱ्या चलनाचा रूपात व्यक्त केलेली किंमत असते. रू. ५५ $ १ हा डॉलर व रुपया या दोन चलनामधील विनिमय दर आहे. याचा अर्थ असा १ डॉलर मिळवण्यासाठी ५५ रुपये द्यावे लागतात.

विनिमय दर निश्चितीचे तीन प्रकार पडतात:

१. लवचिक विनिमय दर

२. स्थिर विनिमय दर

३. तरते विनिमय दर

१. लवचिक विनिमय दर:

लवचिक विनिमय दर पद्धतीत दोन चलनांच्या विनिमय दर, चलनाला असलेली मागणी व पुरवठा यावर अवलंबून असतो मागणी पुरवठ्यातील बदलाबरोबर विनिमय दर बदलतो.

२. स्थिर विनिमय दर पद्धती:

आर्थिक इतिहास बहुतेक देशांनी आपल्या चलनाचे विनिमय दर स्थिर ठेवणेच पसंत केले असे दाखवतो. दुसऱ्या महायुद्धापूर्वी विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी विविध देश आपल्या चलनाचे मूल्य सोन्याच्या विशिष्ट वजनात निश्चित करीत असतं त्याचप्रमाणे विविध देश आपापल्या चलनाचा विनिमय दर स्थिर ठेवण्याकरिता परकीय चलनाच्या बाजारात पेठेत हस्तक्षेप करीत असत.

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४७ते १९७१ याकाळात नाणे निधीची विनिमयदर पद्धतीची सुवर्ण प्रतिमान पद्धती प्रचलित होती. यालाच स्थिर विनिमयदर पद्धती असे म्हणतात. या पद्धती अंतर्गत नाणे निधीने अमेरिकन डॉलरचे मूल्य सोन्याच्या विशिष्ट वजनात व्यक्त केले. या स्थिर विनिमय दरात अधिक किंवा कमी एक टक्का बदल मागणी पुरवठ्यानुसार होत असला तर त्यात मध्यवर्ती बँकांनी हस्तक्षेप करू नये पण त्यापेक्षा जास्त बदल झाल्यास हस्तक्षेप करण्याचा अधिकार मध्यवर्ती बँकांना देण्यात आला.

३. तरते विनिमयदर:

विनिमय दर जेव्हा बाजार यंत्रणेवर सोपवून त्याशिवाय मध्यवर्ती बँकेकडून त्यांचे व्यवस्थापन केले जाते तेव्हा त्यास तरत्या विनिमय दराची पद्धती असे म्हटले जाते या पद्धतीत विनिमयदर निश्चित प्रमाणे मागणी पुरवठ्यावर सोपवली नसल्यामुळे याला व्यवस्थापित तरंग (Managed Float) असे देखील म्हटले जाते..

आपली प्रगती तपासा:

१. परकीय चलनबाजार म्हणजे काय?

२. परकीय चलनबाजारात सहभागी असणारे घटक कोणते?

३. विनिमय दर म्हणजे काय?

८.३.१ भारताचे विनिमयदर धोरण १९९१ पर्यंत:

१. १९७१ साली ब्रेटन वूड सुवर्ण परिणाम व पद्धती नष्ट होईपर्यंत रुपयाचे मूल्य सोन्याच्या स्वरूपात निश्चित केले जात असे. नाणेनिधी ने डॉलरचे मूल्य सोन्याच्या विशिष्ट वजनात व्यक्त केले आणि इतर देशांच्या चलनाचे विनिमय दर डॉलरशी निगडित केले. परंतु त्या काळात भारतात इंग्रजांची वसाहत असल्यामुळे भारतीय रुपयाचा दर पाउंड स्टर्लिंगशी निश्चित केला तो डॉलरशी निश्चित नव्हता. या विनिमय दरात एक टक्का कमी जास्त बदल करण्यास परवानगी देण्यात आली. यापेक्षा जास्त बदल झाल्यास मध्यवर्ती बँकेने हस्तक्षेप करून विनिमय दर स्थिर ठेवावा असे ठरले. १९४९ व १९६६ मध्ये रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले.

२. १९७१ साली सरकारने रुपयाचा दर अमेरिकन डॉलरच्या स्वरूपात व निश्चित केला तरीही मध्यस्थ चलन म्हणून पाउंड स्टर्लिंगचा उपयोग चालूच राहिला. देशी चलनाशी स्थिर दराने मध्यवर्ती बँक खरेदी-विक्री करत असलेले चलन म्हणजे मध्यवर्ती चलन होय. तर बदलत्या विनिमयदर मध्यवर्ती चलन होय. तर बदलत्या विनिमयदर पद्धतीत इतर देशाच्या चलनाची देशी चलनाचे दर मध्यस्थ चलनाच्या त्या इतर देशांच्या चलनाशी असलेल्या संबंधांवर ठरत असत.

३. १९७२ पासून पाउंड स्तरलींग चे मूल्य अमेरिकन डॉलर च्या संदर्भात घसरत होते. त्यामुळे रुपयाच्या मूल्यात देखील घसरण होत होती. स्वाभाविकच प्रमुख चलनाच्या संदर्भात रुपयांच्या मूल्यात प्रचंड घसरण झाली. प्रमुख चलनांच्या मूल्यात सारखे चढ-उतार होऊ लागले व बाजारात अनिश्चितता निर्माण झाली. त्यामुळे एका

चलनाच्या संदर्भात विनिमय दर ठरवण्याची पद्धती योग्य वाटेनाशी झाली म्हणून १९७५ मध्ये भारत सरकारने रुपया पाउंड स्टर्लिंग दुवा तोडून निवडणूक चलनांच्या गटाशी रुपयाचा संबंध जोडण्याचे ठरविले. १९९४

८.३.२ १९९१ नंतरचे विनिमयदर धोरण:

१९९१ साली रुपयाचे अवमूल्यन केले. या पद्धतीत एकूण प्राप्त होणाऱ्या विदेशी चलन यापैकी ४० टक्के चलन विनिमय या दराने रिझर्व बँकेचे अधिकृत चलन व्यापारा मार्फत जमा करणे. १९९२-९३ पासून दुहेरी विनिमय दराची चलन पद्धती स्वीकारण्यात आली. विदेशी चलनाचा व्यवहारावर अधिकृत विनिमयदराने करण्याचे नियंत्रण दुहेरी विनिमय दराच्या धोरणात महत्त्वाचे आहे. या पद्धतीत रुपया अंशत: परिवर्तनशील झाला. १९९४ साली रूपया संपूर्ण चालू खात्याच्या संदर्भात परिवर्तनशील झाला. १९९३ मध्ये दुहेरी विनिमयदर पद्धतीला पूर्णविराम देऊन बाजार यंत्रणेने निश्चित केलेल्या एकच विनिमयदर बाबतचे धोरण स्वीकारण्यात आले.

१ जुलै व 3 जुलै १९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाले. अवमुल्यनापूर्वीचा विनिमयदर १ डॉलर - २१.४० रुपये होता तो अवमूल्यानंतर १ डॉलर - ३६ रुपये झाला. त्यामुळे निर्यातीत वृद्धी व आयात पर्यायी करण्यास चालना मिळाली. तसेच परकीय भांडवल देशातून बाहेर जाण्यास आळा बसला. भारताच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा क्षमतेत भारत वाढ करणे हे या समायोजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

१९९३ पासून भारताने बाजार विनिमयदर पद्धती स्वीकारली. आता शासननिश्चित विनिमयदर पद्धती अस्तित्वात नाही. विदेशी चलन बाजारातील मागणी पुरवठ्यानुसार विनिमय दर ठरतो. परंतु सट्टेबाजी निर्माण होऊ नये म्हणून रिझर्व बँक बाजारपेठेत हस्तक्षेप करू शकते. या पद्धतीतील नियोजित निर्यातीत परिवर्तन पद्धती असे म्हणतात. रिझर्व बँकेच्या हस्तक्षेपामुळे रुपयाच्या बाह्य मूल्यात स्थैर्य प्राप्त होते आणि त्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा क्षमतेचे रक्षण व सुधारणा होते.

आपली प्रगती तपासा:

टिपा लिहा.

१. १९९१ पूर्वीचे विनिमयदर धोरण

२. १९९१ नंतरचे विनिमयदर धोरण

८.४ विनिमय दराचे निर्धारण (DETERMINATION OF EXCHANGE RATE)

आधुनिक काळातील विनिमय दर परकीय चलनाची मागणी (US $) आणि परकीय चलनाचा पुरवठा यांच्या छेदनबिंदूद्वारे निर्धारित केला जातो.

१. परकीय चलनाची मागणी:

परकीय चलनाची मागणी विनिमय दराशी विपरितपणे संबंधित आहे. परकीय चलनाची मागणी प्रामुख्याने आयातदार, व्यक्ती, संस्था आणि सरकारकडून येते. परकीय चलनाची मागणी खालील चित्राच्या सहाय्याने स्पष्ट केली आहे.



आकृती क्रमांक ८.१ परकीय चलनाची मागणी (यूएस डॉलर)

वरील आकृतीमध्ये, Df विदेशी चलनाची मागणी दर्शवते. उभ्या (y) अक्षावर, विनिमय दर मोजला जातो आणि क्षैतिज (x) अक्षावर, परकीय चलनाची मागणी मोजली जाते. Df हा डावीकडून उजवीकडे खाली उतरत येणारा वक्र आहे जो विनिमय दर आणि परकीय चलनाची मागणी यांच्यातील नकारात्मक संबंध दर्शवतो. जेव्हा विनिमय दर r0 वरून r1 वर घसरतो तेव्हा परकीय चलनाची मागणी D0 वरून D1 पर्यंत वाढते.

२. परकीय चलनाचा पुरवठा:

परकीय चलनाच्या पुरवठयाचा विनिमय दराशी सकारात्मक संबंध आहे. परकीय चलन मुख्यत्वे निर्यातदारांद्वारे पुरवले जाते, बाह्य कर्ज घेणे, देशाला भेट देणाऱ्या परदेशी नागरिकांकडून मिळणारी कमाई इत्यादी. विनिमय दर आणि परकीय चलनाचा पुरवठा यांच्यातील संबंध खालील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे.

आकृती क्रमांक ८.२ परकीय चलनाचा पुरवठा

वरील आकृतीमध्ये, Y-अक्षावर विनिमय दर आणि X-अक्षावर परकीय चलनाचा पुरवठा दर्शविला आहे. Sf विदेशी चलनाचा पुरवठा दर्शवतो. Sf हा सकारात्मक किंवा धनात्मक उतार असलेला वक्र आहे जो विनिमय दर आणि परकीय चलनाचा पुरवठा यांच्यातील सकारात्मक किंवा धनात्मक संबंध दर्शवतो. जेव्हा विनिमय दर r0 ते r1 पर्यंत वाढतो तेव्हा विदेशी चलनाचा पुरवठा D0 वरून D1 पर्यंत वाढतो.

३. विनिमय दराचे निर्धारण:

परकीय चलनाची मागणी आणि पुरवठा यांच्या छेदनबिंदूसह, विनिमय दर निर्धारित केला जातो. खालील आकृतीमध्ये Df हा परकीय चलन मागणी वक्र आहे आणि Sf विदेशी चलनाचा पुरवठा वक्र दर्शवितो. E0 वर, यूएस डॉलर (परकीय चलन) ची मागणी आणि पुरवठा एकमेकांच्या बरोबरीचा असतो आणि r0 विनिमय दर निर्धारित केला जातो आणि D0 रक्कम विदेशी चलनाची मागणी आणि पुरवठा केला जातो.



आकृती क्रमांक ८.३ विनिमय दराचे निर्धारण

८.५ स्थिर व लवचिक विनिमय दर (FIXED AND FLEXIBLE RATE)

८.५.१ परकीय विनिमय दर (FOREIGN EXCHANGE RATE):

परकीय विनिमय दर म्हणजे एका राष्ट्राच्या चलनाचे दुसऱ्या राष्ट्राच्या चलनाच्या संदर्भातील मुल्य होय. विनिमय दर हे एकतर सरकारद्वारे निश्चित केले जातात किंवा मागणी आणि पुरवठा या मुक्त बाजार शक्तींद्वारे निर्धारित केले जातात. दुसऱ्या महायुद्धापूर्वी, जगातील बहुतेक चलने सोन्यात परिवर्तनीय होती. नंतर, ब्रेटन वूड्स प्रणाली अस्तित्वात आली ज्यामध्ये जगातील देशांनी त्यांचा परकीय चलन दर यूएस डॉलरमध्ये मोजला. १९७३नंतर, लवचिक विनिमय दर प्रणाली अस्तित्वात आली ज्याअंतर्गत परकीय विनिमय दर बाजारातील मागणी आणि पुरवठा घटकांवर प्रभाव टाकत होता.

स्थिर विनिमय दर प्रणाली (पेग्ड सिस्टम) आणि लवचिक विनिमय दर प्रणाली (फ्लक्चुएटिंग सिस्टम) या दोन प्रमुख विनिमय दर प्रणाली आहेत. परकीय चलन बाजारातील व्यवहार उदा. परकीय चलन खरेदी आणि विक्री दराने होते, ज्याला "विनिमय दर" म्हणतात. हे बाजार कोणतेही भौतिक ठिकाण नसून बँका, विशेष विदेशी चलन विक्रेते आणि अधिकृत सरकारी संस्थांसह संपूर्ण संकुलाला जोडणारे दळणवळण प्रणालीचे नेटवर्क आहे ज्याद्वारे एका देशाचे चलन दुसऱ्या देशाच्या चलनात बदलले (दुसऱ्यामध्ये रूपांतरित) जाऊ शकते.

८.५.२ स्थिर विनिमय दर (FIXED EXCHANGE RATE):

स्थिर विनिमय दर ही अशी प्रणाली आहे जिथे विनिमय दर निश्चित केला जातो आणि विनिमयाची मागणी आणि पुरवठ्यातील बदल लक्षात घेतले जात नाहीत. हा दर सरकार पेगिंग ऑपरेशनद्वारे निश्चित करते. (विशिष्ट दराने विनिमय खरेदी आणि विक्री). दर स्थिर

munotes.in

ठेवण्यासाठी सरकार विनिमय नियंत्रणाचे पालन करते. ते विनिमय साठा कमी करण्यास मदत करते. हे आयएमएफ कराराचे वैशिष्ट्य आहे.

८.५.३ लवचिक विनिमय दर (FLEXIBLE EXCHANGE RATE):

लवचिक विनिमय दर या प्रणालीमध्ये जागतिक बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्यानुसार विनिमय दर चढ-उतार होत राहतो. विदेशी चलनांच्या मागणी आणि पुरवठ्याच्या मुक्त शक्तींनुसार विनिमय दर निर्धारित केला जातो. ही प्रणाली यूएसए सारख्या देशांसाठी योग्य आहे. विनिमयाची मागणी आणि पुरवठा संतुलनाने हा दर निर्धारीत केला जातो.

८.६ स्पॉट व फॉरवर्ड विनिमय दर (SPOT AND FORWARD EXCHANGE RATE)

स्पॉट विनिमय दर हा दोन चलनांमधील विनिमय दराचा संदर्भ देते जे बाजारात एक किंवा दोन दिवस टिकेल. दुसऱ्या शब्दांत, हा आज आणि उद्याचा दर आहे. हा दर बाजारातील व्यवहार सेट करण्यासाठी वापरला जातो.

फॉरवर्ड विनिमय दर हा असा विनिमय दर आहे जो भविष्यातील तारखेपासून लागू होईल. भविष्यात कधीतरी होणाऱ्या व्यवहाराची पुर्तता करण्यासाठी फॉरवर्ड विनिमय दर आज करार केला जातो. फॉरवर्ड विनिमय दर एक, तीन आणि सहा महिन्यांसाठी उद्धृत केला जातो. उदाहरणार्थ, यूएसए मधील आयातदार आज डॉलर्स खरेदी करेल जेणेकरून भविष्यात जेव्हा त्याला त्याने केलेल्या आयातीसाठी पैसे द्यावे लागतील तेव्हा त्याला आवश्यक डॉलर्स मिळतील. परकीय चलनाची भविष्यातील मागणी आणि पुरवठा यांचा मेळ घालणे हे परकीय चलन बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

फॉरवर्ड विनिमय दर हा स्पॉट विनिमय दराशी व्याजदर आणि परकीय चलनाची भविष्यातील मागणी आणि पुरवठा यांच्या अपेक्षांशी जोडलेला असतो. US $ आणि £ मधील स्पॉट विनिमय दर असे गृहीत धरूया:

US$१ = £०.८ किंवा £१ = US$ १.२५; आणि व्याजदर यूएस मध्ये ४ टक्के आणि यूके मध्ये ४.५ टक्के आहे.

स्पॉट विनिमय दर आणि फॉरवर्ड विनिमय दर यांच्यातील संबंध खालील समीकरणानुसार व्यक्त केला जातो:

$$rf = (१ + i)\ rs$$

जेथे,

rf हा फॉरवर्ड विनिमय दर आहे,

rs हा स्पॉट विनिमय दर आहे,

i हा व्याज दर आहे.

वरील उदाहरणात, यूएस डॉलर आणि पाउंड मधील ९०-दिवसांचा फॉरवर्ड दर असेल: १ (१+०.०११२५) = १.२६४ किंवा US$ १ = £०.७९१ किंवा US$ १.२६४ = £१. वरील अट "व्याज दर समता" म्हणून ओळखली जाते. म्हणजे चलनाचा फॉरवर्ड दर हा स्पॉट दर + दोन देशांमधील व्याजातील फरकाच्या बरोबरीचा असेल.

८.७ प्रश्न (QUESTIONS)

१. परकीय चलन बाजार म्हणजे काय?

२. परकीय विनिमय दर म्हणजे काय?

३. टिपा लिहा:

   अ) विनिमय दर निश्चिती

   ब) स्थिर व लवचिक विनिमय दर

   क) स्पॉट व फॉरवर्ड विनिमय दर

*****

munotes.in